म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
क्र. नं. ६६९



REFBK-0007936

# सरोजिनी नायडू

# देवी सरोजिनी नायडू

लेखक

जनार्दन गंगाधर करंदीकर
बी. ए. बी. टी. बार्शी.

किंमत बारा आणे

REFBK-0007936

चित्रशाळा प्रकाशन : पुणे २

# प्रास्ताविक निवेदन

आतांपर्यंत सरोजिनी नायडू यांचीं मराठींत लिहिलेलीं अगदीं लहानशीं दोन तीन चरित्रें पाहण्यांत आलीं. एक बारकेंसें इंग्रजींत लिहिलेलेंहि चरित्र आहे. परंतु त्यांचें सांगोपांग माहितीचें चरित्र प्रसिद्ध झालेलें नाहीं. त्यांचें अशा माहितीचें चरित्र लिहावें अशी माझीहि इच्छा होती. पण असा चरित्र-ग्रंथ लिहिण्यास जेवढीं साधनें उपलब्ध व्हावयास पाहिजेत तेवढीं झालीं नाहींत. तरीपण जी माहिती मिळाली तेवढ्याचा उपयोग करून हें चरित्र लिहिलें आहे. हें चरित्र छोटेसेंच असलें तरी त्यांत सरोजिनींच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या सर्व घटनांचा निर्देश आलेला आहे व जागोजागीं त्यांबद्दल विवेचनहि केलें आहे.

शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी, तसेंच प्रौढ वाचक बंधु-भगिनी यांना सरोजिनींच्या जीवितकार्याची योग्य कल्पना येण्यास हें छोटें चरित्रहि उपयोगी पडेल असा मला विश्वास वाटतो.

या पुस्तकाचे शेवटीं सरोजिनींच्या प्रशस्तिपर जें गीत दिलें आहे तें छापण्यास परवानगी दिल्याबद्दल माझे मित्र मराठवाड्यांतील सुप्रसिद्ध कवि श्री. वसंत अंबादास तुळजापूरकर यांचा मी आभारी आहें.

पुस्तकाचें अंतरंग व बहिरंग यांची सुंदर सजावट केल्याबद्दल चित्रशाळेच्या प्रकाशकांचा मी आभारी आहें.

बार्शी
ता. ११-४-१९५३

जनार्दन गंगाधर करंदीकर

अनुक्रम ..........
विभाग ..........
क्रां.
नों. दि.

# समर्पण

माझ्या पूज्य मातृभगिनी

**श्री. द्वारकाबाई सिधये**

*यांना ही लेखनकृति मी नम्रतापूर्वक सादर समर्पण करितों.*

जनार्दन गंगाधर करंदीकर

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- |
| भारतीय स्त्रियांची अखंड उज्ज्वल परंपरा | १ |
| सरोजिनींच्या थोरवीचें रहस्य | २ |
| घराणें व बालपण | ३ |
| विलायतेंतील वास्तव्य | ७ |
| काव्याचा सोनेरी उंबरठा | ९ |
| पहिला काव्यसंग्रह | ११ |
| सामाजिक कार्य | १३ |
| नामदार गोखले यांच्यांशीं परिचय | १४ |
| दुसरा काव्यसंग्रह | २० |
| राजकीय क्षेत्रांत प्रवेश | २३ |
| तिसरा काव्यसंग्रह : स्त्रियांच्या उन्नतीचे प्रयत्न | २९ |
| विलायतेंतील कामगिरी | ३३ |
| गांधी युगाचा उदय व सरोजिनींचें कार्य | ३८ |
| आफ्रिकेंतील कामगिरी | ४४ |
| बेळगांवची कॉंग्रेस व नंतर | ४९ |
| कानपूर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं नियुक्ति | ५१ |
| नवीन वादांतील तडजोडीचे प्रयत्न | ५६ |
| देशांतील व विदेशांतील कामगिरी | ५७ |
| मिठाच्या सत्याग्रहाची मोहीम | ५९ |
| गोलमेज परिषद | ६५ |
| १९३२ ची चळवळ | ६६ |
| १९४२ व नंतर | ७२ |
| वैभवाच्या शिखरावर | ७४ |
| अंतकाल | ७९ |
| सरोजिनींचें मुख्य जीवितकार्य | ८२ |
| कांहीं आठवणी | ८३ |
| सरोजिनी देवींना विश्ववंदन | ८६ |

अनुक्रम ...
नों. दि.
५१३६

# सरोजिनी नायडू

## भारतीय स्त्रियांची अखंड उज्ज्वल परंपरा

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां गेल्या शंभर वर्षांत अनेक थोर पुरुषांबरोबर ज्या कांहीं स्त्रियांनींहि प्रयत्न केले त्यांत सरोजिनी नायडू यांची योग्यता श्रेष्ठ प्रतीची आहे. हिंदुस्थान हा एक मागासलेला देश असून येथल्या स्त्रिया तर फारच अज्ञानावस्थेंत आहेत, असे जे परकीयांनीं उद्‌गार काढले होते ते आतां निराधार ठरले आहेत. एवढेंच नव्हे, तर भारतीय स्त्रियांची हजारों वर्षांपासून एक अखंड व उज्ज्वल अशी परंपरा चालत आली आहे, आणि सुगृहिणी व सुमाता म्हणून तर त्या साऱ्या जगाला आदर्श झालेल्या आहेत, हें समजून आल्यामुळें ॲनी बेझंटसारख्या विदेशस्थ महिलेनें स्वतःला "आर्यस्त्री" म्हणविण्यांत व हिंदुस्थानवर प्रेम करण्यांत भूषणच मानलें. प्राचीन कालांतल्या कात्यायनी, गार्गी, मैत्रेयी, दक्षकन्या सती, देवहूति, अनसूया; त्यानंतरच्या काळांतील द्रौपदी, विदुला, मंडनमिश्रांची धर्मपत्नी सरस्वती, उभयभारती, मीराबाई; आधुनिक इतिहासांतील जिजामाता, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई; अगदीं अलीकडच्या काळांतील आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, सरलादेवी चौधराणी, सुचेता कृपलानी, अशा व इतर अनेक प्राचीन, अर्वाचीन, ज्ञात व अज्ञात, अशा थोर भारतीय स्त्रिया आहेत. यांतील कांहीं विदुषी व वादपटु होऊन गेल्या, कांहींनीं शौर्य गाजविलें, कांहींनीं आपले

सुविचार व सद्भावना यांचे दिव्य संदेश देऊन राष्ट्रांत चैतन्य निर्माण केलें, कांहींनीं काया–वाचा–मनानें सतत लोकसेवेचें व्रत अंगीकारिलें. या ठिकाणीं विशेष सांगावयाचें तें हें कीं, अशा थोर भारतीय महिला-रत्नांच्या मालिकेंत सरोजिनी नायडू या सहज बसूं शकतात. जगांतील इतर स्त्री–पुढाऱ्यांशीं तुलना केली तर त्यांमध्येंहि सरोजिनींची योग्यता सर्वतोपरि उच्च प्रकारचीच ठरेल. गार्गी व कात्यायनी यांची विद्वत्ता नि बुद्धिमत्ता, मीराबाईची भक्तिप्रेमयुक्त काव्यशैली, द्रौपदीचा बाणेदारपणा, राणी लक्ष्मी व जोन ऑफ आर्क यांची उज्ज्वल देशभक्ति, स्त्री-समाज जागृत करण्यामध्यें श्रीमती रूझवेल्ट यांनीं दाखविलेली कार्यकुशलता, मादाम रोलां यांचें संभाषण-कौशल्य, हा सर्व गुणसमुच्चय सरोजिनींच्या ठिकाणीं उत्कटत्वानें वसत होता. शिवाय, सभानैपुण्य, रसाळ वाणी, गंगौघाप्रमाणें शांत नि गंभीर, अमोघ नि अस्खलित असें वक्तृत्व, हेहि गुण त्यांचे ठिकाणीं होते. यामुळें हिंदुस्थानांत केवळ नव्हे, तर जगांत त्यांनीं विशेष मानाचें स्थान संपादन केलें, आणि भारताला आंतरराष्ट्रीय कीर्ति प्राप्त करून दिली. भारतीय स्त्रिया सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील योग्यतेच्या बाबतींत जगांतल्या कोठल्याहि राष्ट्रांतल्या स्त्रियांपेक्षां कमी नाहींत, हें त्यांनीं इतर राष्ट्रांना पटवून दिलें, व म्हणून हिंदुस्थानांतील स्त्रियांचें प्रतिनिधित्व परदेशांत करण्याचें कार्य सरोजिनींकडेच आलें, यांत आश्चर्य नाहीं. अशा रीतीनें त्यांनीं जगांत हिंदी स्त्रियांचा दर्जा वाढविला व त्यांना जगांत श्रेष्ठपद मिळवून दिलें. या त्यांच्या कार्यामुळें "व्हॉइस ऑफ इंडिया" या शब्दांत सरोजिनींचा गौरव झाला, व हिंदुस्थानांतील जनतेचा आवाज सरोजिनींच्या मुखांतून सर्व जगाला ऐकूं गेला.

## सरोजिनींच्या थोरवीचें रहस्य

त्यांच्या थोरवीची जाणीव देशाला 'कशी झाली होती हें सांगतांना पंडित जवाहरलाल म्हणतात– "मला वाटतें, आम्हांला जें कांहीं प्राप्त झालें आहे ते सरोजिनींच्यामुळें प्राप्त झालें आहे. मी या स्थितीला

येण्याला सरोजिनींची स्फूर्ति हें एक कारण आहे. सरोजिनी ह्या सर्वप्रिय होत्या. आमच्या सामर्थ्याला व उत्साहाला त्यांचा मोठाच आधार होता." १९१५ सालापर्यंत त्यांनीं गोपाळ कृष्ण गोखले यांचें शिष्यत्व व नंतर १९२१ सालापासून महात्मा गांधींचें शिष्यत्व पत्करिलें. तेव्हांपासून काँग्रेस पक्षांतच त्या आमरण राहिल्या. तरीपण त्यांच्या स्वभावांत असें कांहीं वैशिष्ट्य होतें कीं, त्या सर्व पक्षांतल्या लोकांना प्रिय झाल्या. त्या पूर्ण अर्थानें अजातशत्रु होत्या. पक्षांधत्व हें तर त्यांचे ठिकाणीं मुळींच नव्हतें. सर्व पक्षांतील चांगल्या हितकारक गोष्टींकडेच त्यांचें नेहमीं लक्ष असें. सहानुभूति, सदयता, आनंदी वृत्ति ही त्यांची अखेरपर्यंत कायम राहिली. त्यांच्या "सर्व-प्रियतेचें" हेंच रहस्य होतें, व म्हणून त्यांची जीवितयात्रा संपूर्णपणें यशस्वी झाली. "अंतरीं निर्मळ, वाचेचा रसाळ" ही संत-कवि तुकारामांची उक्ति त्यांनीं सार्थ केली.

## घराणें व बालपण

सरोजिनींचा जन्म दक्षिण हैद्राबाद येथें १३ फेब्रुवारी १८७९ या दिवशीं झाला. त्यांच्या वडिलांचें नांव अघोरनाथ व आईचें नांव वरदा-सुंदरीदेवी असें होतें. चार भाऊ व चार बहिणी अशीं सरोजिनींसह एकंदर आठ भावंडें. त्यांपैकीं सरोजिनी सर्वांत थोरल्या. यांच्या घराण्याचें नांव चट्टोपाध्याय. हें बंगाली ब्राह्मणांतील पुरातन व उच्च घराणें समजलें जातें. संस्कृत भाषा व तत्त्वज्ञान यांतील पांडित्याबद्दल या घराण्याची ख्याति आहे. स्वतः सरोजिनी म्हणतात– "सृष्टिशोभा नि गिरिकंदरें यांची आवड माझ्या पूर्वजांना हजारों वर्षांपासून आहे. माझे वाडवडील मोठे कल्पक, विद्याविभूषित व साधुवृत्तीचे होते." त्यांतले कांहीं महान् शास्त्रसंपन्न होऊन गेले व कांहीं थोर कवि झाले. डॉ. अघोरनाथ यांनीं आपल्या घराण्याची परंपरा कायम ठेविली. धर्मशास्त्र, संस्कृत वाङ्मय व भौतिक शास्त्राच्या विविध शाखांचा त्यांनीं सखोल अभ्यास केला होता. त्यांची पत्नी वरदासुंदरीदेवी यांनींहि बंगाली भाषेंत उत्तम काव्यरचना

केली होती. अशा या मातापितरांचीं मुलें " शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं " या कविवचनाला सार्थ करणारीं अशींच झालीं. उदार, व्यापक दृष्टि, संकुचित जातीय वृत्तीचा अभाव, विशाल बुद्धिमत्ता, सहानुभूति, सत्कर्मांकडे प्रवृत्ति या बहुमोल गुणांचा वारसा सरोजिनींना आपल्या भाग्यशाली पित्याकडून लाभला होता. काव्यदृष्टि व सहृदयता हीं त्यांना आपल्या मातेपासून प्राप्त झालीं होतीं. इतर मुलांपैकीं वीरेंद्रनाथ चटोपाध्याय हे सुप्रसिद्ध क्रांतिकारक पुढारी होते. त्यांचें वास्तव्य जर्मनींत आहे. तेहि एक उत्तम राष्ट्रीय कवि आहेत. हरींद्रनाथ हेहि अत्यंत बुद्धिमान् असून कवि, नाटककार व रेडियो आर्टिस्ट आहेत. त्यांनीं देशभक्तिपर अशीं कित्येक भावनाप्रधान गीतें केलीं आहेत व तीं बहुतेक लोकप्रिय आहेत. इंग्लंड, अमेरिका व इतर देशांत प्रवास करून त्यांनीं सर्व ठिकाणीं आपल्या बुद्धिमत्तेची छाप बसविली आहे. एकंदरींत हें चट्टोपाध्यायांचें भाग्यवंत घराणें आहे. या भावंडांत सरोजिनी ही मातापितरांची सर्वांत लाडकी कन्या होती. आपल्या कन्येनें उत्तम शिक्षण घ्यावें व तिनें आपल्या बुद्धिप्रभावानें जगाला दिपवून टाकावें, अशी डॉ. अघोरनाथांची महत्त्वाकांक्षा होती. तिनें उत्कृष्ट शास्त्रज्ञ व्हावें अशी त्यांची इच्छा होती, तर तिच्या मातेची इच्छा तिनें वाङ्मय व काव्य यांचें परिशीलन करून उत्तम कवयित्री व्हावें अशी होती. आपल्या पित्यासंबंधीं सरोजिनी म्हणतात–" माझे वडील हे स्वतः कल्पनासृष्टींत वावरणारे सज्जन आहेत. ते थोर असूनहि त्यांचें जीवन अयशस्वी झालें आहे ! मला वाटतें, साऱ्या हिंदुस्थानांत त्यांच्या इतके विद्वान् लोक फारच थोडे असतील, आणि त्यांच्या इतके प्रेमळ स्वभावाचेहि थोडेच सांपडतील. त्यांना शुभ्र लांब दाढी असून ते हसूं लागले म्हणजे सारें घर जणूं काय गदगदां हलतें ! त्यांनीं आपली संपत्ति लोकांच्या उपयोगी पडण्यांत व आपल्या शास्त्राध्ययनांत खर्च केली. विविध धर्मांतील पंडितांच्या सभा ते दररोज आपल्या बागेंत भरवीत. राव, रंक, सुष्ट, दुष्ट सारे त्यांच्याजवळ

आनंदानें एकत्र होत आणि सर्वांना ते सारखेच उदारतेनें वागवीत. आणि त्यांचे ते रसायनशास्त्रांतले प्रयोग! रात्रंदिवस त्यांचे ते प्रयोग चालायचे! कोणीं कांहीं नवीन योजना सुचविली कीं त्याला ते भावाप्रमाणें मानून त्याचें स्वागत करीत." डॉ. अघोरनाथ हे मूळ बंगालांतले असले तरी त्यांनीं नोकरीनिमित्त दक्षिण हैद्राबादेंत आपलें वास्तव्य केलें होतें. प्रथम ते उच्च शिक्षणासाठीं विलायतेंत गेले व एडिंबरो विद्यापीठाची डॉक्टर ऑफ् सायन्स ही पदवी त्यांनीं १८७७ सालीं मिळविली. नंतर त्यांचें अध्ययन जर्मनींत बॉन येथील विद्यापीठांत झालें व तेथेंहि त्यांना बहुमानदर्शक पदवी मिळाली. नंतर ते हिंदुस्थानांत परत आले व दक्षिण हैद्राबादला नोकरीनिमित्त राहिले. तेथें त्यांनीं निजाम कॉलेजची स्थापना करून त्याचे ते पहिले प्रिन्सिपॉल म्हणून झाले. शिवाय ते एक कळकळीचे कार्यकर्ते व संशोधक होते. लहानपणापासूनच त्यांचें सरोजिनींकडे विशेष लक्ष होतें. तिनें एक अद्ययावत् हिंदी महिला व्हावें अशी त्यांची इच्छा होती व त्या काळाच्या म्हणजे अव्वल इंग्रजींतील काळाच्या समजुतीप्रमाणें त्यांनीं तिला शिकाविण्यासाठीं एक इंग्रजी शिक्षिका ठेविली. नंतर घरांत तिनें नेहमीं इंग्रजींतच बोलावें असा त्यांचा कटाक्ष होता. कारणावांचून जर ती वडिलांशीं मातृभाषेंत बोलली तर ते तिला शिक्षा करीत. इंग्रजी काव्यांत व वक्तृत्वांत विश्वकीर्ति मिळविणाऱ्या सरोजिनीला लहानपणीं इंग्रजी शिकण्याचा कंटाळा होता! वडिलांच्या धाकामुळें त्या इंग्रजी पुस्तक हातांत धरून बसत. एकदां सरोजिनींनीं इंग्रजीचा पाठ नीट केला नाहीं असें वाटून अघोरनाथांनीं त्यांना एक दिवस खोलींत कोंडून ठेवलें. या वेळीं सरोजिनींचें वय अवघें नऊ वर्षांचें होतें. पण या शिक्षेचा इष्ट तो परिणाम झाला, व सरोजिनी इंग्रजी पाठाकडे अधिक लक्ष देऊं लागल्या. अघोरनाथांना त्यामुळें फार समाधान झालें. सरोजिनी त्या प्रसंगाचें वर्णन करतांना म्हणतात, "त्या खोलींतून मी बाहेर आलें त्या वेळीं आपण पूर्ण भाषातज्ज्ञ झालों आहोंत असें मला

वाटलें. ! " त्या वेळेपासून इंग्रजी व इतर भाषांच्या अध्ययनास त्यांनीं सुरुवात केली. सरोजिनींनीं इंग्रजी भाषेवर जें असामान्य प्रभुत्व मिळविलें त्याला त्यांचें बाल्यावस्थेंत वडिलांच्या देखरेखीखालील हें इंग्रजींतील शिक्षणच कारण झालें. पुढें आपल्या मुलीनें उत्तम गणिती व शास्त्रज्ञ व्हावें अशी त्यांची इच्छा होती. परंतु सरोजिनींना ते विषय मनापासून आवडले नाहींत. वाङ्मय व काव्य या विषयांकडेच त्यांचा अधिक ओढा असावयाचा व म्हणून पित्यापेक्षां मातेच्याच इच्छेचा परिणाम सरोजिनींवर झाला. कारण माता वरदासुंदरीदेवी या स्वतः उत्तम कवयित्री असून आपल्या मुलांचे विशेष गुण पारखून त्यांचा परिपोष करावा अशी त्यांनीं दक्षता घेतली. सरोजिनींच्या ठिकाणचा काव्यगुण त्यांनीं ओळखून त्याच्या संवर्धनासाठींच त्यांच्या मातेनें त्यांना उत्तरोत्तर उत्तेजन दिलें. इकडे तर वडिलांचा तिला गणिती व शास्त्रज्ञ बनविण्याचा उद्योग चालूच होता! एकदां त्यांनीं सरोजिनींना बीजगणितांतलें एक उदाहरण सोडविण्यास सांगितलें. पण सरोजिनींना तें कांहीं केल्या सुटेना. शेवटीं, "न सुटणाऱ्या गणितास" या नांवाची एक इंग्रजी कविताच त्यांनीं लिहिली! एकदां त्या बीजगणितांतला फॉर्म्युला घोकीत बसल्या होत्या. परंतु फॉर्म्युला पाठ करण्याऐवजीं त्यांचें लक्ष त्याला काव्यमय श्लोकबद्ध करण्याकडेच लागलें होतें. अखेर तो फॉर्म्युला त्यांना कांहीं श्लोकबद्ध करतां आला नाहीं. पण त्यांनीं निराळीच एक छोटीशी कविता मात्र बनविली व ती लिहून काढली. त्यांच्या काव्य-प्रयत्नांना लहानपणीं याप्रमाणें सुरुवात झाली! त्यांनीं आपलें पहिलें काव्य अकराव्या वर्षीं लिहिलें. बाराव्या वर्षीं त्या मद्रास विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या! व तेराव्या वर्षीं १३०० ओळींचें एक दीर्घ काव्य इंग्रजी काव्यांच्या धर्तीवर सहा दिवसांत लिहिलें. त्यांना वाचन-लेखनाचा इतका विलक्षण नाद लागला कीं शेवटीं त्या आजारी पडल्या. तेव्हां डॉक्टरांनीं त्यांना सांगितलें, " तूं आजारी आहेस, तेव्हां पुस्तकाला हात देखील लावूं

नकोस." परंतु सरोजिनींचें कविता-रचनेचें प्रेम इतकें उत्कट होतें कीं तशा आजारीपणांत त्यांनीं अल्पावधींतच २००० ओळींचें एक भावनापूर्ण नाटक लिहून काढलें! त्यानंतर एक कादंबरी लिहून काढली. इतरहि पुष्कळ लेखन-वाचन केलें. वयाच्या १४ ते १६ वर्षांच्या लहानशा अवधींतच त्यांनीं आयुष्यांतलें बरेंचसें अध्ययन व वाचन केलें. मॅट्रिक परीक्षा पास झाल्यानंतर आतां आणखी शाळा-कॉलेजांतील पुस्तकें वाचून पदव्या मिळविण्याचें शिक्षण घ्यावें असें त्यांना वाटत नव्हतें. आपल्या मनाला योग्य वाटेल तसेंच शिक्षण आपल्याला घेतलें पाहिजे अशी त्यांची इच्छा होती, व म्हणून परीक्षा पास होण्यापेक्षां काव्य-वाङ्मयाकडे त्यांचें अधिक लक्ष होतें. उत्तमोत्तम काव्यग्रंथ वाचावे, ते नीट अभ्यासावे व स्वतः काव्यरचना करावी हा त्यांचा प्रयत्न अखंड चालू होता. वयाच्या सोळाव्या वर्षीं त्यांनीं एक पर्शियन नाटक लिहिलें. या नाटकाची एक प्रत त्या वेळच्या निजामांना भेट म्हणून देण्यांत आली. तें नाटक वाचून व बाल-सरोजिनींच्या बुद्धिमत्तेची कीर्ति ऐकून निजाम सरकारनें त्यांना शिष्यवृत्ति देऊन इंग्लंडला उच्च शिक्षणासाठीं पाठविलें.

## विलायतेंतील वास्तव्य

अठरापेक्षां कमी वय असल्यानें सरोजिनींना प्रथम केंब्रिज विद्यापीठांत प्रवेश मिळाला नाहीं. म्हणून प्रथम सरोजिनींचें अध्ययन लंडनच्या किंग्ज् कॉलेजमध्यें झालें. त्यानंतर दोन वर्षांनीं त्या केंब्रिज विद्यापीठाच्या गर्टन कॉलेजमध्यें दाखल झाल्या. हें कॉलेज स्त्रियांकरितां असून त्या दृष्टीनें त्याची प्रसिद्धीहि चांगली होती. मात्र ह्या ठिकाणींहि त्यांचा मुख्य आवडीचा विषय काव्य हाच होता. कॉलेजमध्यें शिक्षण घेत असतांना त्यांची प्रकृति पुष्कळदां बरी नसे. त्या वारंवार आजारी पडत. तरीहि त्यांनीं आपला काव्यवाङ्मयाचा अभ्यास सोडला नाहीं. इंग्लंड-मधील वातावरणाच्या धर्तीवर त्यांनीं कित्येक इंग्रजी कविता लिहिल्या.

वाटलें. ! ” त्या वेळेपासून इंग्रजी व इतर भाषांच्या अध्ययनास त्यांनीं सुरुवात केली. सरोजिनींनीं इंग्रजी भाषेवर जें असामान्य प्रभुत्व मिळविलें त्याला त्यांचें बाल्यावस्थेंत वडिलांच्या देखरेखीखालील हें इंग्रजींतील शिक्षणच कारण झालें. पुढें आपल्या मुलीनें उत्तम गणिती व शास्त्रज्ञ व्हावें अशी त्यांची इच्छा होती. परंतु सरोजिनींना ते विषय मनापासून आवडले नाहींत. वाङ्मय व काव्य या विषयांकडेच त्यांचा अधिक ओढा असावयाचा व म्हणून पित्यापेक्षां मातेच्याच इच्छेचा परिणाम सरोजिनींवर झाला. कारण माता वरदासुंदरीदेवी या स्वतः उत्तम कवयित्री असून आपल्या मुलांचे विशेष गुण पारखून त्यांचा परिपोष करावा अशी त्यांनीं दक्षता घेतली. सरोजिनींच्या ठिकाणचा काव्यगुण त्यांनीं ओळखून त्याच्या संवर्धनासाठींच त्यांच्या मातेनें त्यांना उत्तरोत्तर उत्तेजन दिलें. इकडे तर वडिलांचा तिला गणिती व शास्त्रज्ञ बनविण्याचा उद्योग चालूच होता! एकदां त्यांनीं सरोजिनींना बीजगणितांतलें एक उदाहरण सोडविण्यास सांगितलें. पण सरोजिनींना तें कांहीं केल्या सुटेना. शेवटीं, “ न सुटणाऱ्या गणितास ” या नांवाची एक इंग्रजी कविताच त्यांनीं लिहिली ! एकदां त्या बीजगणितांतला फॉर्म्युला घोकीत बसल्या होत्या. परंतु फॉर्म्युला पाठ करण्याऐवजीं त्यांचें लक्ष त्याला काव्यमय श्लोकबद्ध करण्याकडेच लागलें होतें. अखेर तो फॉर्म्युला त्यांना कांहीं श्लोकबद्ध करतां आला नाहीं. पण त्यांनीं निराळीच एक छोटीशी कविता मात्र बनविली व ती लिहून काढली. त्यांच्या काव्य-प्रयत्नांना लहानपणीं याप्रमाणें सुरुवात झाली ! त्यांनीं आपलें पहिलें काव्य अकराव्या वर्षीं लिहिलें. बाराव्या वर्षीं त्या मद्रास विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या ! व तेराव्या वर्षीं १३०० ओळींचें एक दीर्घ काव्य इंग्रजी काव्यांच्या धर्तीवर सहा दिवसांत लिहिलें. त्यांना वाचन-लेखनाचा इतका विलक्षण नाद लागला कीं शेवटीं त्या आजारी पडल्या. तेव्हां डॉक्टरांनीं त्यांना सांगितलें, “ तूं आजारी आहेस, तेव्हां पुस्तकाला हात देखील लावूं

नकोस." परंतु सरोजिनींचें कविता-रचनेचें प्रेम इतकें उत्कट होतें कीं तशा आजारीपणांत त्यांनीं अल्पावधींतच २००० ओळींचें एक भावनापूर्ण नाटक लिहून काढलें! त्यानंतर एक कादंबरी लिहून काढली. इतरहि पुष्कळ लेखन-वाचन केलें. वयाच्या १४ ते १६ वर्षांच्या लहानशा अवधींतच त्यांनीं आयुष्यांतलें बरेंचसें अध्ययन व वाचन केलें. मॅट्रिक परीक्षा पास झाल्यानंतर आतां आणखी शाळा-कॉलेजांतील पुस्तकें वाचून पदव्या मिळविण्याचें शिक्षण घ्यावें असें त्यांना वाटत नव्हतें. आपल्या मनाला योग्य वाटेल तसेंच शिक्षण आपल्याला घेतलें पाहिजे अशी त्यांची इच्छा होती, व म्हणून परीक्षा पास होण्यापेक्षां काव्य-वाङ्मयाकडे त्यांचें अधिक लक्ष होतें. उत्तमोत्तम काव्यग्रंथ वाचावे, ते नीट अभ्यासावे व स्वतः काव्यरचना करावी हा त्यांचा प्रयत्न अखंड चालू होता. वयाच्या सोळाव्या वर्षीं त्यांनीं एक पर्शियन नाटक लिहिलें. या नाटकाची एक प्रत त्या वेळच्या निजामांना भेट म्हणून देण्यांत आली. तें नाटक वाचून व बाल-सरोजिनींच्या बुद्धिमत्तेची कीर्ति ऐकून निजाम सरकारनें त्यांना शिष्यवृत्ति देऊन इंग्लंडला उच्च शिक्षणासाठीं पाठविलें.

## विलायतेंतील वास्तव्य

अठरापेक्षां कमी वय असल्यानें सरोजिनींना प्रथम केंब्रिज विद्यापीठांत प्रवेश मिळाला नाहीं. म्हणून प्रथम सरोजिनींचें अध्ययन लंडनच्या किंग्ज् कॉलेजमध्यें झालें. त्यानंतर दोन वर्षांनीं त्या केंब्रिज विद्यापीठाच्या गर्टन कॉलेजमध्यें दाखल झाल्या. हें कॉलेज स्त्रियांकरितां असून त्या दृष्टीनें त्याची प्रसिद्धीहि चांगली होती. मात्र ह्या ठिकाणींहि त्यांचा मुख्य आवडीचा विषय काव्य हाच होता. कॉलेजमध्यें शिक्षण घेत असतांना त्यांची प्रकृति पुष्कळदां बरी नसे. त्या वारंवार आजारी पडत. तरीहि त्यांनीं आपला काव्यवाङ्मयाचा अभ्यास सोडला नाहीं. इंग्लंड-मधील वातावरणाच्या धर्तीवर त्यांनीं कित्येक इंग्रजी कविता लिहिल्या.

त्याचें एक बाडच तयार झालें. आतां या आपल्या कविता तज्ज्ञाकडून पारखून घेण्याची संधि त्यांना लवकरच मिळाली. लंडनमध्यें सरोजिनी ज्या कुटुंबांत राहात होत्या त्या कुटुंबांत सर एडमंड गॉस ह्या सुप्रसिद्ध इंग्रज लेखकाचें नेहमीं येणें जाणें असे. गॉस हे उत्कृष्ट टीकाकार म्हणूनहि विख्यात होते. सहज एका प्रसंगीं त्यांची व सरोजिनींची ओळख झाली. एकदां त्या एडमंड गॉस यांना म्हणाल्या, "मीं कांहीं इंग्रजी कविता लिहिल्या आहेत त्या आपण वाचून पाहाल का?" "हो, अवश्य वाचीन." असें गॉस यांनीं उत्तर दिल्यावर सरोजिनींनीं आपलें काव्य त्यांना दाखविलें. सरोजिनींबद्दल वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गॉससाहेबांना आधींच मोठें कौतुक वाटत असे. इंग्रज मुलींपेक्षां सरोजिनींमध्यें कांहीं विशेष गुण आहेत असें त्यांना दिसून आलें. सर्व हिंदी स्त्रियांचे ठिकाणीं वसत असणाऱ्या या गुणांबद्दल गॉसना मोठा आदर वाटे. याप्रमाणें सरोजिनींबद्दल कौतुक व आदर यांच्या भावना ते नेहमीं त्यांचेजवळ व्यक्त करीत. शिवाय सरोजिनींना वाचनाचा मोठा नाद असून ती एक अत्यंत बुद्धिमान मुलगी आहे आणि तिची निरीक्षण-शक्तीहि सूक्ष्म आहे, याबद्दल गॉस यांना सरोजिनींबद्दल धन्यता वाटे. परंतु त्यांना सरोजिनींच्या इंग्रजी काव्यरचनेच्या उद्योगाबद्दल मात्र विशेष आश्चर्य वाटलें, व जेव्हां सरोजिनींनीं त्यांचेपाशीं आपली काव्याची वही वाचावयास दिली तेव्हां त्यांनीं सरोजिनींचीं सर्व काव्यें काळजीपूर्वक वाचलीं. अनेक ठिकाणीं त्यांनीं खाणाखुणा केल्या. इकडे सरोजिनींची छाती धडधडत होती. आपल्या काव्याबद्दल या मुरब्बी टीकाकाराचा विरुद्ध ग्रह तर होणार नाहीं ना या विचारानें त्या बऱ्याच अस्वस्थ झाल्या. काव्याच्या परीक्षेंत आपण उतरतों कीं नाहीं याचा त्यांना सारखा ध्यास लागला होता. दुसऱ्या दिवशीं त्या गॉस साहेबांची मोठ्या उत्कंठतेनें वाट पाहात बसल्या. ठरल्या वेळीं गॉस साहेब सरोजिनींच्या काव्याची वही बरोबर घेऊन सरोजिनींच्या बिऱ्हाडीं आले. सरोजिनींनीं त्यांचें स्वागत केलें व गॉस ह्यापुढें काय म्हणतात त्याकडे त्या मोठ्या आतुरतेनें लक्ष देऊं लागल्या.

## काव्याचा सोनेरी उंबरठा

गॉस साहेबांनीं बोलण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, " सरोजिनी, मीं तुमच्या सर्व कविता वाचल्या. बारकाईनें वाचल्या. इंग्रजी भाषेवर तुम्हीं चांगलेंच प्रभुत्व मिळविलें आहे. इंग्रजी वृत्तांची रचना, छंद, अलंकार या गोष्टी तुम्हांला चांगल्या साधल्या आहेत. पण इतकें असूनहि तुमच्या कविता वाचून माझी निराशा झाली आहे! तुमच्या काव्यांत विचारांचें नावीन्य बिलकुल नाहीं. सगळे विचार परक्यांचे आहेत. तुमच्या कविता म्हणजे इंग्रजी कवींचें नुसतें अनुकरण आहे. तुमच्या स्वतःच्या भारत देशांत जे जे काव्याचे अनेक विषय तुम्हांला आढळतात किंवा तुमच्या देशांतल्या गोष्टींसंबंधीं ज्या ज्या कल्पना तुम्हांला सुचण्यासारख्या आहेत त्यांचा तुमच्या काव्यांत कुठेंहि उल्लेख नाहीं. इंग्लंड हा देश कांहीं तुम्हांला तुमच्या देशापेक्षां अधिक परिचित नाहीं. असें असतांना तुम्ही काव्याचे विषय मात्र सगळे इंग्लंडला लागू असणारे घेतले आहेत. इंग्लंडमध्यें तुम्हीं पाहिलेलें चर्च, इंग्लंडमधलेच रॉबिन व स्कायलार्क यांसारखे पक्षी नि इंग्लंडांतीलच वृक्ष यांचें तुम्हीं काव्यांत वर्णन केलें आहे. हें तुमचें काव्य इंग्लंडच्या वाचकांकरितां एखाद्या इंग्रज कवयित्रीनें लिहिलें असतें तर तिलाच शोभण्यासारखें होतें. पण तुमच्यासारख्या भारतीय स्त्रीनें भारतीय विषय घेऊन त्यांवरच काव्य लिहिलें तरच तें काव्य सुंदर व स्पृहणीय होईल. तुम्ही तुमच्याच देशासंबंधीं म्हणजे, तुमच्या देशांतल्या ज्या गोष्टी आम्हांला अज्ञात आहेत पण तुम्हांला परिचित आहेत, उदाहरणार्थ तुमच्या देशांतलीं निसर्गरम्य स्थळें, तेथले लोक, तेथल्या चालीरीति, यांवरच काव्यरचना करावी. तुमचें काव्य इंग्रजी भाषेंत असलें तरी तें भारतीय दृष्टिकोणांतून तुम्हीं लिहिलें पाहिजे. त्यावर तुमच्या भारत देशाच्या संस्कृतीची छाप असली पाहिजे. असें झालें म्हणजे तुमच्या काव्याला एकप्रकारची सहजसुंदरता लाभेल. तुमचें कविहृदय अशाच काव्यांत खरें प्रतिबिंबित होईल. तुमच्या सभ्यांच्या

काव्यांत एकहि भारतीय विषय येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय? या दृष्टीनें तुमचें हें काव्य चिरंजीव होऊं शकत नाहीं. तुमचें हें सारें काव्याचें बाड जाळून टाकावें असें मला वाटतें. तुमची कविता भाषेच्या दृष्टीनें मला आवडली असली तरी—तिचें बहिरंग चांगलें असलें तरी—अंतरंग मला पसंत नाहीं. त्यांत परकी विचार नि परकी सृष्टि असल्यानें त्यांत आत्मीयता नाहीं. म्हणून तुमच्या देशांतले पर्वत नि नद्या, तुमच्या देशांतलीं झाडें, फुलें नि फळें, तुमच्या देशांतलीं उद्यानें नि देवालयें यांच्या वातावरणांत तुम्ही आपलें काव्य बसवा. निराळ्या शब्दांत सांगा-वयाचें तर तुम्ही खऱ्याखुऱ्या हिंदी कवयित्री व्हा. एखादी चतुर पण इंग्रजी काव्याचें यांत्रिक अनुकरण करणारी कवयित्री बनूं नका."

याप्रमाणें गॉस साहेबांनीं सरोजिनींच्या प्रतिभेला योग्य दिशा दाखविली. केवळ स्तुतिपाठकत्व केलें नाहीं. या बहुमोल उपदेशाचा सरोजिनींवर उत्कृष्ट परिणाम झाला व त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें वागण्याचें सरोजिनींनीं ठरविलें. "काव्याच्या सोनेरी उंबरठ्याचा मार्ग त्यांनीं मला दाखविला" असें सरोजिनी म्हणाल्या. त्यांच्या पुढें प्रसिद्ध झालेल्या पहिल्या काव्यसंग्रहाचें नांवहि त्यांनीं सोनेरी उंबरठा (गोल्डन थ्रेशोल्ड) असेंच ठेविलें. परकीय विषय त्यांनीं यापुढें आपल्या काव्यांत गुंफण्याचें सोडून दिलें. यापुढील त्यांचे काव्याचे विषय भारतीय वातावरणानें दरवळलेले आहेत. त्यांनीं काव्य इंग्रजी लिहिलें तरी त्यांतली सृष्टि हिंदी अशीच निर्माण केली. जुने बाड रद्द केलें, आणि मग १९०५ सालापर्यंत कांहींच प्रसिद्ध केलें नाहीं. अर्थात् तोंपर्यंतचा म्हणजे दहा वर्षांचा काळ त्यांनीं काव्योपासनेंत व काव्यचिंतनांत घालविला.

इंग्लंडमधल्या वास्तव्यानंतर सरोजिनी प्रकृतिस्वास्थ्याकरितां इटलीला गेल्या. त्या रमणीय देशांत त्यांच्या काव्यप्रतिभेला उजळा देणारे अनेक विषय होते. प्राचीन मूर्तिकला व ऐतिहासिक अवशेष पाहात असतांना

आपण इटलींतल्या जुन्या देवदेतांच्या सान्निध्यांत आहोंत कीं काय असें त्यांना वाटे. देवांचें सामर्थ्य नि देवतांचें सौंदर्य आपल्यास दृष्टिगोचर होत आहे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव आपण घेत आहोंत असा त्या कवयित्रीला भास होई. ख्रिस्ती साधूंची प्रशांत गंभीर मुद्रा पाहून त्यांच्या मनावर परिणाम होई. त्यांच्या सहवासांतून बाहेरील जगांत आल्यानंतर भोंवतालच्या लोकपरिस्थितीचेंहि त्यांनीं सूक्ष्म निरीक्षण केलें. अनेक स्त्रीपुरुषांचा परिचय करून घेतला. याप्रमाणें त्या देशांतील चित्रसंग्रहालय, शिल्पसंग्रहालय, व अनेक निसर्ग-सुंदर स्थळें पाहून व एकंदर लोकस्थितीचा अभ्यास करून त्यांनीं आपल्या ज्ञानांत चांगली भर घातली. इंग्लंडमधील वास्तव्यामुळें व युरोपच्या प्रवासामुळें त्यांचे विचार व्यापक झाले व दृष्टि आंतरराष्ट्रीय बनली.

१८९८ च्या सप्टेंबर महिन्यांत सरोजिनी हिंदुस्थानांत परत आल्या, आणि त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत मद्रास येथें ब्राह्म समाजांत त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पतीचें नांव डॉ. एम्. गोविंद राजुलु नायडू; हे हैद्राबादला राहात असल्यानें दक्षिण हैद्राबाद येथें सरोजिनींचें कायमचें निवासस्थान झालें. या विवाहानें समाजांत कांहीं काळ खळबळ झाली. कारण सरोजिनी या बंगाली ब्राह्मण असून त्यांचा विवाह मात्र नायडू या मद्रासी ब्राह्मणेतराशीं झाला. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें हा विवाह सनातनी लोकांनीं निषिद्ध मानला, यांत आश्चर्य नाहीं. विशेषतः त्या काळांत तरी अशा विवाहाची कल्पनाहि पुष्कळांना अशक्य वाटे. असो. कालांतरानें ही खळबळ शांत झाली. सरोजिनींचें वैवाहिक जीवन मात्र अत्यंत सुखमय असेंच झालें.

## पहिला काव्यसंग्रह

यापुढें जवळ जवळ सात वर्षे काव्याच्या अध्ययनांत व उपासनेंत घालविल्यानंतर १९०५ सालीं सरोजिनींनीं आपला पहिला काव्यसंग्रह लंडन येथें प्रसिद्ध केला. त्याचें नांव "गोल्डन थ्रेसोल्ड" सोन्याचा उंबरठा.

अनुक्रम ..........
विषय ..........

असें त्यांनीं ठेवलें यासंबंधीं नुकताच वर उल्लेख केला आहेच. हैद्राबाद येथील त्यांच्या राहत्या घराला या काव्यगुच्छाचेंच नांव आहे. हिंदुस्थान, युरोप व अमेरिका या तिन्ही ठिकाणीं या काव्यसंग्रहाचें अत्यंत थाटानें स्वागत झालें व अल्पावधींत या पुस्तकाच्या दहा आवृत्त्या निघाल्या. प्रथम हा आपला काव्यसंग्रह प्रसिद्ध व्हावा अशी त्यांची इच्छा नव्हती. परंतु सर आर्थर सायमन्स् या दुसऱ्या एका विख्यात इंग्रज लेखकांनीं हा काव्यसंग्रह मुळांत पाहून त्याची फार वाखाणणी केली, आणि तो प्रसिद्ध करण्याबद्दल सरोजिनींना उत्तेजन दिलें. त्यांना सरोजिनींच्या काव्यांत विशेष सौंदर्य दिसून आलें. त्यांतील निर्दोष वृत्तरचना, शब्द-लालित्य नि सहजसौंदर्य हे गुण त्यांना असाधारण वाटले. या काव्यसंग्रहाला त्यांनीं जी प्रस्तावना लिहिली तींत ते म्हणतात— "सौंदर्याची नितांत आवड असल्यानें सरोजिनी कवयित्री झाल्या, व त्यामुळेंच त्यांची वृत्ति आनंदी आहे. या कवयित्रीच्या तेजस्वी नेत्रांत मूर्तिमंत चैतन्य सांठविलें आहे असें वाटतें. सूर्यविकासी पुष्पें जशीं सूर्याकडेच वळतात नि विकसित होतात, त्याप्रमाणें या लहान मूर्तीचे—सरोजिनींचे—डोळे सौंदर्याकडेच आकर्षित होतात. आणि मग सौंदर्यच पाहणारी ही मूर्ति प्रेममय होऊन जाते." पौर्वात्य राष्ट्रांचें ज्ञान सरोजिनींच्या रूपानें प्रकट झालें आहे असें सायमन्स् यांना वाटे, इतका बहुमान त्यांनीं सरोजिनींना व त्यांच्या काव्याला दिला. हा पहिला काव्यसंग्रह सरोजिनींनीं कृतज्ञतापूर्वक सर एडमंड गॉस यांना अर्पण केला; आणि ही गोष्ट उचित अशीच झाली. गॉसनींच त्यांना काव्यमंदिराच्या उंबरठ्यावर आणलें होतें. हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होतांच इंग्लंडमधील जनतेनें त्याचें मोठ्या उत्साहानें सहर्ष स्वागत केलें. एका वृत्तपत्रानें त्यावर अभिप्राय देतांना लिहिलें कीं, स्त्रियांना काव्य लिहितां येत नाहीं, असें जे लोक उपहासानें बोलत असतील त्यांचीं तोंडें या लहानशाहि काव्यप्रकाशनानें बंद होतील. या काव्याचें सौंदर्य नि वैशिष्ट्य

हीं निर्विवाद आहेत." अद्भुतरम्यता नि कल्पनाविहार या दृष्टींनीं या काव्यसंग्रहाला महत्त्व आहेच. परंतु कांहीं उत्कृष्ट लोकगीतेंहि या संग्रहांत आलीं असल्यानें सर्वसामान्य जनतेलाहि आवडणारें असें त्यांचें काव्य झालें आहे. उदाहरणार्थ पालखी वाहणारे भोई, भटकणारे गवई, हिंदी विणकर, कोळी, गारुडी, चक्कीवाले, शेतकरी इत्यादि समाजांतील विविध थरांतल्या लोकांच्या भावना, त्यांचीं कौटुंबिक सुखदुःखें, आवडी-निवडी, रूढि, संस्कार, आशा-आकांक्षा यांच्यांशीं समरस होऊन त्यांचें जीवन स्नेहार्द्रतेनें त्यांनीं आपल्या काव्यांत चित्रित केलें आहे. "हिंदुस्थानास" हें राष्ट्रीय गीत ह्याच संग्रहांत समाविष्ट आहे. केवळ कल्पनेचे विलास, भावनांचे विहार किंवा शब्दांची जादुबंदी एवढ्याच गोष्टी त्यांत असत्या तर त्याची तज्ज्ञांकडून सर्वत्र इतकी वाहवा झाली नसती. परंतु अभिनव कल्पना, नादमाधुर्य आणि प्रासादिक शब्दयोजना या बाह्य लक्षणांबरोबर आपल्या बांधवांबद्दल प्रेम, सहानुभूति, आणि राष्ट्रहितदृष्टि, त्याचप्रमाणें भावनांचें समुचित आविष्करण व सौंदर्यदृष्टि या प्रमुख लक्षणांमुळें त्यांचें काव्य लोकप्रिय नि हृदयंगम झालें. सहृदयता हा तर त्यांच्या काव्याचा आत्मा आहे. राजकारणाच्या क्षेत्रांत पदार्पण करण्यापूर्वीं कित्येक वर्षें त्यांचें मातृभूमीवरील उत्कट प्रेम त्यांच्या या सुंदर काव्यांत व्यक्त झालें होतें. आपली भारतमाता, या भरतभूमींतील प्रसिद्ध व्यक्ति, राष्ट्रवीर, राजे आणि ऐतिहासिक महत्त्वाच्या घटना यांचें गान तर त्यांनीं केलें आहेच, परंतु त्याबरोबर या भूमींतील अनाथ स्त्रिया व कष्टी जीवन कंठणारे जे लक्षावधि लोक आहेत त्यांचें चित्रहि त्यांनीं आपल्या काव्यांत रंगविलें आहे.

## सामाजिक कार्य

याप्रमाणें एकीकडे त्यांचें काव्यलेखन जरी चालू होतें तरी समाज-जीवनाकडे त्यांचें लक्ष होतें. हैद्राबादच्या सामाजिक कार्यांत त्या प्रामुख्यानें भाग घेत असत. त्यांचें घर म्हणजे सामाजिक चळवळींचें

माहेरघर होतें. त्यांचा मित्रपरिवाराहि मोठा असे. शिष्टाचारांतील माधुर्य, आत्यंतिक सभ्यता, स्वभावाचा मोकळेपणा, साधेपणा व अगत्य या गुणांचा प्रत्यय त्यांच्या घरीं जाणाऱ्या प्रत्येक माणसाला येई. या घरीं येणाऱ्या लोकांत सर्व मतांचे लोक असत. जसे सनातनी तसे सुधारक मताचेहि लोक येत. या विविध मतांच्या लोकांत ऐक्य घडवून आणण्याचा सरोजिनींनीं बराच प्रयत्न केला. यामुळें जुन्या नव्या मतांचे लोक एकत्र येऊन मनमोकळी चर्चा करीत. आपसांतले गैरसमज नाहींसे होत. याशिवाय सरोजिनींची अभिजात कलादृष्टि व सौंदर्याची आवड यामुळें कवि, चित्रकार, लेखक व इतर कलाकार यांचा मेळावा त्यांच्या घरीं भरे. वादविवाद, मार्गदर्शन या पद्धतीनें कलेोपासनेला बहर येई. दुसरेंहि एक मोठें कार्य त्यांनीं आरंभिलें होतें. हैद्राबादच्या पडदानशीन स्त्रियांत मिसळून त्या समाजांत सरोजिनींनीं मोठी मान्यता मिळविली. त्यांतल्या बऱ्याच स्त्रिया मोठ्या विदुषी असत. संस्कृत, पर्शियन, अरबी या पौर्वात्य भाषांतील वाङ्मयाचा त्यांचा सखोल अभ्यास असे. इकडे सरोजिनींचा पाश्चात्य वाङ्मयाचा उत्तम व्यासंग होता. सरोजिनींचा या पडदानशीन महिलांशीं निकट परिचय झाल्यानें पूर्वपाश्चिम ज्ञानस्रोतांचा सुंदर संगम घडून आला. सौंदर्यप्रीति, सदभिरुचि, परस्पर स्नेहभाव यांनीं वातावरण दरवळून गेलें.

या सुमारास हैद्राबादला महापूर येऊन जलप्रलय झाला. त्या वेळीं सरोजिनींनीं प्रलयपीडित स्त्रीपुरुषांना चांगली मदत केली व त्यांचें दुःखनिवारण केलें. सरोजिनींनीं केलेल्या या समाजसेवेबद्दल त्यांना कैसर-इ-हिंद हें त्या काळचें पदक मिळालें.

## नामदार गोखले यांच्यांशीं परिचय

लवकरच सरोजिनींच्या सार्वजनिक कार्याचें क्षेत्र हैद्राबादपुरतें मर्यादित न राहतां हिंदुस्थानांत इतरत्र वाढूं लागलें. लांबलांबच्या प्रांतांतून त्यांना सभा-परिषदांचीं निमंत्रणें येऊं लागलीं. कांहीं परिषदांचें अध्यक्ष-

स्थानाहि त्यांनीं भूषविलें व भाषणांतून आपले तेजस्वी विचार जनतेला सांगितले. त्यांच्या ठिकाणीं जशी काव्यस्फूर्ति व प्रतिभेची मरारी आहे त्याचप्रमाणें उत्कृष्ट वक्तृत्वशैलीहि आहे याची प्रचीति जनतेला येऊं लागली. सरोजिनींचें मुंबई प्रांतांतलें पहिलें व्याख्यान मुंबई येथील स्टुडंट्स् ब्रदरहूडचे वतीनें झालें. प्रार्थना-समाजाच्या हॉलमध्यें व्याख्यान व्हावयाचें होतें. पण तो हॉल पुरा पडणार नाहीं म्हणून चर्नीरोडसमोर पारशी शाळेच्या भव्य हॉलमध्यें त्यांचें व्याख्यान झालें. श्रोत्यांनीं हॉल फुलून गेला होता. गोंगाट बिलकुल नव्हता. सरोजिनींचें काव्यमय वक्तृत्व सुरू झालें. भाषा ओघवती, वाणी रसाळ व अस्खलित होती. सतेज मुखकांति, योग्य समयोचित हास्यविनोद, यांमुळें लोकांचें लक्ष साहजिकपणेंच त्यांचेकडे वेधलें जात असे. मुंबईप्रमाणें कलकत्त्याहूनहि १९०६ सालीं त्यांना व्याख्यानाचें निमंत्रण आलें. कलकत्त्यास त्या वेळीं अखिल भारतीय सामाजिक परिषदेचें अधिवेशन होतें. सरोजिनींच्या व्याख्यानाचा विषय " हिंदी स्त्रियांचें शिक्षण " हा होता. हिंदी स्त्रियांची सर्व प्रकारें उन्नति करण्यासाठीं झटणें हें सरोजिनींचें एक महत्त्वाचें जीवितकार्य होतें. त्यांच्या राजकारणाइतकेंच या अत्यंत आवश्यक अशा समाजकार्याकडेहि त्यांनीं आयुष्यभर लक्ष दिलें. विलायतेंतून प्रथम आल्यापासून भारतांत स्त्रीदास्य-विमोचनासाठीं जेवढ्या चळवळी झाल्या त्यांत सरोजिनींचा महत्त्वाचा भाग असे. इंग्लंडमधील व्यापक स्त्रीजीवन पाहून त्यांचीं स्त्रीविषयक मतें उदार बनलीं होतीं. कलकत्त्यामधील भाषणांत त्या म्हणाल्या, " प्राचीन काळीं स्त्रियांना जे जे हक्क होते ते ते त्यांना परत द्या. आपली सर्वांगीण उन्नति व प्रगति होण्यासाठीं स्त्रियांच्या सक्रिय सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे. तुम्ही स्त्रियांना सुशिक्षित केलेंत तर आपल्या राष्ट्राचें पुढें कसें होईल याची चिंता बाळगण्याचें कारण नाहीं. ' जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती सर्व जगातें उद्धरी ' ही म्हण सर्व प्रकारें सार्थ करा. नुसतें पुस्तकी ज्ञान म्हणजे

खरें शिक्षण नव्हे. तर, ज्या वातावरणांत आपण राहतों, वागतों, तें सौंदर्यमय व आनंदमय करणें हेंच शिक्षणाचें खरें साध्य आहे. व याच दृष्टीनें स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे." सरोजिनींचें हें भाषण ऐकण्यासाठीं नामदार गोपाळ कृष्ण गोखले आले होते. यापूर्वी गोखल्यांना सरोजिनींनीं प्रथम इंग्लंडमध्यें शिक्षण घेत असतांना पाहिलें होतें. त्या वेळीं एक उदयोन्मुख, होतकरू, व्यासंगी, वाङ्मयप्रेमी अशी कवयित्री म्हणून गोखल्यांचें सरोजिनींकडे लक्ष गेलें होतें, व उभयतांचा कांहींसा परस्पर परिचयाहि झाला. सरोजिनींची बुद्धिमत्ता व प्रतिभा पाहून गोखल्यांना फार आनंद झाला. तसेंच गोखल्यांचीं तळमळीचीं भाषणें व देशसेवेसाठीं त्यांनीं केलेला त्याग हीं पाहून सरोजिनींनाहि गोखल्यांबद्दल आदर उत्पन्न झाला. हळूहळू त्या गोखल्यांना गुरुस्थानीं मानूं लागल्या. आतां या इंग्लंडमधील पूर्वपरिचयाला कलकत्त्यास पुनः उजळा मिळाला. सरोजिनींच्या कलकत्त्यास झालेल्या भाषणानें गोखल्यांच्या मनावर चांगला परिणाम झाला. त्याबद्दल ते सरोजिनींना लिहितात—"मी तुमचें अत्यंत उत्साहानें व आदरानें अभिनंदन करतों. तुमचें भाषण म्हणजे बुद्धिमत्तेचा उत्कृष्ट नमुना तर होताच, पण त्याहून विशेष म्हणजे ज्या वेळीं तुम्ही भाषण करीत होतां त्या वेळीं आपण एका उच्च पातळीवर आरूढ झालों आहोंत असें आम्हां सर्वांस वाटलें." कलकत्त्याच्या व्याख्यानानंतर सरोजिनी व गोखले यांचा परिचय उत्तरोत्तर दृढ झाला. त्यामुळें आपली मानसिक उन्नति कशी झाली हें सांगतांना सरोजिनी म्हणतात—"१९०७ ते १९११ या चार वर्षांच्या दरम्यान गोखल्यांची व माझी पुष्कळदां भेट झाली, हें मी माझें महद्भाग्य समजतें. मुख्यतः मुंबईला मी गेलें कीं तेथें वारंवार त्यांची भेट होई. मद्रास, पुणें, दिल्ली, याहि ठिकाणीं मला त्यांच्या दर्शनाचा लाभ झाला. जेव्हां जेव्हां त्यांची भेट होई तेव्हां तेव्हां मला त्यांच्याकडून तेजस्वी व उत्साहवर्धक संदेश मिळे व माझ्या विचारांना चालना येई. भारतमातेची सेवा करण्यांत तुमचें जीवन-सर्वस्व अर्पण करा असा त्यांच्या उपदेशाचा आशय असे."

कलकत्त्याच्या परिषदेनंतर १९०८ च्या डिसेंबर महिन्यांत मद्रास येथें भारतीय सामाजिक परिषद झाली. तींत सरोजिनींनीं एक महत्त्वाचा ठराव मांडला. विधवांची स्थिति सुधारण्यासंबंधीं तो ठराव होता. विधवांचें परंपरागत चालत आलेलें विरूपीकरण थांबविणें, त्यांच्या शिक्षणासाठीं सोयीसवलती करणें, डॉ. कर्वे यांच्या हिंगणें येथील आश्रमाप्रमाणें जागोजाग आश्रम उघडपणें या गोष्टी तत्परतेनें करण्याबद्दल समाजांतील सर्व जातींच्या लोकांना या ठरावान्वयें विनंति करण्यांत आली. विधवांच्या हिताच्या अशा सुधारणा घडवून आणल्या तरच त्यांना आपलें जीवन मानानें जगतां येईल व समाजांतहि त्या उपयुक्त कार्य करून दाखवितील. विधवांच्या पुनर्विवाहाला समाजानें अडथळे आणूं नयेत अशीहि या ठरावानें शिफारस केली. या ठरावावर बोलतांना सरोजिनींनीं सांगितलें कीं, अशा प्रकारचा ठराव मांडण्याचा प्रसंग येणें ही गोष्टच मुळीं आपल्या राष्ट्राला लांछनास्पद आहे. खरें पाहिलें तर स्त्रियांबद्दलचे बिकट प्रश्न भारतानें हजारों वर्षांपूर्वींच समाधानकारक रीतीनें सोडविले आहेत. ज्या राष्ट्रांत भगवान् मनूसारखे नीतिशास्त्रविशारद होऊन गेले, भूतदयेचा परमोच्च आदर्श जगापुढें ठेवणारे भगवान् गौतमबुद्धासारखे महान् तत्त्वज्ञ ज्या राष्ट्रांत झाले, त्या या भारतवर्षांत स्त्रियांच्या हीन अवस्थेचे पाढे वाचण्याची पाळी यावी, याहून अधिक दैवदुर्विलास कोणता? सरतेशेवटीं त्या म्हणाल्या कीं विधवांच्या शिक्षणाकरितां हिंदुस्थानांत ठिकाठिकाणीं आश्रम स्थापणें हें आपलें आजचें स्त्रीजीवनविषयक कर्तव्य आहे.

याप्रमाणें सामाजिक सुधारणांच्या योजनांकडे लक्ष पुरवीत असतांना हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीकडेहि त्यांचें लक्ष होतें. केवळ काव्योपासना नि काव्यनिर्मिति हें त्यांचें ध्येय आतां राहिलें नाहीं. घराला आग लागली तर कवीनें गाणें गात न बसतां ती आग विझविण्यासाठीं पाणी आणलें पाहिजे या रवींद्रनाथ टागोरांच्या विधानाची सत्यता त्यांना पटली. आपल्या देशांत जें दुःख पसरलें आहे त्याचें निवारण केवळ काव्यानें

होणार नाहीं; त्याकरितां समाजसेवा करावयास पाहिजे, त्या दुःख निवारणासाठीं मर्यादित क्षेत्रांत न राहतां देशव्यापी चळवळी केल्या पाहिजेत असें त्यांना वाटूं लागलें. या कार्यासाठीं त्यांना योग्य मार्गदर्शन हवें होतें. आणि सुदैवानें त्यांना तें मिळालें. या वेळीं नामदार गोखले यांचा कीर्तिसूर्य मध्याह्नीं तळपत होता. आणि त्याच वेळीं त्या धुरंधर राजकारणपटु मुत्सद्दयांशीं त्यांचा परिचय व स्नेह अधिक दृढ होत होता. गोखल्यांच्या मार्गदर्शनानें सरोजिनींना हिंदुस्थानच्या राजकारणाचा चांगला अभ्यास करतां आला. त्यांनीं लोकस्थितीचें सूक्ष्म अवलोकन केलें व हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय त्याची दुरवस्था मिटणार नाहीं; ती दुरवस्था नाहींशी करण्यासाठीं आपण योग्य तें कार्य केलें पाहिजे असें त्यांनीं ठरविलें.

आतांपर्यंत गोखले व सरोजिनी यांच्या अनेक प्रसंगीं ठिकठिकाणीं गांठीभेटी झाल्या होत्या; परंतु त्या अधूनमधून होत असत. सतत एकाच ठिकाणीं दोघांचें वास्तव्य व भेटी होण्याचा योग अजून आला नव्हता, तो १९१२ सालीं आला. या वर्षीं आपल्या वडिलांबरोबर त्या कलकत्त्यास गेल्या व तेथेंच कांहीं दिवस राहिल्या. त्यांच्या घरींच गोखले उतरले. त्यामुळें कलकत्त्याच्या या मुक्कामांत गोखल्यांशीं त्यांचा दाट परिचय झाला. राष्ट्रापुढील अनेक सामाजिक नि राजकीय प्रश्नांवर त्यांची चर्चा होई. एक दिवस गोखले सरोजिनींना विनोदानें म्हणाले, "आतांपर्यंत तुम्ही एखाद्या पक्ष्याप्रमाणें एकसारख्या इकडे तिकडे विहार करीत होतां; पण आतां मात्र तुम्हांला बराच काळ पिंजऱ्यांत ठेवून तुमची खरी ओळख मी करून घेणार आहें." एकदां गोखले अत्यंत खिन्न व उदास अंतःकरणानें त्या वेळच्या घडामोडींबद्दल विचार करीत बसले होते. इतक्यांत सरोजिनी तेथें आल्या. गोखल्यांच्या मनांत आपल्या देशाचें पुढें काय होणार हाच विचार मुख्यत्वें चालला होता. सरोजिनी येतांच गोखल्यांनीं त्यांना एकदम विचारलें, "आपल्या देशाच्या भवितव्याविषयीं तुम्हांला काय वाटतें?" "भवितव्य आशाजनक आहे,"

असें सरोजिनींनीं उत्तर देतांच गोखल्यांनीं पुन्हा प्रश्न केला, " हिंदुस्थानचें लवकरच काय होईल ? " त्याला सरोजिनींनीं उत्तर दिलें " पांच वर्षांच्या आंत हिंदु-मुसल्मानांचें ऐक्य होईल. " या उत्तरांत सरोजिनींचा आनंद नि आत्मविश्वास व्यक्त होत होता. पण तें उत्तर ऐकतांच गोखले मोठ्यानें हसले. त्या हास्यांत त्यांची निराशा व विषण्णता स्पष्ट दिसत होती. ते म्हणाले, " तुम्ही कवयित्री आहांत. तुमच्या आशेची उडी भलतीच उंच आहे. तुम्ही म्हणतां तें ऐक्य माझ्या आयुष्यांत तर होणार नाहींच. पण तुमच्याहि हयातींत होणार नाहीं. तरीपण कांहीं हरकत नाहीं. तुम्ही श्रद्धेनें या कार्याला लागा. " पुढें हिंदु-मुस्लिम-ऐक्य हें सरोजिनींनीं आपलें जीवित-कार्य ठरविलें. या ऐक्यामुळेंच देशाची उन्नति होईल असा त्यांचा विश्वास होता. त्यांनीं त्या दृष्टीनें आपल्या उद्योगाला सुरुवात केली. " हिंदु-मुस्लिम-ऐक्य हें माझें एक स्वप्न आहे व त्याकरितां मीं माझें जीवित वेंचलें आहे, " या त्यांच्या उद्गारांवरूनच हें कार्य किती बिकट पण अवश्य होतें याची त्यांना जाणीव झाली होती हें स्पष्ट दिसून येतें. त्यांना आपल्या हिंदु-मुस्लिम-ऐक्याच्या प्रयत्नांत शेवटीं यश किती मिळालें हा विचार वेगळा आहे. परंतु त्या ऐक्याबद्दलची त्यांची तीव्र तळमळ नि शुद्ध हेतु यांना यशापयशाचें माप लावतां येणार नाहीं. आपल्याला उदात्त वाटत असलेल्या ध्येया-करितां अखेरपर्यंत कार्य करीत राहावयाचें अशी त्यांची मनीषा होती. लखनौ येथें ता. २३ मार्च १९१३ रोजीं भरलेल्या मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत त्यांनीं जोरदार भाषण करून हिंदु-मुस्लिम सलोखा राहणें किती आवश्यक आहे हें आपल्या रसाळ, काव्यमय व स्फूर्तिप्रद वाणीनें मुसल्मानांना पटवून दिलें. राजकारणाच्या विषयावर सार्वजनिक रीतीनें केलेलें सरोजिनींचें हें पहिलें प्रभावी भाषण होतें. ब्रिटिशांबरोबर चाल-णाऱ्या झगड्यांत हिंदूंबरोबर सहकार्य करण्याचा ठराव त्या मुस्लिम अधिवेशनांत एकमतानें संमत झाला. या ठरावाचा परिणाम असा झाला

कीं त्याच वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत कराची येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत मुसलमान बहुसंख्येनें उपस्थित होते. या कॉंग्रेसमध्यें हिंदु व मुसलमान यांनीं एक होऊन सहकार्यानें सर्व प्रकारच्या चळवळी कराव्या असें ठरविण्यांत आलें. तरीपण मोर्लेमिंटो सुधारणांनीं जे जातवार मतदारसंघ लादले होते ते कांहीं नष्ट झाले नाहींत. उलट हिंदु-मुस्लिम-ऐक्य होऊं नये यासाठीं ब्रिटिश सरकार व कांहीं अराष्ट्रीय लोक हे आटोकाट कारवाया करीत होते. तरीसुद्धां उभय जमातींत स्नेहभाव राहावा, व त्यांचे संबंध दुरावूं देऊं नयेत याकरितां केलेल्या प्रयत्नांत आपणांला बरेंच यश मिळालें याबद्दल सरोजिनींना आनंद झाला. ताबडतोब त्या पुण्यास गेल्या व तेथें गोखले यांना भेटून त्यांनीं आपली कामगिरी त्यांना निवेदन केली. या वेळीं गोखले आजारीपणानें बरेच अशक्त झाले होते. सरोजिनींनीं मिळविलेल्या यशाची बातमी ऐकून गोखल्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. ते जिन्याच्या पायऱ्या भराभर चढत होते. सरोजिनी त्यांच्या बरोबर होत्या. त्या म्हणाल्या, "आपण फार अशक्त व आजारी आहांत. या पायऱ्या कशा चढणार?" गोखल्यांनीं चटकन् उत्तर दिलें, "तुम्ही माझ्या ठिकाणीं नवीन आशा निर्माण केली आहे. कोणत्याहि परिस्थितीला तोंड देण्याइतकी व काम करण्याइतकी ताकद आतां माझ्यांत आली आहे." गोखल्यांच्या या उद्गारांनीं सरोजिनींना धन्यता वाटली. "न निश्चितार्थाद् विरमन्ति धीराः" या उक्तिप्रमाणें त्यांनीं आपलें अंगीकृत कार्य आशावादयुक्त अंतःकरणानें पुढें चालविलें.

## दुसरा काव्यसंग्रह

या सुमारास थोडें आधीं १९१२ सालीं सरोजिनींचा दुसरा काव्यसंग्रह "दि बर्ड ऑफ टाइम" या नांवानें प्रसिद्ध झाला. हा इतका लोकप्रिय झाला कीं त्याच्या पांच आवृत्त्या निघाल्या. तो प्रथम प्रसिद्ध झाला तेव्हां गॉस साहेबांना लिहिलेल्या एका पत्रांत त्या

८९३६

म्हणतात–“ माझ्या जीविताचें अंतिम ध्येय काव्यलेखन हें आहे. पण एखादी कविता-काव्याची एखादी ओळ कां होईना–माझ्या हातून अशी निर्माण व्हावी कीं जी चिरकाल टिकेल; अशी माझी इच्छा आहे. या इच्छेमुळें, या आशेमुळें मला श्रेष्ठ आनंद नि अनिर्वचनीय दुःख हीं एकदमच प्राप्त होतात. कदाचित् ती पुरी होण्यापूर्वीच मला मृत्यु गांठील ! ” यावर गॉस साहेबांनीं लिहिलें कीं, “ तुमचा हा नवीन काव्यसंग्रह वाचणाराला तुमची भीति अनाठायीं वाटेल, कारण तुमचें काव्य वाचून त्याला निश्चितपणें आनंदच होणार आहे. ” या काव्यसंग्रहाला गॉस साहेबांनीं प्रस्तावना लिहिली आहे, तींत ते म्हणतात–“ सरोजिनी या सर्वच बाबतींत पूर्णपणें स्वयंप्रेरित आहेत. हिंदुस्थानांतलें जीवन हाच त्यांच्या स्वतःच्या जीवनाचा मूलाधार आहे. भारताच्या जीवनाशीं त्या समरस झाल्या आहेत. त्यांनीं केवळ काव्यलेखनासाठीं इंग्रजी माध्यम वापरलें आहे, बाकी त्या काव्याचा पाश्चिमात्य जीवनाशीं अगर राहणीशीं प्रत्यक्ष कांहीं संबंध नाहीं. इतकें तें काव्य भारतीय जीवनाचें खरें निदर्शक झालें आहे. बाल्यावस्थेंत सरोजिनी या रमणीय व भव्य स्वप्नसृष्टींत वावरल्या. हिंदुस्थानच्या गटे किंवा कीट्स् आपण व्हावें अशी त्यांची आकांक्षा होती. अजूनहि सौंदर्यप्रेम प्रसिद्धिलालसा या वैभवशाली उद्रेकभावना त्यांच्या जिवंत अंतःकरणांत प्रभावी आहेत. ” तात्त्विक विचारांचें गांभीर्य नि संगीताची अभिरुचि, कला आणि जीवन, सृष्टि आणि मानवी व्यवहार यांचा दिव्य मधुर संगम या काव्यांत झाला आहे. “ प्रेम व मरण ” असे त्यांच्या काव्याचे विषय आहेत. मृत्यु हळूच त्यांच्या कानाशीं येऊन म्हणतो, “ मी तुला दुःखापासून सोडविण्यासाठीं आलों आहें. या दुःखांतून तुझी सुटका झाली म्हणजे तुला नवीन आनंदातिशयाची प्राप्ति होईल. ” तेव्हां कवयित्री म्हणते–“ हे मृत्यो ! तूं ही सौम्य नि सदय वाणी उच्चारलीस खरी– पण मला तुझे हे शब्द कर्णकटु लागतात. बा मृत्यो ! मी इतकी का ध्येयशून्य वस्तु बनलें आहें ? माझ्यावर जीं दुःखें

कोसळतात त्यांना मी इतकी भिऊन जाऊं? आणि मग त्या भीतीनें गांगरून जाऊन मी माझ्या देशसेवेच्या ध्येयापासून च्युत होऊं? छे, छे, मृत्यो! या लज्जास्पद गोष्टी माझ्याकडून कालत्रयींहि होणार नाहींत." भावनांचा अशा रीतीचा सखोलपणा, जीवनाविषयीं विशाल दृष्टिकोन, आणि नवभारताच्या निर्मितीची तळमळ हीं या काव्यांत व्यक्त झालीं आहेत.

त्यांचा हा काव्यसंग्रह सरोजिनी गोखल्यांच्या सहवासांत असतांना प्रसिद्ध झाला. त्यांच्या सहवासांत त्यांना राजकारणाचें शिक्षणहि मिळत होतें. हा संग्रह प्रसिद्ध झाल्यानंतर सुमारें दोन वर्षें म्हणजे १९१४ सालपर्यंत सरोजिनी या विलायतेंतच गोखल्यांच्या सहवासांत होत्या. त्यांच्या अनेक बैठकी होत. देशाच्या सेवेंत किती अपूर्व आनंद भरलेला आहे याचीं रसाळ वर्णनें गोखले त्यांच्यापाशीं करीत. अनेक विषयांवर संभाषणें होत असत. सार्वजनिक सभांतूनहि त्या दोघांनीं हिंदुस्थानच्या परिस्थितीवर विचार-विनिमय केला. लवकरच गोखले फार आजारी पडले तेव्हां भेटीस येणाऱ्या लोकांचें येणें बंद करावें लागलें; पण सरोजिनींना भेटीची बंदी नव्हती. एवढेंच नव्हे तर, गोखल्यांना बरें वाटावें म्हणून मोटारींतून मोकळ्या हवेंत फिरावयास जावें, एखाद्या उद्यानांत किंवा उघड्या हिरवळीवर बसून बोलावें, चर्चा करावी असा त्यांचा कांहीं दिवस क्रम चालू होता. ता. ८ ऑक्टोबर १९१४ या दिवशीं सरोजिनींची गोखले यांच्यांशीं शेवटची भेट झाली. कारण पुढें दोन दिवसांनीं सरोजिनी हिंदुस्थानाकडे परत यावयास निघावयाच्या होत्या. त्या वेळीं गोखल्यांचा निरोप घेण्यासाठीं त्या गेल्या तेव्हां गोखले त्यांना म्हणाले, "आतां पुन्हा आपली भेट होईल असें मला वाटत नाहीं. मी जाईन पण तुम्ही राहणार आहांत. तर लक्षांत ठेवा, तुम्ही आपलें जीवित देशसेवेला वाहिलेलें आहे. आतां माझें काम संपलें." गोखल्यांचा निरोप

वेळांना सरोजिनींना वाईट वाटले; परंतु गोखल्यांनीं दिलेला हा शेवटचा संदेश त्यांनीं आपल्या हृत्पटलावर कायमचा कोरून ठेवला.

## राजकीय क्षेत्रांत प्रवेश

सरोजिनी हिंदुस्थानांत परत आल्या तेव्हां त्यांनीं पाहिलें कीं, यापुढें काव्यनिर्मिति व काव्योपासना करण्यापेक्षां कर्तव्याच्या कठोर हांकेलाच ओ दिली पाहिजे. यापुढें देशाच्या स्वातंत्र्याकरितांच झटलें पाहिजे. हे विचार त्यांच्या भावनाप्रधान मनांत प्रबळ होऊं लागले, व त्यांनीं लवकरच देशाच्या राजकीय क्षेत्रांत प्रवेश केला. ते दिवस राष्ट्रांत महत्त्वाच्या घडामोडीचे होते. मवाळ व जहाल एकमेकांपासून दूर जात होते. हिंदु व मुसलमान यांचे सलोख्याचे संबंध तुटत चालले होते. ब्रिटिश सरकारकडून या घटनेला मदत होत होती. तथापि राष्ट्राचे पुढारी ऐक्यासाठीं प्रयत्न करीत होते. या वेळीं श्रीमती ॲनी बेझंट यांनीं आपल्या होमरूल लीगची चळवळ सुरू केली. हिंदुस्थानानें स्वराज्याकरितां ब्रिटिश सरकारकडे अर्जविनंत्या करण्याचे मार्ग टाकून द्यावे व स्वराज्य हा आमचा हक्क आहे या भूमिकेवरून यापुढील चळवळी कराव्या असें ॲनी बेझंटचें म्हणणें होतें. १९१४ सालीं भरलेल्या मद्रास काँग्रेसच्या अधिवेशनांत बेझंटबाई काँग्रेससंस्थेंत सामील झाल्या. त्यांनीं थिऑसफीच्या क्षेत्रांतून काँग्रेसच्या राजकीय कार्यक्षेत्रांत उडी घेतली, व याच वेळीं सरोजिनींनीं बेझंट बाईंच्या पावलावर पाऊल ठेवलें; व काव्यक्षेत्र सोडून राजकारणाच्या प्रांगणांत प्रवेश करून घेतला. सरोजिनींचा अदम्य उत्साह व बुद्धिचातुर्य पाहून बेझंटबाईंनीं त्यांना "देवी" ही पदवी दिली. तेव्हांपासून त्यांना "देवी सरोजिनी नायडू" असें संबोधण्यांत येऊं लागलें. याप्रमाणें बेझंटबाईंच्या सहवासानें सरोजिनी देवी होमरूलच्या चळवळींत येऊन प्रथम राजकारणांत दाखल झाल्या. यापुढें राजकारणाची स्थिति झपाट्यानें पालटत चालली.

पुढारीवर्गांत बदल झाला. १९१५ पर्यंत काँग्रेसमध्यें मवाळपक्षाचें किंवा नेमस्तपक्षाचें प्राबल्य होतें. पण यापुढें त्या पक्षाच्या हातीं काँग्रेस राहिली नाहीं. राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं काँग्रेसमध्यें लवकरच आपलें सामर्थ्य वाढविलें. सत्ता राष्ट्रीय अशा 'जहाल' पक्षाच्या हातीं गेली व काँग्रेसच्या राजकारणांत नवजीवनाचा संचार झाला.

१९ फेब्रुवारी १९१५ रोजीं गोखले दिवंगत झाले. तेव्हां साहजिकच सरोजिनींना अत्यंत दुःख झालें. सरोजिनींच्या आयुष्याला विशिष्ट वळण देणारे जे दोन थोर देशभक्त पुढारी झाले त्यांत गोखले हे एक होते, व त्यांच्या मृत्यूनंतर महात्मा गांधी हे होते. महात्माजींच्या अनुयायांमध्यें सरोजिनींची योग्यता श्रेष्ठ प्रतीची होती. तसेंच म्हणावयाचें झालें तर सरोजिनींनीं आपल्या आयुष्यभरांत पुढारी होण्याची आकांक्षा कधींच धरली नाहीं. "विपद्युच्चैः स्थेयं पदमनुविधेयं च महताम्" या कविवचनानुसार संकटकाळीं मनाची पातळी उच्च ठेवून थोर नेत्यांचें अनुयायित्व नि सेवकत्व हें मात्र त्यांनीं उत्कृष्ट बजावलें व ह्याच मार्गानें देशकार्य करण्यांत त्यांनीं धन्यता मानली. पुढारी व्हावयाचें असेल तर प्रथम आज्ञापालन उत्तम करा अशा अर्थाची एक म्हण इंग्रजींत आहे. परंतु या म्हणींत आज्ञापालन करणाऱ्याला जी पुढारीपणाची भावी आशा दाखविली आहे त्या आशेलासुद्धां सरोजिनींनीं कधींहि थारा दिला नाहीं. त्यांची ही सेवावृत्ति स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि कायम राहिली. मध्यप्रदेशाचें गव्हर्नरपद जेव्हां त्यांना देण्यांत आलें, तेव्हां त्या म्हणाल्या "मी वास्तविक 'गव्हर्नर' नसून 'गव्हर्नेस' म्हणजे लोकांची एक सेविका आहें; व असेंच मला सर्वांनीं समजावें." असो. गोखल्यांच्या निधनानें आपला मोठा आधार ढांसळला, असें त्यांना वाटणें स्वाभाविक होतें. भारतवर्षाचे इंग्लंडमधील वकील असें त्या गोखल्यांचें वर्णन करीत. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या महान् नि त्यागमय जीवनकार्यावर सरोजिनींनीं एक सुंदर लेख लिहिला, व "गोखले" या नांवाची एक हृदयस्पर्शी

कविताहि लिहिली. "हे शौर्यशाली महापुरुषा! तुझ्या चितेभोंवतीं तुझे लक्षावधि देशबांधव शोकाकुल अंतःकरणानें जमले आहेत. त्यांनीं तुझ्या हातांतून गळून पडलेल्या पवित्र दीपज्योतीनें आपलीं हृदयें उज्ज्वल करावींत. तूं निर्माण केलेल्या स्फूर्तीतून या दुःखी भूमीचें संरक्षण नि सेवा करण्याचें व ऐक्यस्थापनेचें सामर्थ्य त्यांना प्राप्त व्हावें." अशी आपल्या काव्यमय शब्दांत त्यांनीं गोखल्यांना आदरांजलि वाहिली. त्यांच्या चारित्रानें आपल्याला एक बहुमोल धडा शिकविला आहे तो हा कीं, मानवजातीची सेवा ही हृदयांतल्या खऱ्या प्रेमानें करावी. ती करण्यामागें दुसरा कोणताहि हेतु असतां कामा नये असें गोखल्यांनीं आपल्या स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिलें आहे असें गोखल्यांसंबंधीं आदर व्यक्त करतांना त्या म्हणाल्या. खुद्द गोखले यांनीं आपल्या "सार्वजनिक जीवन" या व्याख्यानांत "आपलें राजकारण अध्यात्म-प्रवण केलें पाहिजे" हें तत्त्व प्रतिपादिलें होतें. हें तत्त्व आचरणांत आणण्याचा सरोजिनींनी निश्चय केला; व म्हणून राजकारणाच्या धकाधकींत नि प्रक्षुब्ध वातावरणांत वावरत असतांनाहि त्यांनीं आपल्या मनाची शांति नि प्रसन्नता कधीं ढळूं दिली नाहीं. राजकारणांत प्रवेश केला तरी त्या कवि होत्या; तत्त्वनिष्ठ ध्येयवादी कवि होत्या. त्यांचा हा काव्यमय आत्मा दुःखांतहि आनंद करूं शकला व त्यामुळें राजकारणाची पातळी उंच व निष्कलंक राहूं शकली. स्वार्थी लोकांनीं राजकारणांत पडण्यापेक्षां कवीनें व तत्त्ववेत्त्यानें राजकारणांत शिरून त्याचें लांछन धुवून काढावें हेंच युक्त ठरतें. राजकारणांत येऊन सरोजिनींनीं त्याचें पावित्र्य कायम ठेवलें. याप्रमाणें ध्येयनिष्ठेनें प्रेरित होऊन गोखले यांच्या मृत्यूनंतर त्या बेझंटबाईच्या होमरूल लीगच्या चळवळींत सामील झाल्या. याबद्दल वरतीं उल्लेख केला आहेच. यापुढें मुंबई हें त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचें केंद्रस्थान झालें. १९१५ सालीं मुंबईला कॉंग्रेसचें

अधिवेशन झालें. त्या वेळीं सरोजिनी या मध्यप्रांतातर्फे प्रतिनिधि म्हणून कॉंग्रेसला गेल्या. या अधिवेशनांत त्यांचें स्वराज्याच्या ठरावावर जें भाषण झालें त्याबद्दल प्रतिनिधींनीं व प्रेक्षकांनीं त्यांना धन्यवाद दिले. याच अधिवेशनांत त्यांनीं 'Awake' 'माते जागी हो!' ही आपली कविता गाऊन श्रोतृवर्गास चेतना दिली. ही स्फूर्तिदायक राष्ट्रीय कविता त्यांच्या काव्यसंग्रहांत नंतर प्रसिद्ध झाली त्या वेळीं ती त्यांनीं बॅ. जिना यांना अर्पण केली होती. कारण १९१५ सालीं बॅ. जिना यांना त्या हिंदुमुसलमान ऐक्याचे वकील म्हणून मानीत होत्या. असो. याप्रमाणें राजकीय कार्याव्यतिरिक्त सामाजिक कार्यांत व विशेषतः स्त्रीजीवनाच्या उन्नतीकडेहि त्यांचें विशेष लक्ष होतें. या दोन्ही प्रकारच्या कार्यक्षेत्रांत आपल्या सद्यःस्थितींमध्यें मोठा भिन्नता आहे असें मात्र त्यांना वाटत नव्हतें हें त्यांच्या पुढील उद्गारांवरून दिसून येईल. १९१५ सालच्या डिसेंबरांत मुंबईला अखिल भारतीय सामाजिक परिषदेंत त्यांचें स्फूर्तिदायक व्याख्यान झालें. "राष्ट्रीय जीवनांतील स्त्रियांचें महत्त्व" हा व्याख्यानाचा विषय होता. १९१६ च्या जानेवारी महिन्यांत मुंबईच्या चंदारामजी गर्ल्स हायस्कूलमध्यें हिंदी स्त्रियांना उद्देशून अध्यक्षीय भाषण करतांना त्या म्हणाल्या, "स्त्रियांची बौद्धिक उन्नति नि अध्यात्मप्रवण वृत्ति यांमुळें त्यांना आपल्या देशांत मोठी मान्यता मिळाली आहे. स्त्रीवर्गांतला स्वाभिमान जेव्हां नष्ट झाला, तेव्हां त्यांच्या अवनतीला सुरुवात झाली. स्त्री हीच राष्ट्रीय भावनेची उच्चतम कसोटी आहे. स्त्रियांना समाजांत त्यांचें योग्य स्थान मिळालें कीं आपला सर्वांचा महत्त्वाचा प्रश्न सुटला असें होईल. ज्या समाजांतील स्त्रियांत एकत्वाची नि राष्ट्रीयत्वाची भावना जागृत आहे तोच खरा जिवंत समाज होय. समाजाची ध्येयसिद्धि स्त्रियांवर अवलंबून असते. राष्ट्राच्या पुनर्घटनेच्या कार्यांत महिलांचा मान पहिला आहे, म्हणून या थोरवीची जाणीव आपण हिंदी स्त्रियांना करून दिली पाहिजे. हिंदी स्त्री ही कोणाचें बाहुलें किंवा खेळण्याची वस्तु नसून

ती समाजाची चैतन्यदात्री शक्ति आहे." स्त्री-शिक्षणावर बोलतांना त्या म्हणाल्या, "स्त्री-शिक्षण ही राष्ट्रीय पुनर्घटनेंतील एक महत्त्वाची बाब आहे. म्हणून स्त्री-वर्गानें आतां जागृत होऊन कार्याला लागावें. पुरुषवर्गाचे हातहि त्यामुळें बळकट होतील. आपल्या राष्ट्राच्या उद्धारांत पुरुषांबरोबर स्त्री-वर्गानें सहकार्य करणें ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे."

याप्रमाणें महिलांची जागृति करीत असतांना त्यांनीं लवकरच लोकमान्य टिळकांच्या होमरूल लीगतर्फे काम केलें. लोकहिताच्या दृष्टीनें जें अधिक श्रेयस्कर असेल त्याला अनुसरण्यास त्या नेहमीं तत्पर असत. लोकमान्यांच्या प्रभावी नेतृत्वानें त्यांना आकर्षित केलें. लो. टिळक १९१५-१६ सालानंतर हिंदुस्थानाचे अनभिषिक्त राजे झाले. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे," या आपल्या दिव्य मंत्रघोषानें त्यांनीं सारा भारतवर्ष निनादून सोडला. १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसमध्यें लोकमान्यांच्या होमरूल लीगच्या प्रभावी प्रचारानें त्यांच्या राष्ट्रीय पक्षाची सरशी झाली. या कॉंग्रेसनें कॉंग्रेसलीग योजना व हिंदु-मुसलमानांचें ऐक्य या सरोजिनींना अत्यंत प्रिय वाटणाऱ्या दोन मोठ्या गोष्टी साध्य केल्या. अर्थातच सरोजिनींना त्यामुळें आनंद झाला. या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत अध्यक्षांच्या विनंतीवरून त्यांनीं हत्यारांच्या कायद्याच्या ठरावावर भाषण केलें. त्यांत त्या म्हणाल्या, "शस्त्रें बाळगण्याचा वापरण्याचा व आमचा हक्क हिरावून घेणें हा आमच्या राष्ट्रांतील वीरवृत्तीचा उघड उघड अपमान आहे. आमच्या लाखों शूर तरुणांना हत्यारें वापरण्याची बंदी करणें हा मुळीं साम्राज्यालाच मोठा धोका आहे. माझ्या भारतीय नागरिकांनो, तुमच्या पूर्वजांना जे अधिकार होते ते तुम्हांला व तुमच्या मुलांबाळांना मिळावेत या आमच्या ठरावाला व हक्काच्या मागणीला तुम्ही दुजोरा द्यावा अशी माझी आपणांस कळकळीची प्रार्थना आहे." या कॉंग्रेसमध्यें मांडलेला स्वराज्याचा ठराव सर्वांत महत्त्वाचा होता. त्या ठरावाला पाठिंबा देतांना सरोजिनींनीं वक्तृत्वपूर्ण भाषण केलें. त्या म्हणाल्या, "वैयक्तिक सुखापेक्षां मातृभूमीची

सेवा करण्यांत अधिक आनंद आहे असें ज्याला वाटत नाहीं असा कोणताहि अवनत, दुर्बळ नि स्वार्थलंपट मनुष्य नसेल. आपणा स्वतःला जीं दुःखें होतात त्यांत आपल्याला शांतता जर कशानें लाभत असेल तर मातृभूमीकरितां आपण जे कष्ट सहन करतों त्यामुळेंच होय. तिच्या सेवेनेंच पापांचें क्षालन होईल. तिच्याकरितां आपण जगलों तर आपलें जीवन अत्यंत यशस्वी झालें असें होईल; आणि तिच्याकरितां आपण मेलों तरी त्या मरणानें आपण श्रेष्ठ अशा अमरपदाला जाऊं." हें अधिवेशन संपल्यावर अत्यंत उत्साहप्रेरित अंतःकरणानें त्यांनीं सर्व देशभर प्रचंड दौरा काढला व लोकजागृति केली. लखनौच्या म्यूर सेंट्रल कॉलेजला त्यांनीं भेट दिली तेव्हां कवींचें कार्य कोणतें तें त्यांनीं फार मार्मिक रीतीनें तेथल्या व्याख्यानांत सांगितलें. त्या म्हणाल्या, "मी कवयित्री असलें तरी इकडून तिकडे सतत वाऱ्यासारखी हिंडणारी आहे. कवि हा नुसतीं स्वप्नें रचण्यांत रममाण होऊन जाणारा स्वप्नाळू मनुष्य नव्हे. कवींचें हृदय हें विश्वाच्या भावनांचें प्रतिबिंब आहे. त्याचीं हर्षभरित गीतें म्हणजे जगताच्या हास्याचे प्रतिध्वनि! आणि त्याचीं दुःखामिश्रित कवनें म्हणजे मानवजातींचे अश्रु!" लखनौ सोडल्यावर सरोजिनींनीं विशेषतः मद्रास प्रांतांत पुष्कळ ठिकाणीं सद्यःस्थितीवर प्रचारात्मक व्याख्यानें दिलीं. त्यांत हिंदु-मुस्लिम-ऐक्यावर विशेष भर असे. १९१७ सालीं कांजीवरम् येथें भरलेल्या मद्रास प्रांतिक परिषदेचें अध्यक्षपद त्यांना देण्यांत आलें. याच वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यांत पाटणा येथें भरलेल्या विराट सभेंत हिंदु-मुस्लिम-ऐक्यावर त्यांचें प्रभावी भाषण झालें. सरोजिनींच्या या देशव्यापी दौऱ्यानें या दोन जमातींत सलोखा राहून परस्पर सहकार्यानें "स्वराज्याच्या योजने" बद्दल चळवळ करण्यास बरीच मदत झाली. स्वराज्याच्या योजनेवरचा ठराव १९१७ च्या कलकत्ता काँग्रेसमध्यें मांडण्यांत आला. ही स्वराज्याची योजना काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्या संयुक्त कमिटीनें तयार केलेली होती. या योजनेंत जे स्वराज्याचे हक्क समाविष्ट केले आहेत ते देण्यांत

याकेत असा तो ठराव होता. या ठरावावर सरोजिनींनीं परिणामकारक भाषण केलें. ह्याच वर्षी कलकत्त्यास झालेल्या मुस्लिम लीगच्या बैठकींतहि सरोजिनींनी अलीबंधूंच्या सुटकेच्या ठरावावर भाषण केलें. कॉंग्रेस व लीग या दोन्ही संस्थांचीं अधिवेशनें एकाच शहरांत भरविण्याची प्रथा मुंबई कॉंग्रेसमध्यें सुरू झाली व ती लखनौ आणि कलकत्ता येथें कायम ठेवण्यांत आली होती.

## तिसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध होतो : स्त्रियांच्या उन्नतीचे प्रयत्न

याप्रमाणें ठिकाठिकाणीं राजकीय व सामाजिक जागृति करून सर्व देशभर ऐक्याचें नि सलोख्याचें वातावरण निर्माण करण्याचा उद्योग करीत असतांच सरोजिनींनीं १९१७ सालीं आपला तिसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. त्याला त्यांनीं "ब्रोकन विंग" (मोडका पंख) असें नांव दिलें. या पुस्तकानें "क्रांतिकारक कवयित्री" अशी त्यांची सर्वत्र ख्याति झाली. आपले कोट्यवधि बांधव ब्रिटिशांच्या जुलुमानें पीडित झालेले पाहून त्यांच्या भावनाप्रधान हृदयाला जें दुःख झालें तें या कविता-संग्रहांत व्यक्त झालें आहे. "आजचें स्वप्न नि उद्यांची आशा" यांना त्यांनीं हें पुस्तक अर्पण केलें आहे. आध्यात्मिक जीवनानें भौतिक जीवनावर मिळविलेल्या विजयाचें द्योतक म्हणजे हा त्यांचा काव्य-संग्रह होय. या पुस्तकाला स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेंत स्त्री-जीवनाची महती वर्णन करतांना त्या म्हणतात–"आधुनिक भारतांतील स्त्रिया आतां पुनश्च जागृत झाल्या आहेत. स्त्री ही आपल्या राष्ट्रीय जीवनाचें खरें रक्षण करणारी आहे. प्रेम, श्रद्धा नि स्वदेश-भक्ति हीं त्या राष्ट्रीय जीवनाचीं तीन अंगें आहेत." यावरून राष्ट्रकार्यांत स्त्रियांचें महत्त्व केवढें आहे हें त्यांनीं दर्शविलें आहे. हा काव्यगुच्छ १९१७ सालीं प्रसिद्ध झाला तरी त्यांतल्या कांहीं कविता त्यापूर्वीं नामदार गोखले यांनीं पाहिल्या होत्या. त्या वाचल्यानंतर ते एकदां

सरोजिनींना म्हणाले होते कीं या कवितांना तुम्ही "ब्रोकन विंग" म्हणजे "मोडका पंख" असें नांव कां देतां? तुमच्यासारख्या गानप्रिय कवि-विहंगाचा पंख तुटलेला कां वरें असावा?" त्यावर सरोजिनींनीं त्यांना उत्तर दिलें कीं, "माझ्या या तुटलेल्या पंखानें मी आकाशांत विहार करीन." याप्रमाणें कल्पना साम्राज्यांत जरी त्यांची कविता संचार करीत होती, जरी क्रांतीचे गोडवे त्यांच्या कविता गात होती तरी सरोजिनी या अशा क्रांतिकारक कविता लिहून स्वस्थ बसणाऱ्या नव्हत्या; तर प्रत्यक्ष क्रांतिकार्यांत भाग घेण्यासाठीं त्या आतां पुढें आल्या होत्या. स्त्रियांच्या उन्नतीसाठीं त्यांनीं आयुष्यभर जे परिश्रम केले त्यांना १९१७–१८ पासून विशेष जोराची चालना मिळाली. १९१७ सालच्या अखेरच्या महिन्यांत हिंदुस्थानांतील राजकीय वातावरण मॉंटेग्यू-चेल्मसफर्ड सुधारणांच्या चर्चेनें भरून गेलें होतें. भारतमंत्री मॉंटेग्यू व व्हाइसरॉय लॉर्ड चेल्मसफर्ड हे निरनिराळ्या संस्थांकडून आलेल्या शिष्टमंडळांचें स्वागत करीत होते, व त्यांना मुलाखती देत होते. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या पक्षांशीं चर्चा करून पार्लमेंटपुढें सुधारणांची एक योजना तयार करून ठेवावयाची हें काम भारतमंत्री मॉंटेग्यू यांचेकडे सोंपविलें आहे असें म्हटलें जात होतें. परंतु हिंदुस्थानाला काय व किती द्यावयाचें तें मात्र आधींच योजून ठेवलेलें होतें! फक्त आपण आधींच तयार करून ठेवलेल्या योजनेला हिंदुस्थानांत कितपत पाठिंबा मिळतो हें मॉंटेग्यूंना अजमावयाचें होतें! हिंदुस्थानांत आल्यावर मॉंटेग्यूंनीं ज्या शिष्टमंडळांच्या भेटी घेतल्या त्यांत भारतीय स्त्रियांचें एक शिष्टमंडळ होतें व सरोजिनी या शिष्टमंडळाच्या पुढारी होत्या. त्यांत एकंदर १४ स्त्रिया निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या होत्या. या मंडळानें मद्रास येथें तारीख १८ डिसेंबर १९१७ या दिवशीं मॉंटेग्यू व चेल्मसफर्ड यांची भेट घेतली, व भारतीय स्त्रियांच्या हक्कांची मागणी त्यांच्यापुढें निवेदन केली. स्त्रीशिक्षण, स्त्रियांची आरोग्यविषयक सुधारणा, प्रसूतिगृहांच्या सोई, स्थानिक स्वराज्यसंस्था व विधिमंडळें यांत

प्रतिनिधि निवडून देतांना पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांना मताधिकार, इत्यादि स्त्रीजीवनविषयक अनेक महत्त्वाच्या प्रश्नांची या शिष्टमंडळानें मॉंटेग्यू यांच्या भेटींत चर्चा केली. याप्रमाणें स्त्रियांचे योग्य ते नागरिकत्वाचे सर्व हक्क येत्या सुधारणांच्या द्वारा मान्य करण्यांत यावे अशी आग्रहाची विनंति शिष्टमंडळानें केली. स्त्रियांनीं मतदानाच्या हक्काची मागणी करण्याची ही पहिलीच वेळ होती. यापूर्वी कोणीहि अशी प्रातिनिधिक मागणी केली नव्हती. स्त्रीवर्गाच्या जागृतीचें हें सुचिन्ह होतें व या जागृतीच्या प्रयत्नांत सरोजिनींचें कार्य महत्त्वाचें होतें. भारताच्या राजकीय व शैक्षणिक क्षेत्रांत स्त्रिया कार्य करीत आहेत; स्त्रीवर्गांत सध्यां कित्येक विदुषी, अध्यापिका, वकील, डॉक्टर, न्यायाधीश आहेत, कित्येक स्थानिक स्वराज्यसंस्था व विधिमंडळांच्या सभासद आहेत, विविध क्षेत्रांत सामाजिक कार्य करीत आहेत, उत्तरोत्तर महिलांमध्यें जागृति वाढत आहे—त्याचें श्रेय सरोजिनींच्या महिलाविषयक चळवळींना विशेषेंकरून आहे. स्त्रियांची संघटना व व जागृति करण्यांत त्यांना कुठलाहि जातिपंथ आडवा आला नाहीं. स्त्रीजीवनासंबंधीं सारे महत्त्वाचे प्रश्न हे जातिपंथ-निरपेक्ष असतात ही एक उल्लेखनीय गोष्ट आहे. १९१७ सालीं डॉ. ॲनी बेझंट यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्याला कॉंग्रेस झाली त्या वेळीं स्त्रियांच्या मताधिकारासंबंधीं एक महत्त्वाचा ठराव होता. त्यावर बोलतांना सरोजिनी म्हणाल्या, " स्त्री या नात्यानें मी तुम्हांस सांगतें कीं, जेव्हां तुमच्यावर बाका प्रसंग येईल त्या वेळीं तुमचें कार्य, तुमच्या हातांतली जळती मशाल घेऊन भारतीय स्त्रिया पुढें चालवितील, हें निश्चित आहे. तुम्हांला त्या प्रोत्साहन देतील. चितोडच्या पद्मिनी देवीची वीरवृत्ति आजहि भारतीय महिलांच्या अंगीं आहे." या कलकत्ता कॉंग्रेसच्या अध्यक्ष डॉ. ॲनी बेझंट यांनीं स्वतः स्त्रीजीवनाचा विशेष विचार केलेला होता, आणि भारतीय स्त्रियांबद्दल त्यांना अत्यंत आदर वाटत होता. त्यामुळें कॉंग्रेसमध्यें सरोजिनी-बेझंट यांचा रत्न-कांचन-संयोग झालेला होता. अर्थातच स्त्रियांच्या मताधिकाराच्या

ठरावाला विशेष महत्त्व प्राप्त झालें यांत आश्चर्य नाहीं. बेझंटबाईंनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण भाषेंत सांगितलें कीं, राणी दमयंती, गांधारी, चितोडची राणी पद्मिनी, मीराबाई, चांदबिबी, अहिल्याबाई होळकर यांच्यासारख्या असंख्य भारतीय स्त्रिया राष्ट्राला आदर्श झाल्या आहेत. असो. शेवटीं कॉंग्रेसनें ठराव केला कीं, "मतदानाच्या बाबतींत व स्थानिक स्वराज्य-संस्था व शिक्षणसंस्था याकरितां उमेदवार होण्यासाठीं जे नियम पुरुषांना लागूं केले आहेत, त्यांची अंमलबजावणी स्त्रियांच्या बाबतींतहि करावी." कॉंग्रेसचें अधिवेशन संपल्यावर सरोजिनींनीं अनेक ठिकाणीं दौरा काढून या विषयावर व्याख्यानें दिलीं. विजापूर येथील मुंबई प्रांतिक परिषदेंत हिंदी स्त्रियांस राजकीय मताधिकार मागण्याचा ठरावावर त्यांचें भाषण झालें. त्यानंतर सप्टेंबर १९१८ सालीं मुंबईला जादा कॉंग्रेस झाली तोंपर्यंतच्या काळांत त्यांनीं दिल्ली, पंजाब, सिंध वगैरे भागांतून दौरे काढले. त्याच वर्षीं दिल्लीला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें, तेव्हां तेथें भरलेल्या दुसऱ्या समाज-सेवा-संघ परिषदेचें अध्यक्षस्थान त्यांना देण्यांत आलें. आपली उज्ज्वल पूर्वपरंपरा कायम ठेवून आपण प्रगतिपथावर कसें राहावें याचें त्यांनीं सर्व ठिकाणीं स्त्रियांना मार्गदर्शन केलें. त्या आपल्या रसाळ नि नि स्फूर्तिदायक वाणीनें सीता सावित्रीच्या आदर्श जीवनाचें चित्र त्यांच्या पुढें उभें करीत. हिंदी स्त्रियांचें शौर्य, पावित्र्य व स्वदेशनिष्ठा किती उच्च प्रतीची होती हें त्या अनेक उदाहरणें देऊन सिद्ध करीत. हिंदी स्त्रियांनीं सुमाता व सुगृहिणी व्हावें ही त्यांची तळमळ त्यांच्या भाषणांतून व्यक्त होई. हिंदी स्त्रियांच्या थोरवीवर व पावित्र्यावर राष्ट्राची थोरवी व पावित्र्य अवलंबून आहे. त्या जर अज्ञानांत राहिल्या तर देशहि अज्ञानांतच राहील व मग अशा देशाचा भाग्योदय कधींच होणार नाहीं, असें त्यांचें सांगणें असे. परंतु एवढेंच सांगून सरोजिनी संतुष्ट नव्हत्या. तर स्त्रियांनीं ज्याप्रमाणें सुमाता व सुगृहिणी व्हावें त्याप्रमाणें त्यांनीं राष्ट्राच्या समष्टि जीवनांतहि भाग घ्यावा व त्यासाठीं त्या उत्तम नागरिक व देशसेविका

झाल्या पाहिजेत असें त्यांचें म्हणणें असे. याप्रमाणें स्त्रीसमाजांत जागृति करीत असतांना याच वेळीं दक्षिण-आफ्रिकेंतील हिंदी लोकांची व विशेषतः हिंदी मजुरांची दुःस्थिति त्यांनीं लोकांच्या नजरेस आणली. त्याकरितांहि त्यांनीं हिंदुस्थानभर दौरा काढला. दक्षिण-आफ्रिकेंतील करारबंद मजूर-पद्धति पूर्णपणें बंद करण्यांत यावी, त्यांचीं गाऱ्हाणीं दूर होईपर्यंत आपण स्वस्थ बसतां कामा नये हें त्यांनीं भाषणांतून प्रतिपादन केलें. यावर १९१७ च्या कलकत्ता कॉंग्रेसनेंहि ठराव केला. या सर्व वेळीं प्रकृति बरी नसतांहि त्यांनीं दौऱ्याची दगदग सहन केली व अविश्रान्त परिश्रम केले.

## विलायतेंतील कामगिरी

देशांत राजकीय चळवळींचा जोर वाढत होता. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी या थोर मान्यवर नेत्यांच्या मार्गदर्शनानें देशांत विस्मयजनक जागृति होत होती. १९१९ सालीं महात्मा गांधींनीं रौलॅट ॲक्टाविरुद्ध सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. तींत त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला. मद्रास, मुंबई, अहमदाबाद इत्यादि ठिकाणीं चळवळीचा प्रसार यशस्वितेनें केला. तारीख ६ एप्रिलला मुंबईच्या रस्त्यावर आक्षिप्त वाङ्मय उघडपणें विकलें. याप्रमाणें सरकारजमा वाङ्मय विकून त्यांनीं प्रत्यक्ष सत्याग्रहास सुरुवात केली. पुढें १९१९ च्या जुलै महिन्यांत स्त्री-शिष्टमंडळाच्या पुढारी या नात्यानें सुधारणा बिलावर पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढें साक्ष देण्यासाठीं त्या विलायतेस गेल्या. नवीन राजकीय सुधारणांत हिंदी स्त्रियांना पुरुषां-प्रमाणें मताधिकार मिळावा म्हणून तेथें त्यांनीं संघटित व जोराचे प्रयत्न केले. लंडन येथें पार्लमेंटरी सिलेक्ट कमिटीपुढें स्वराज्याच्या हक्कासंबंधीं लोकमान्य टिळकांची साक्ष झाल्यानंतर सरोजिनींची साक्ष झाली. पण या दोघांहि थोर पुढाऱ्यांना कमिटीनें इतरांना विचारले तसे उलट प्रश्न विचारलेच नाहींत! त्यामुळें कमिटीनें काय साधलें तें कमिटीलाच माहीत! नायडूंचा विषय अर्थातच स्त्रियांना मतदानाचा हक्क हा होता.

पण या विषयावर कामिटीनें मात्र आपलें मत आगाऊच बनविलेलें होतें. म्हणजे स्त्रियांना मतदानाचा हक्क न देण्याचें ठरविलें होतें. मतदानाचा हक्क देण्याची जबाबदारी कामिटीला ज्या त्या प्रांताच्या सरकारवर टाकावयाची होती! तरीपण सरोजिनींची साक्ष घेण्यांत आली. प्रारंभीं कामिटीचे अध्यक्ष त्यांना विनोदानें म्हणाले,– "आमच्या कामांत आजवर सगळा नीरसपणाच होता. तो तुम्ही आपल्या काव्यमय वाणीनें घालविणार आहां याबद्दल मी तुमचे आभार मानतों." नंतर सरोजिनींनीं सुमारें अर्धा तासपर्यंत अस्खलित व सुरस भाषण करून स्त्रियांच्या हक्कांचें समर्थन केलें. त्यांचें मुख्य म्हणणें असें होतें कीं, "हिंदुस्थानांतील कांहीं भागांत पडद्याची चाल असली तरी ती चाल ज्या भागांत नाहीं तेथील स्त्रियांना मतदारीचा हक्क द्यावयास हरकत नाहीं. मतें नमूद करण्याची विशेष व्यवस्था हवी असली तरी ती ठिकाठिकाणचे स्थानिक अधिकारी करूं शकतील." सर्व कांहीं आम्हांलाच तेवढें करतां येतें अशी इंग्रजसरकारची फुशारकी होती ती घालविणें जरूर होतें; व त्या दृष्टीनें पाहतां सरोजिनींची साक्ष इष्ट व विचारप्रवर्तक अशीच झाली. ही हिंदी स्त्री किती उत्कृष्ट बोलते व किती प्रगल्भपणें आपले विचार मांडते हें पाहून कामिटीचे सभासद आश्चर्यचकित झाले. हिंदी स्त्रियांच्या बुद्धिमत्तेचा हा नमुना पाहून तर कामिटीला अर्थातच कौतुक वाटलें. डॉ. ॲनी बेझंट यांच्याइतक्या वक्तृत्वपूर्ण वाणीनें सरोजिनींनीं आपलें म्हणणें मांडलें होतें. परंतु स्त्रियांचे मताधिकार कामिटीनें मान्य केले नाहींत यावरून इंग्रजांच्या मनावर या युक्तिवादाचा कांहीं परिणाम झालेला दिसला नाहीं. यानंतर सरोजिनींनीं स्त्रियांच्या हक्कांसंबंधीं इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स या सर्व ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. त्यांचीं भाषणें लोकांना फार आवडत. दाक्षिणवेल्स, बोर्नमाउथ्, साउदॅम्पटन, एडिंबरो इत्यादि ठिकाणीं त्या लोकमान्य टिळक, खापर्डे यांच्याबरोबर व्याख्यानाच्या दौऱ्यावर गेल्या होत्या. टिळकांची मुत्सद्देगिरी, खापर्ड्यांचा विनोद नि

सरोजिनींचें वक्तृत्व या सर्वांची छाप श्रोतृवर्गावर आश्चर्यकारक रीतीनें पडे. ग्लासगो, न्यूकॅसल वगैरे ठिकाणीं व्याख्यानें झालीं. त्या वेळीं खापर्डे व पालबाबू हे त्यांचेबरोबर होते. सिलेक्ट कामिटीपुढें साक्ष देण्यासाठीं बरींच शिष्टमंडळें हिंदुस्थानांतून गेलेलीं होतीं. त्या सर्वांत एकोपा राहावा यासाठीं सरोजिनींची फार खटपट असे. एक दिवस त्यांनीं या विविध शिष्ट-मंडळांतील लोकांना भोजनाचें निमंत्रण केलें, व विचारविनिमय केला. त्या सर्व पक्षांशीं समत्वानें वागत. या सर्व शिष्टमंडळांत जे मतभेद झाले होते त्यांच्यांतील ऐक्याची आवश्यकता दर्शवितांना त्या म्हणाल्या— "मला ऐक्यभावनेचें वेडच लागलेलें आहे असें पुष्कळ वेळां लोक म्हणतात. परंतु खरोखरच मी असें समजतें कीं राष्ट्रांतील बेकी हीच मारक व ऐक्य हीच तारक शक्ति आहे. जेव्हां कार्य उदात्त असतें, निर्मळ असतें आणि तत्कालीन राजकारणांतील विकार नि डामडौल यांपासून अलिप्त असतें तेव्हांच त्यांत ऐक्य शक्य होतें."

साक्षीचीं व प्रचाराचीं कामें संपल्यावर सरोजिनी हिंदुस्थानांत परतल्या. पण त्यांची प्रकृति बिघडल्यानें त्या १९२० सालीं पुन्हा इंग्लंडला गेल्या. त्या वेळीं हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति अधिकाधिक क्षोभकारक होऊं लागली होती. पंजाबांत सरकारी अधिकाऱ्यांनीं गरीब जनतेवर अनन्वित अत्याचार व जुलूम केले होते. या पंजाब प्रकरणांतील दुष्कृत्यांवर साफसुफी करण्यासाठीं सरकारनें हंटर चौकशी कामिशनची नेमणूक केली, पण त्या कामिशनवर कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांचा एकहि प्रतिनिधि घेतला नाहीं. तशांत जखमेवर मीठ चोळावें त्याप्रमाणें हिंदुस्थान-सरकारनें इंडेम्निटी बिल (नुकसानभरपाईचें बिल) पास केलें. या बिलानें, जे अधिकारी गुन्हेगार ठरतील त्यांना शिक्षा न होण्याची तजवीज करून ठेवली. व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आणणारीं रौलेट बिलांसारखीं काळीं बिलें पास करून घेतलीं. याबद्दल वर उल्लेख आलाच आहे. हंटर कमिटीचा रिपोर्ट बाहेर पडला त्या रिपोर्टांत पंजाब-प्रकरणांतील अत्याचारी अधिकारी डायर

व ओडवायर यांना निर्दोषी ठरविण्यांत आलें. आणखी एक प्रक्षोभकारक घटना झाली. ती म्हणजे इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. लॉइड जॉर्ज यांनीं हिंदुस्थानांतील मुसलमानांना दिलेलीं अभिवचनें पूर्ण केलीं नाहींत, आणि तुर्की साम्राज्याचा आशियांतील खलिफाच्या हद्दींतला भाग ब्रिटन व फ्रान्स यांनीं वांटून घेतला! त्यावरून हिंदी मुसलमानांनीं चळवळ सुरू केली. तिलाच खिलाफतीची चळवळ म्हणतात. या चळवळीला महात्मा गांधींनीं पाठिंबा दिला. मुसलमानांचें समाधान होईल अशा रीतीनें तुर्की साम्राज्याचा प्रश्न जर विचारांत घेतला जाणार नाहीं तर सरकारशीं असहकारितेची चळवळ मी माझ्या नेतृत्वाखालीं सुरू करीन असें गांधीजींनीं जाहीर केलें. पट्टाभिसीतारामय्या यांच्या शब्दांत सांगावयाचें तर या वेळीं "खिलाफत, पंजाब व अपुऱ्या सुधारणांचा गुप्त प्रवाह ही त्रिवेणी राष्ट्रीय असंतोषरूपी महापुरानें दुथडी भरून चालली." हिंदुस्थानाचें वातावरण याप्रमाणें अशांततेनें ग्रस्त झालें असतांना त्या वेळीं सरोजिनी वर सांगितल्याप्रमाणें प्रकृतिस्वास्थ्यासाठीं विलायतेंत होत्या, तरी त्यांचें लक्ष हिंदुस्थानकडे होतें. खिलाफत चळवळीचा एक भाग म्हणून १९२० च्या मार्च महिन्यांत मुसलमानांचें शिष्टमंडळ मौ. महंमद अल्ली यांच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडला रवाना झालें. त्या वेळीं या शिष्टमंडळाचे वतीनें किंग्ज्वे हॉलमध्यें त्यांचें भाषण झालें. पंजाबप्रकरणीं हंटर कमिटीच्या रिपोर्टानें अन्याय दूर न करण्यांत अदूरदर्शीपणा दाखविला होता, त्याचा खरपूस समाचार सरोजिनींनीं घेतला. ह्याच किंग्जवे हॉलमध्यें "पंजाबची बेइज्जत आणि करुण कहाणी" ह्या विषयावर पंजाबच्या परिस्थितीवर विदारक प्रकाश पाडणारें त्यांचें भाषण झालें. हें भाषण अतिशय हृदयस्पर्शी होतें. "जालियनवाला बागेच्या कत्तलीची वार्ता ऐकून माझें अंतःकरण दुःखावेगानें भरून येतें. माझ्या भगिनींचें वस्त्र-हरण करण्यांत आलें. त्यांना चाबकानें मारण्यांत आलें. त्यांची इज्जत घेण्यांत आली! माझ्या देशाचीं हीं दुःखें मी जाहीर करून जगाला हलवीन. तोंपर्यंत माझ्या जिवाला स्वस्थता मिळणार नाहीं," असें

सरोजिनींनीं सांगितलें. या भाषणावर पार्लमेंटांत प्रश्नोत्तरांचें वादळ झालें, व मॉंट्ग्यू साहेबांनीं हीं सरोजिनींचीं विधानें बरोबर नाहींत असें म्हटलें. परंतु आपलीं विधानें बरोबरच आहेत हें सरोजिनींनीं पटवून दिलें. सरोजिनींनीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यकारभारावर केलेली जहरी टीका ब्रिटिश श्रोत्यांना पुष्कळदां असह्य होई. एकदां ब्रिटिशांच्या या जुलमी राज्यकारभारावर सरोजिनींचें व्याख्यान चालू असतांना त्यांची टीका सहन न झाल्यानें ब्रिटिश श्रोत्यांनीं दंगल माजविण्यास सुरुवात केली. पण सरोजिनी मुळींच डगमगल्या नाहींत. त्या "चूप रहा" हे शब्द इतक्या जोरानें ओरडल्या कीं, त्यामुळें एवढा मोठा श्रोतृवर्गहि एकदम स्तब्ध झाला; दंगल थांबली व मग भाषण त्यांनीं पुढें चालू ठेविलें. ता. ३१ ऑगस्ट १९२० रोजीं विलायतेंत असतांना त्यांनीं ब्रिटिश सरकारनें केलेल्या राष्ट्राच्या अपमानाच्या निषेधार्थ आपलें कैसर-इ-हिंद पदक व्हाइसरॉय लॉर्ड चेल्म्सफर्ड यांना परत केलें. याच वेळीं हिंदुस्थानावर दुर्दैवानें मोठा घाला केला व तो म्हणजे लोकमान्य टिळकांचा आकस्मिक मृत्यु ! देशाच्या या आणीबाणीच्या प्रसंगीं लोकमान्यांचें निधन देशाला भयंकर धक्का देणारें होतें. टिळक हे मोठे व्यवहारचतुर, उद्योगी, विचारवंत, राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास करणारे, कार्यकुशल मुत्सद्दी व देशाचे नेते असल्यानें त्यांच्या मृत्यूमुळें देशाची सर्वांत मोठी हानि झाली होती. सरोजिनींना लोकमान्यांबद्दल नितांत आदर होता. स्वराज्याचा महामंत्र घोषविणाऱ्या लोकमान्य टिळकांना त्या वंदनीय महर्षितुल्य मानीत. "लोकमान्य टिळक" या नांवाची सुंदर इंग्रजी कविता त्यांनीं लिहून त्यांत त्यांनीं लोकमान्यांना आदरांजलि अर्पण केली.

■ ■ ■

## गांधी युगाचा उदय व सरोजिनींचें कार्य

टिळकांच्या निधनानंतर लगेच नव्या गांधीयुगाला सुरुवात झाली. हें नवयुग म्हणजे असहकारितेचें युग होय. ब्रिटिश सरकारशीं संपूर्ण असहकारिता करण्यासाठीं महात्मा गांधींनीं १९२१ सालीं देशव्यापी प्रचंड आंदोलनास प्रारंभ केला. व विलायतेंतून परत आल्यावर त्यांत सरोजिनींनीं मनःपूर्वक भाग घेतला. तेव्हांपासून सरोजिनींनीं देशसेवेला स्वतःला वाहून घेतलें, व काव्यलेखनाला रजा दिली. त्या म्हणाल्या, " माझा देश युद्धांत गुंतला असतांना आणि या धुमश्चक्रीच्या धुळींत व कडाक्यांत तो सांपडला असतांना काव्याचे हस्तिदंती बुरुज निर्माण करून त्यांत राहणें मला अशक्य आहे. " यापुढील स्वराज्याच्या लढ्यांत सरोजिनींनीं सर्व हाल-अपेष्टांना धैर्यानें तोंड दिलें. महात्माजींवर त्यांची निस्सीम श्रद्धा होती व त्यांचेंच अक्षरशः अनुयायित्व त्यांनीं केलें. गांधीजींना ते टिळकांप्रमाणेंच देवासमान मानीत व त्यांच्या सर्व आज्ञा श्रद्धापूर्वक व उत्साहानें पाळीत. गांधींच्या अनेक दौऱ्यांबरोबर त्या असत. त्यांच्या प्रतिभेची भरारी आतां काव्यांत दिसण्याऐवजीं उत्कृष्ट वक्तृत्वांत दिसूं लागली. त्यांच्या व्याख्यानांना अलोट गर्दी होई. तास तास दोन दोन तास सारी सभा मंत्रमुग्ध होऊन त्यांच्या अमोघ वक्तृत्वानें भारल्यासारखी होत असे. काव्याचा ओघ, रसाळ वाणी, योग्य हावभाव, व मधूनमधून विनोदाची पखरण यांमुळें त्यांचीं भाषणें फारच परिणामकारक होत. १९२१ च्या जुलै महिन्याच्या २० तारखेस त्या म. गांधींबरोबर लो. टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यास आल्या. सर्व पाहुणे मंडळी महाराष्ट्राचे पुढारी श्री. तात्यासाहेब केळकर यांचेकडे उतरली होती. टिळकमहाविद्यालयांत त्यांचें विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण झालें. त्यांत त्यांनीं " तरुण मुलांनींच स्वातंत्र्याचा झगडा चालू ठेवावा, " असें सांगितलें. त्यानंतर किर्लोस्कर थिएटरांत स्त्रियांची मोठी सभा झाली. त्या सभेंत त्यांनीं स्त्रियांना सूत कांतण्याचा व शुद्ध स्वदेशी कापड वापरण्याबद्दल

कळकळीचा उपदेश केला. त्यानंतर शनिवारवाड्यापुढील प्रचंड सभेंत महात्माजींचें भाषण झाल्यावर त्यांच्या सांगण्यावरून सरोजिनींनीं भाषण केलें. त्यांत त्या म्हणाल्या कीं आपण आपलें मन स्वदेशी बनविलें पाहिजे. १९२१ सालच्या अखेरीस अहमदाबादला कॉंग्रेस झाली. या कॉंग्रेसचे नियोजित अध्यक्ष देशबंधु चित्तरंजन दास हे असहकारितेच्या चळवळींत तुरुंगांत पडले. त्यामुळें त्यांचें भाषण सरोजिनींनीं वाचून दाखविलें. दासांचें भाषण अत्युत्कट भावना व उच्च भाषाशैली यांनीं युक्त होतें. सरोजिनींनीं आपल्या वक्तृत्वपूर्ण वाणीनें त्यांतील भाव उत्तम प्रकारें व्यक्त केला. पुढें ११ मार्च १९२२ रोजीं म. गांधींना पकडण्यांत आलें व त्यांना शिक्षा झाली. त्या वेळीं सरोजिनींनीं आपल्या एका भाषणांत सांगितलें कीं, " आतां मला स्वतंत्र असें आस्तित्व उरलेलें नाहीं. यापुढें केवळ म. गांधींच्या संदेशवाहकाचेंच काम मी करीन. " आपल्या या वचनाला जागून प्रथम त्यांनीं आपला वेष बदलला. पूर्वीचा उंची पोषाक बदलून शुद्ध खादीचा वेष धारण केला. आणि त्यांनीं साध्यासुध्या जाड्या भरड्या पोषाखांत साऱ्या देशभर परिभ्रमण केलें; व महात्माजींचा खादीचा व अनत्याचारी असहकारितेचा संदेश त्यांनीं देशाच्या काना-कोपऱ्यांत घोषविला. याप्रमाणें सर्व देशभर प्रचार चालू असतांना कालिकत येथें त्यांनीं मोपल्यांच्या दंग्याबद्दल भाषण केलें. तेव्हां मद्रास सरकारनें त्यांना अत्याचारासंबंधीं आपलीं विधानें मागें घ्या नाहीं तर खटला करूं अशी धमकी दिली. पण आपलीं विधानें सबळ पुराव्याचे आधारावरच केलीं आहेत असें सरोजिनींनीं त्या धमकीला उत्तर दिलें. सी. एफ्. अँड्रयूज व डॉ. हर्डीकर यांनीं आपल्या विधानांची सत्यता पारखून पाहिली आहे असें त्यांनीं जाहीर केलें. त्याचप्रमाणें केरळ प्रांतिक कॉंग्रेस कामिटीच्या सेक्रेटरींनींहि सरोजिनींचीं विधानें आपण पुरविलेल्या माहितीवरून केलीं आहेत असें जाहीर केलें. असो. यापुढें ऑक्टोबर १९२२ मध्यें त्यांची प्रकृति बिघडली तेव्हां त्या सिलोनला गेल्या. तेथेंहि हजारों लोकांपुढें

व्याख्यानें देऊन महात्मा गांधींच्या कार्याचा परिचय त्यांना करून दिला. सिलोनच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष श्री. पेरीरा यांच्या अध्यक्षतेखालीं कोलंबो येथें जाहीर सभा झाली असतांना "या महात्मा गांधींच्या शिष्या आहेत" असें म्हणून सरोजिनींचा परिचय अध्यक्षांनीं श्रोत्यांना करून दिला. सिलोनहून परत येतांना मद्रास इलाख्यांत त्यांचीं ठिकाठिकाणीं भाषणें झालीं. त्रिवेंद्रम् येथें विद्यार्थ्यांपुढें त्या म्हणाल्या, कित्येक शतकांपूर्वीं त्या बोधिवृक्षाखालीं गौतमबुद्धांना आत्मज्ञान झालें. जगाच्या दुःखांचा अंत करणारें दिव्य ज्ञान झालें. त्याचप्रमाणें माझ्या गुरूंना—महात्मा गांधींनाहि—आत्मज्ञान झालें आहे. आणि ते म्हणत आहेत कीं "हा माझा देह तुरुंगांत अडकला आहे; माझ्या या सगळ्या लोकांचे आत्मे तरी बंधमुक्त होवोत." पुढें १९२३ च्या मार्च महिन्यांत म. गांधींच्या तुरुंगवासाच्या प्रथम वार्षिक दिनानिमित्त त्यांचें पुण्यास व्याख्यान झालें. त्या वेळीं त्या म्हणाल्या, "मला सर्व हिंदुस्थानभर जायचें आहे. ऐक्याकरितां मी फिरणार आहें. मी मुंबईहून गुपचूप पुण्यांत आलें. पण तुरुंगांत गांधीजींचें दर्शन झालें नाहीं. तुरुंगाचेंच दर्शन घेऊन आलें. मागें साबरमतीला मी गेलें होतें तेव्हां गांधीजी घोंगडीवर बसले होते. जवळ बँकर होते. आम्हांला काळजी होती कीं त्यांना कोणती शिक्षा होते. पण ते चरखा फिरवीत आनंदांत होते. मीं त्यांना विचारलें कीं तुम्हीं हिंदी स्त्रियांकरितां संदेश द्या. त्यांनीं सांगितलें, चरखा खादी हाच स्त्रियांकरितां संदेश आहे. पुरुषांकरितां खादी वापरण्याचा व स्त्रियांकरितां चरखा फिरविण्याचा संदेश महात्माजींनीं सांगितला आहे. मी जेव्हां तेथून निघालें तेव्हां ते माझा कान धरून मला म्हणाले, 'तुमचें काम प्रेमधर्म वाढविण्याचें आहे. दुसरें कांहीं नाहीं केलें तरी चालेल, पण एकी करण्याचें काम तुम्हीं केलें पाहिजे.' चरख्यामुळें आज बऱ्याच स्त्रिया पोट भरीत आहेत. ज्या स्त्रिया रस्त्यांत हिंडून भीक मागून पोट भरत होत्या त्याच आज चरखा फिरवून पोटाला मिळवीत आहेत. माझी मुलगी खादी तयार करते. कित्येक

घरंदाज लोक खादी वापरीत आहेत. श्रीमंत स्त्रिया चरखा फिरवीत आहेत. श्रीमंत लोक जर अगोदर चरखा फिरवितील तर गरीब नंतर चरखा फिरवितील असें गांधीजी म्हणत असतात. नीचेसे उप्पर नहीं आता है, उप्परसे नीचे आते हैं असें महात्माजी म्हणत होते. स्त्रियांनीं स्वदेशी व्रत आचरिलें पाहिजे. हाच म. गांधींचा संदेश आहे. येथल्या वायुलहरी गांधीजींच्या कारागृहांत जात आहेत. त्यांना तुमची प्रतिज्ञा खासच समजेल. टिळक महाराज आणि महात्मा गांधी यांच्या स्मरणानें आपण जरूर स्वदेशीचें व्रत अंगीकारा."

याप्रमाणें महात्माजींच्या गैरहजेरींत सरोजिनींनीं त्यांचा संदेश देशभर प्रसृत करण्याचें काम अविश्रान्तपणें चालविलें असतांना मध्यंतरीं म्हणजे १९२२ च्या नोव्हेंबरांत काँग्रेसच्या कायदेभंग चौकशी कामिटीचा रिपोर्ट बाहेर पडला. या कामिटीवर इतर पुढाऱ्यांबरोबर सरोजिनींना सभासदत्वाची जागा स्वीकारण्याँविषयीं विचारण्यांत आलें होतें. परंतु आजारीपणामुळें त्यांना या कामिटीवर काम करतां आलें नाहीं. कमिटींतल्या सभासदांनीं २ जुलै ते १५ ऑगस्टपर्यंत देशांतील प्रमुख ठिकाणीं जाऊन पुढाऱ्यांच्या साक्षी घेतल्या आणि त्यावरील रिपोर्ट काँग्रेसला सादर केला. त्यांतून मुख्यतः महत्त्वाचे दोन निर्णय निघाले. पहिला निर्णय सर्वानुमतें असा होता कीं, सार्वत्रिक सामुदायिक कायदेभंग करण्याला देशाची स्थिति आज अनुकूल नाहीं. दुसरा निर्णय—कायदे कौन्सिलासंबंधीं—विधिमंडळा-संबंधीं होता. यावर मात्र कमिटीनें सर्वानुमतें शिफारस केली नाहीं. कमिटींतले राजगोपालाचार्य अन्सारी व अयंगार या तीन सभासदांनीं आपलें मत कौन्सिलप्रवेशाच्या विरुद्ध आहे असें सांगितलें, व बाकीचे तीन सभासद म्हणजे मोतीलाल नेहरू, हकीम अजमलखान व विठ्ठलभाई पटेल यांनीं आपण कौन्सिलप्रवेशाला अनुकूल असल्याचें सांगितलें. म्हणजे विधिमंडळांत प्रवेश करण्याच्या प्रश्नावर काँग्रेसमध्यें दोन तट झाले. कलकत्त्यास ता. २० नोव्हेंबर रोजीं भरलेल्या ऑल इंडिया काँग्रेस

कमिटींत या प्रश्नावर तीव्र वादविवाद झाले. पांच दिवस ही बैठक चालली होती. इतकी लांबलेली बैठक यापूर्वीं कधीं झाली नाहीं. कौन्सिल बहिष्कारवादी ऊर्फ नाफेरवाले एका बाजूला व कौन्सिल प्रवेशवादी ऊर्फ फेरवाले दुसऱ्या बाजूला असा हा सामना होता. अशा रीतीनें लांबलचक वादविवाद चालणें किंवा कॉंग्रेसमध्यें फूट पडणें बरें नव्हे अशी सरोजिनींची कळकळीची इच्छा होती. इतका वादविवाद व भाषणें होऊन निर्णय कांहींच लागेना तेव्हां कौन्सिल-प्रवेशाचा हा कठीण प्रश्न गया कॉंग्रेसवर सोंपविण्यांत आला. अशा रीतीनें हा प्रश्न पुढें ढकलूं नये, आतांच काय ती तडजोड व्हावी म्हणून सरोजिनींनीं ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत शेवटचे दोन दिवस आटोकाट प्रयत्न केले. पण व्यर्थ ! पांचव्या दिवशीं सकाळीं सरोजिनींनीं नाइलाज होऊन हा सर्व प्रश्न पुढें ढकलण्या-विषयीं उपसूचना आणली व ती स्वीकारण्यांत आली. त्या स्वतः कौन्सिलप्रवेशाच्या विरुद्ध होत्या तरी उभय पक्षांत कांहीं तरी तडजोड व्हावी असें त्यांचें मत होतें. परंतु त्यांच्या तडजोडीच्या खटपटीला यश येईना तेव्हां हा प्रश्न पुढें कां ढकलला, प्रत्यक्ष या प्रश्नावर मतें कां घेतलीं नाहींत याबद्दल विचारतां त्या म्हणाल्या—" प्रत्यक्ष मतें घेतलीं असतीं तर कौन्सिल बहिष्कारवादी पक्षाचें बहुमत झालें असतें. तरीपण याप्रमाणें त्यांनीं जिंकलें असें ठरलें तरी त्यांच्या मनाला विजय मिळाल्याचें समाधान न राहतां आपापसांत फूट पडण्याची चुटपुट मात्र अधिक लागून राहील. ही फूट आपसांत पडूं नये याकरितां कॉंग्रेसमध्यें अल्पसंख्याक म्हणून खुषीनें राहण्यास मी तयार आहें." फूट पडत असतांना बहुमतवाल्या पक्षांतहि राहणें हें जर राष्ट्राला हानिकारक होत असेल तर त्यांत न राहणें बरें असें त्यांना वाटे, व म्हणून समेट घडवून आणण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली. अखेर जेव्हां गयेला कॉंग्रेसचें अधिवेशन झालें तेव्हां तेथें कौन्सिलावर बहिष्कार टाकावा हा नाफेरवाल्यांचा ठराव पास झाला. नंतर लवकरच दास, नेहरू, पटेल, केळकर या कौन्सिलप्रवेशवादी थोर

पुढाऱ्यांनीं कॉंग्रेसच्या अंतर्गत असा स्वराज्यपक्ष या नांवाचा एक नवीन पक्ष स्थापन केला व तो सुसंघटित करण्याचा कार्यक्रमहि आंखला. गया कॉंग्रेसचे अध्यक्ष देशबंधु चित्तरंजनदास यांनीं आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व या नवीन स्वराज्यपक्षाचे ते अध्यक्ष झाले. १९२३ साल हें या पक्षाच्या इतिहासांत महत्त्वाचें साल होतें. ह्या वर्षीं या पक्षानें हिंदुस्थानांत कौन्सिलप्रवेशाला अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा अखंड व जोरांचा प्रयत्न केला, आणि त्यांत यश मिळविलें. या सर्व गोष्टी त्यांनीं कॉंग्रेसला राजी ठेवून केल्या. पुढें मुंबईच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत स्वराज्यपक्षीय व कौन्सिलबहिष्कारवादी यांच्यांत समेट होऊन कौन्सिलबहिष्कार तहकूब ठेवावा असा ठराव झाला. असा ठराव होण्यांत पुष्कळांशीं डॉ. अन्सारी व सरोजिनी नायडू यांचें सामोपचाराचें धोरणच कारण होतें. कारण या दोघांनाहि कौन्सिलप्रवेश जरी मान्य नव्हता तरी पण इतर कोणी कौन्सिलांत जाऊं लागले तर त्यांना मुद्दाम अडथळा आणण्याकरितां कौन्सिलबहिष्काराचा प्रचार करणें हें त्यांना घातक वाटत होतें. पहिल्यापासून दुही होऊं न देतां समेटास अनुकूल वातावरण निर्माण करावयाचें अशी सरोजिनींची प्रवृत्ति असे. गयेच्या राष्ट्रिय सभेचा ठराव जरी कौन्सिलप्रवेशाच्या विरुद्ध झाला होता तरी त्या ठरावांतल्या शब्दांचें निमित्त करून देशांत कुणीं दुही माजवावी व त्यामुळें देशाचा धडधडीत घात व्हावा हें त्यांना योग्य वाटत नव्हतें व हा घात होत आहे हें जेव्हां त्यांना दिसलें तेव्हां त्याकडे दुर्लक्ष न करतां उपाययोजना करणें त्यांना जरुरीचें वाटलें. व म्हणून मुंबईच्या सभेंत यशस्वी तडजोड करण्यांत आली. म्हणजे कौन्सिलांत कोणी जात असेल तर त्यानें जावें व इतरांनीं त्याला प्रतिबंध करूं नये असा निर्णय ठरला. तो ठरविण्याचें श्रेय अन्सारी यांच्याबरोबर सरोजिनींनाहि आहे. म्हणजे आपला पक्ष तर त्यांनीं सोडला नाहीं पण परिस्थितीचा योग्य तो परिणाम त्यांच्या मनावर घडलेला होता. " सरोजिनी या कॉंग्रेसच्या पुढारीवर्गांत व

कॉंग्रेसच्या कार्यांत मोठ्या दुःखशमनकर्त्या होत्या व तडजोड घडवून आणण्यास नेहमीं सिद्ध असत," हे राजगोपालाचार्य यांचे उद्‌गार यथार्थच म्हटले पाहिजेत. राजकारणाच्या प्रक्षुब्ध वातावरणांत सरोजिनींच्या हास्यविनोदानें एकमेकांचीं मनें साफ होत व वातावरण शांत व निर्मळ होई. त्यांची वागण्याची रीतहि चातुर्यपूर्ण होती. पुढारी त्यांना 'आक्का' या नांवानें संबोधीत. सभासदांत मतभेद झाले व ते विकोपास जाऊं लागले तर कधीं दटावून, कधीं हसून, कधीं विनोदी वचन बोलून, कधीं शाब्दिक गोड टोले देऊन सभासदांत एकोपा राहण्यास त्या सदैव मदत करीत. त्या वादांत कधीं हार गेल्या नाहींत पण तडजोड करण्यालाहि त्यांची तयारी असे. इतकें करीत असतांना त्यांनीं कधीं आपल्या पांडित्याचें प्रदर्शन केलें नाहीं किंवा व्याख्यानांत कोणाच्या दोषाची चर्चा केली नाहीं. पण मनुष्यस्वभावाची उत्तम पारख असल्यानें त्यांचा प्रभाव पडत असे. असो. याच वर्षीं म्हणजे १९२३ सालीं सरोजिनी या मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें 'सी' वॉर्ड तर्फे निवडून आल्या. त्यांनीं मुंबई कॉर्पोरेशनचें सभासदत्व १९२९ सालपर्यंत भूषविलें. याच वर्षी जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यांत कॉंग्रेसचें लक्ष परदेशांतील हिंदी लोकांच्या प्रश्नाकडे वेधलें. त्यासंबंधीं सरोजिनींनीं कोणती कामगिरी केली ती आतां आपण पाहूं.

## आफ्रिकेंतील कामगिरी

परदेशापैकीं आफ्रिकेंत ब्रिटिश साम्राज्यांतर्गत हिंदी लोकांच्या वसाहती होत्या. पूर्व आफ्रिकेंतील केनियामध्यें हिंदी लोकांची वसाहत होती. त्यांची स्थिति दिवसेंदिवस बिघडत चालली होती. केनियाप्रमाणें इतर वसाहतींतील हिंदी लोकांनाहि ब्रिटिशांकडून अपमान सहन करावे लागत होते. त्यांना नागरिकत्वाचे हक्क नव्हते. अर्थात् वसाहत-पार्लमेंटांत प्रतिनिधि निवडून देण्याचे वेळीं त्यांना मतदानाचा हक्कहि नव्हता. कांहीं

ठिकाणीं जमिनीची मालकी व व्यापार यांवर हिंदी लोकांवर कडक निर्बंध होते. केनियांतील हिंदी लोकांची स्थिति तर फारच असमाधानकारक होती. या वसाहतींत हिंदी लोकांचें बरेंच भांडवल गुंतलें होतें व ती वसविण्यांत हिंदी लोकांना अत्यंत श्रम पडले होते. वसाहतीला अनेक मार्गांनीं उच्च दर्जा प्राप्त करून देण्यासाठीं हिंदी लोकांनीं पुढाकार घेतला होता. शीख शिपायांनीं, हिंदी व्यापाऱ्यांनीं व पेढीवाल्यांनीं तेथल्या गोऱ्या वसाहतवाल्यांना आगाऊ भांडवल देऊन मदत केली होती तरीसुद्धां स्थायिक झालेल्या हिंदी रहिवाशांना तेथून हाकलून लावण्याचा प्रयत्न चालला होता! उपकाराची फेड अपकारानें असा हा उलटा न्याय होता! विन्स्टन चर्चिलसारख्या साम्राज्यप्रिय मनुष्यानेंहि या गोष्टीचा निषेध केला. ज्या ठिकाणीं कपाशीची मोठ्या प्रमाणांत पैदास होते आणि जेथें हिंदी लोकांचें पुष्कळ भांडवल गुंतलेलें आहे त्या शेतीच्या प्रदेशांत राहण्यास त्यांना मनाई करण्यांत आली. त्याबद्दल हिंदी रहिवाशांनीं वेळोवेळीं आपला संताप व्यक्त केला. या जुलुमाची दाद लावून घेण्यासाठीं हिंदुस्थानांतील वरिष्ठ विधिमंडळातर्फे नामदार शास्त्री यांच्या नेतृत्वाखालीं एक शिष्टमंडळ लंडनला गेलें. शिवाय केनियाच्या गव्हर्नरला लंडनला बोलावण्यांत आलें तेव्हां त्यानें आपल्याबरोबर युरोपियन व हिंदी शिष्टमंडळेंहि नेलीं. यांपैकीं हिंदी शिष्टमंडळाच्या विनंतीवरून मि. अँड्र्यूज हे त्याचे सल्लागार म्हणून गेले. मि. अँड्र्यूज यांनीं या शिष्टमंडळाला केनियाच्या प्रश्नाबाबत चांगलीच मदत केली व त्याबद्दल काँग्रेसच्या वर्किंग कमिटीनें त्यांचे आभार मानले. केनियाच्या प्रश्नाबद्दल १९२३ च्या ऑगस्ट महिन्यांत ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें असा ठराव मंजूर केला कीं, ब्रिटिश साम्राज्यांत हिंदी लोकांना समानतेचा व मानाचा दर्जा प्राप्त होणें अशक्य आहे ही गोष्ट केनियाच्या बाबतींत ब्रिटिश सरकारनें केलेल्या निर्णयानें स्पष्ट झाली आहे. म्हणून सरकारच्या धोरणाचा सर्व देशभर शांततायुक्त विविध मार्गांनीं निषेध करण्यांत यावा. पुढें १९२३ च्या

सप्टेंबर महिन्यांत दिल्लीला कॉंग्रेसचें जादा अधिवेशन भरलें. त्यांत केनियाच्या प्रश्नावर संताप व्यक्त करण्यांत आला; व हिंदी लोकांबद्दल अंतःकरणपूर्वक सहानुभूति व्यक्त करण्यांत आली. पण नुसती सहानुभूति दाखवून उपयोग काय? त्यांचीं दुःखें दूर करण्याकरितां प्रत्यक्ष कार्यक्रम त्यांच्या वसाहतींत आंखला पाहिजे व तो अमलांत आणला पाहिजे याकरितां केनियाच्या हिंदी कॉंग्रेसला सरोजिनी यांना राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि म्हणून पाठविण्यांत आलें. मि. जॉर्ज जोसेफ हे दुसरे एक प्रतिनिधि त्यांचेबरोबरच गेले. पूर्व-आफ्रिकेंतील या केनिया वसाहतींत गेल्यानंतर त्यांना तेथील एका हिंदी परिषदेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें. इकडे दक्षिण-आफ्रिकेंतहि परिस्थिति अधिकच बिघडली होती. तेथील हिंदी लोकांवर तेथील सरकारनें दडपशाही चालविली होती. वास्तविक १९२१ व १९२३ या वर्षीं झालेल्या साम्राज्यपरिषदेच्या अधिवेशनांत वसाहतींतील हिंदी लोकांचे हक्क मान्य करण्यांत आले होते. पण प्रत्यक्षांत ही मान्यता कागदावरच राहिली! कारण दक्षिण-आफ्रिकेचे मुख्य प्रधान जनरल स्मट्स यांचे मनांत अशी मान्यता हिंदी लोकांना द्यावी असें नव्हतें. खरें म्हटलें तर अशी नागरिकत्वाच्या हक्कांची मान्यता मिळणें अगदीं अवश्य होतें; कारण हिंदी लोकांच्या संख्येचें प्रमाण शेंकडा ६० होतें. उलट स्मट्स साहेबांनीं जाहीर केलें कीं वसाहतींतील हिंदी लोकांचा प्रश्न हा सर्वस्वीं आमचा घरगुती प्रश्न आहे. कुणालाहि त्या प्रश्नांत हात घालण्याचें कारण नाहीं. लवकरच हिंदी लोकांना दडपून टाकण्यासाठीं त्यांनीं पॅट्रिक डंकन या मंत्र्याकरवीं क्लास एरियाज् बिल पुढें आणलें. या बिलानें हिंदी लोकांचा सर्वतोपरि नाश होणार होता. हिंदी लोकांना गांवाबाहेर बाजूला राहण्यास सांगणें, त्यांचे व्यापार-विषयक व जमिनीबाबतचे हक्क नष्ट करणें, बाहेरून हिंदी लोकांना वसाहतींत येऊन स्थायिक होण्यास मनाई करणें, या सर्व गोष्टी अशा होत्या कीं, त्यामुळें हिंदी लोकांचें अस्तित्व दक्षिण-आफ्रिकेंतून थोड्याच

अवधींत नष्ट होणारें होतें. तशी मुळीं इच्छाच जनरल स्मट्स व त्यांचे सहकारी यांची होती. ही सर्व परिस्थिति संकटमय होती तरी तेथील हिंदी लोक धैर्यशील व प्रयत्नवादी होते. ते डगमगले नाहींत. सरोजिनी या केनियांत आल्याचें समजतांच त्यांच्या पुढाऱ्यांनीं त्यांना दक्षिण-आफ्रिकेंत बोलावलें. राष्ट्रीय सभेनेंहि या निमंत्रणास मान्यता दिली. तेव्हां सरोजिनी १९२४ च्या आरंभाला दक्षिण-आफ्रिकेस गेल्या. तेथें त्यांचें मोठ्या उत्साहानें स्वागत झालें. दक्षिण-आफ्रिकेंतील दुर्दैवी वसाहतवाल्यांना सरोजिनींचें आगमन ही एक पर्वणीच वाटली. सरोजिनींनीं त्यांचें सांत्वन केलें. सर्वसामान्य लोकांना सरोजिनी या कवयित्री म्हणून माहीत होत्या. परंतु त्यांचें इंग्रजी भाषेवर उत्कृष्ट प्रभुत्व असून त्या भाषेंत त्या उत्तम वक्तृत्व करतात हें त्यांना आतां समजून आलें. सरोजिनींनीं दक्षिण-आफ्रिकेंतल्या प्रत्येक शहराला भेट दिली, व आपल्या हक्कांचा लढा गाऱ्हाणीं दूर होईपर्यंत चालू ठेवण्याबद्दल त्यांनीं सर्व ठिकाणीं सांगितलें. आपल्या गोड वाणीनें व व्यक्तिमत्त्वाच्या तेजानें त्यांनीं सारा प्रदेश मारून टाकला व जुलमानें त्रस्त झालेल्या हिंदी वसाहतवाल्यांत त्यांनीं नवचैतन्य निर्माण केलें; एवढेंच नव्हे तर त्या देशांतले जे मूळ रहिवासी होते त्यांनाहि आपल्यांत नवजीवनाचा संचार झाला आहे असें वाटलें. याप्रमाणें बहुजनसमाजाची सरोजिनींना सहानुभूति होती तरी त्यांचें कार्य कांहीं सोपें नव्हतें. हिंदी लोकांना सवलती देऊं नयेत असें म्हणणाऱ्या लोकांनीं त्यांची वर्तमानपत्रांत भरपूर निर्भर्त्सना केली. त्यांनीं सरोजिनींना 'कुली' स्त्री हमाल म्हणून संबोधिलें. एका प्रमुख पत्रानें तर सरोजिनींना हद्दपार करावें असें सुचविलें. तरीपण या निंदेची पर्वा न करतां सरोजिनींनीं आपला दौरा चालूच ठेवला होता. या दौऱ्यांतील एका भाषणांत त्यांनीं प्रथमच सुचविलें कीं दक्षिण-आफ्रिका व हिंदुस्थान यांचें भांडण मिट-विण्यासाठीं एक गोलमेज परिषद भरवावी. पुढें सरोजिनींच्या अध्यक्षते-खालीं मोंबासा येथें दक्षिण-आफ्रिकेची हिंदी कॉंग्रेस भरली त्यांत

सरोजिनींच्या या सूचनेवर ठराव पास करण्यांत आला. त्वकरच जनरल स्मट्स यांचें मंत्रिमंडळ अधिकारच्युत झाल्यानें हिंदी लोकांचा सर्वस्वीं घात करणारें क्लास एरिआज् बिल मागें पडलें. तरीपण पुन्हा १९२५ सालीं स्मट्स यांचे जागीं जनरल हर्टझोग हे दाक्षिण-आफ्रिकेच्या युनियन सरकारचे मुख्यमंत्री झालें व त्यांनीं पूर्वीपेक्षांहि कडक स्वरूपाचें सेग्रिगेशन बिल तयार केलें. आतां मात्र या बिलाला वसाहतवाल्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनेंहि तीव्र विरोध केला. तेव्हां पॅडिसन यांच्या अध्यक्षतेखालीं हिंदुस्थानसरकारनें एक शिष्टमंडळ १९२५ च्या डिसेंबरमध्यें दाक्षिण-आफ्रिकेंत पाठविलें. या शिष्टमंडळाचे सभासद ना. सय्यद रेझाअल्ली, सर देवप्रसाद सर्वाधिकारी व सेक्रेटरी जी. एस्. वाजपाय हे होते. याच सुमारास हिंदी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष म्हणून सरोजिनींना नियोजित करण्यांत आलें. सरोजिनींच्या आयुष्यांत ही एक अत्यंत महत्त्वाची घटना होती. आतांपर्यंत हा मान कोणाहि हिंदी स्त्रीला मिळालेला नव्हता. सरोजिनींना मिळालेला हा मान त्यांनीं राष्ट्रांत आपल्या कार्यानें जी पात्रता मिळविली होती, तिचा द्योतक होता. विशेषतः १९२४ सालीं पूर्व व दाक्षिण-आफ्रिकेंत त्यांनीं आपल्या देशाची जी अविश्रान्त सेवा केली त्याबद्दल राष्ट्रानें या प्रकारें आपली कृतज्ञता व्यक्त केली. आफ्रिकेंतला दौरा आटपून त्या मायदेशीं परत आल्यापासून कानपूर काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं सरोजिनींचें नांव प्रामुख्यानें पुढें येऊं लागलें. आफ्रिकेच्या प्रश्नावर त्या आतां अधिकारवाणीनें बोलूं शकत होत्या. हिंदुस्थान-सरकारनें वर सांगितल्याप्रमाणें पॅडिसनच्या अध्यक्षतेखालीं जें शिष्टमंडळ तयार केलें त्यानें हिंदुस्थानांत मोठा दौरा काढला. तो यशस्वी करण्यासाठीं सरोजिनींनीं महात्मा गांधींच्या सल्ल्यानें मोठे परिश्रम केले. या शिष्टमंडळानें व्हाइसरॉय लॉर्ड रेडिंग यांचीहि मुलाखत घेतली. सरोजिनींच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या कानपूर काँग्रेसच्या अधिवेशनाला हें मंडळ उपस्थित होतें. महात्मा गांधींनीं या अधिवेशनांत दक्षिण-आफ्रिकेच्या बिलाला

निषेध करण्याचा ठराव मांडला तेव्हां त्याला या शिष्टमंडळानें मनःपूर्वक पाठिंबा दिला. पुढें हें शिष्टमंडळ दक्षिण आफ्रिकेंत गेलें. तेथल्या सरकारनें त्यांचें कांहीं मनापासून स्वागत केलें नाहीं. पण शेवटीं बिल मात्र मागें घेण्यांत आलें, व दक्षिण-आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या प्रश्नांसंबंधीं दोन्ही सरकारांनीं एकत्र विचार करावा असें ठरलें. १७ डिसेंबर १९२६ रोजीं दक्षिण-आफ्रिकेच्या मुख्य प्रधानांच्या विनंतीवरून एक परिषद भरविण्यांत आली, तींत दक्षिण-आफ्रिका व हिंदुस्थान यांच्या प्रतिनिधिमंडळाच्या संमतीनें एक समेटासारखा हंगामी करार ठरविण्यांत आला. तसेंच हिंदी लोकांचें हित-रक्षण करण्यासाठीं दक्षिण-आफ्रिकेला हिंदुस्थानतर्फे एजंट जनरल पाठविण्याचें ठरलें. याप्रमाणें आफ्रिकन वसाहतींच्या बाबतींत महात्मा गांधी व सरोजिनी यांनीं लक्ष घातल्यामुळें इतक्या तरी गोष्टी साध्य होण्यास मदत झाली. आफ्रिकेंतील हिंदी रहिवाश्यांसंबंधीं यापुढेंहि जे बिकट प्रश्न निर्माण झाले ते सोडविण्याचे प्रयत्नहि गांधीजी व व सरोजिनी यांनीं केले.

## बेळगांवची कॉंग्रेस व नंतर

१९२४ या वर्षीं सरोजिनी दक्षिण-आफ्रिकेंतून परत आल्यावर बेळगांव येथें कॉंग्रेसचें अधिवेशन झालें. सरोजिनींनीं कॉंग्रेसतर्फे तेथें जी उत्कृष्ट कामगिरी बजावली त्याबद्दल कॉंग्रेसनें त्यांचें मोठें स्वागत केलें. या कॉंग्रेसपुढें परदेशांतील हिंदी बांधवांचा जो प्रश्न होता त्याचें पुढारीपण कॉंग्रेसनें त्यांना दिलें हें स्वाभाविकच झालें. एवढेंच नव्हे तर या कॉंग्रेसचे अध्यक्ष महात्मा गांधी यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या आरंभीं सांगितलें कीं, "केनिया व दक्षिण-आफ्रिका या ठिकाणीं सरोजिनींनीं बजाविलेली कामगिरी आश्चर्यकारक आहे. म्हणून या वर्षाच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा बहुमान वास्तविक त्यांना देणें उचित होतें. पण तें झालें नाहीं. सरोजिनी देवींनीं जेथें पाऊल ठेवावयास पाहिजे त्या ठिकाणीं

मीं पाऊल ठेवींत आहें." यावरून सरोजिनींना हिंदी राजकारणांत कसें अग्रेसरत्व प्राप्त झालें होतें तें समजून येतें.

बेळगांव कॉंग्रेसनंतर कौन्सिलप्रवेशाच्या वादांत आणखी एका वादाची व मतभेदाची भर पडली. बेळगांव कॉंग्रेसनें असें ठरविलें कीं, कॉंग्रेसच्या प्रत्येक सभासदानें दरवर्षी ठराविक वार सूत काढलेंच पाहिजे. असें सूत काढलें तरच त्याला कॉंग्रेसमध्यें मतदानाचा हक्क राहील. बेळगांव कॉंग्रेसमध्यें या सूतमतदानाला मान्यता मिळाली होती तरी स्वराज्यपक्षाच्या पुढाऱ्यांना हा ठराव पसंत नव्हता. सूतमतदानाच्या हक्काला त्यांचा झालेला विरोध इतका तीव्र होता कीं गांधींच्या हातसुताच्या खादीचा संदेश आतां शिळा होत चालला असे उद्गार सरोजिनींनीं काढले. या वेळीं महात्माजींनीं कॉंग्रेसचीं सर्व सूत्रें स्वराज्यपक्षीयांच्या हातीं सोंपविलीं. ता. २१ सप्टेंबर १९२५ रोजीं पाटणा येथें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा झाली तींत या हातसुताच्या मतदानाचें महत्त्व नष्ट करण्यांत आलें; व हा हक्क वैकल्पिक करण्यांत आला. म्हणजे बेळगांवांत जें झालें तें पाटण्याला झुगारून देण्यांत आलें. यामुळें कॉंग्रेसमध्यें आणखी तट पडले. बाहेरून देखावा मात्र ऐक्याचा होता. परंतु सरोजिनींचीं मतें या बाबतींत अगदीं स्पष्ट होतीं. त्या संडे टाइम्सच्या बातमीदाराला दिलेल्या मुलाखतींत म्हणाल्या— "माझ्या मतें खादी पोषाखाची अट निरुपद्रवी पण पोरकट आहे. पण कॉंग्रेसनें या अटीबद्दल आग्रह धरणें पोरकटपणाचें असलें तरी तेवढें निमित्त करून कॉंग्रेसच्या बाहेर राहणें हें मात्र कांहीं समंजसपणाचें होणार नाहीं. अशा लोकांनीं कॉंग्रेसमध्यें येऊन ही अट बदलून घ्यावी. सर्व प्रसंगीं अस्सल खादीच वापरावी या तत्त्वावर विश्वास ठेवणाऱ्यांबद्दल मला आदर वाटतो, परंतु राजकीय बाबतींत या पोषाखाची अट ठेवावी हें मला कबूल नसून मी या सूतमतदानास पाठिंबा देणार नाहीं. कॉंग्रेसच्या ध्येयांत ज्यांचा समावेश होऊं शकतो अशा सर्व लोकांनीं कॉंग्रेसमध्यें यावें असें माझें मत आहे. कॉंग्रेसमध्यें सर्व मताचे लोक येऊन राष्ट्राचें खरें

मनोगत कळण्यास कॉंग्रेस हीच एक जागा आहे असें सर्वांना वाटलें पाहिजे. त्याचप्रमाणें परराष्ट्रीय चळवळ, मजूरसंघटना, ग्रामसंघटना, सूत व विणकाम, आर्थिक चौकशी इत्यादि अनेक लोकोपयोगी कामें कॉंग्रेसनें हातीं घेऊन योग्य माणसांकडून तीं करवून घेतलीं पाहिजेत."

## कॉंग्रेस अध्यक्षपदीं नियुक्ति

हिंदुस्थानचें राजकीय वातावरण दिवसेंदिवस अंतर्गत कलहांनीं बिघडत होतें. १९२३ मध्यें पंजाबांत हिंदु-मुसलमानांचे भयंकर दंगे झाले. १९२४ सालींहि ठिकठिकाणीं असे दंगे झाले. सरोजिनींनीं दंग्यांच्या या जहरी वातावरणांत ऐक्य व माधुर्य आणण्याचा प्रयत्न केला. हिंदु-मुसलमानांच्या चिघळणाऱ्या प्रश्नावर मलमपट्टी करण्याचें काम सरोजिनी कुशलतेनें करतात व यापुढेंहि करतील असा राष्ट्राला भरंवसा होता. कॉंग्रेसमध्येंहि मतभेद धुमसत होते. पण जेथें जेथें तंटे व मतभेद असतील तेथें तेथें ते मिटविण्यासाठीं सरोजिनींची नियुक्ति व्हावयाची हें ठरलेलें! प्रक्षुब्ध वातावरणांत सौम्यपणा आणण्याची हातोटी त्यांना उत्तम साधली होती. करकरणारीं चाकें असतील तेथें तेथें तेलाचे थेंब टाकावे व घरघर कमी करावी असें त्यांचें धोरण असे. शिवाय सरोजिनींनीं आफ्रिकेंताहि अभिनंदनीय अशी कामगिरी केली होती. अशा या कांहीं ठळक कारणां-मुळें सरोजिनींचें नांव १९२५ च्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं सुचविण्यांत आलें यांत आश्चर्य नाहीं. १९२५ पासून १९४८ पर्यंत सरोजिनी या वर्किंग कामिटीच्या सभासद होत्या; ही एक त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष होय. एकदां पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले कीं, "सरोजिनी या वर्किंग-कामिटींत नसत्या तर त्या कामिटीचें काम कसें चाललें असतें याची मला कल्पना करवत नाहीं." असो. कॉंग्रेसच्या अध्यक्ष म्हणून नियुक्त झाल्यानंतर सरोजिनींनीं ऑक्टोबरच्या प्रारंभीं राष्ट्राला खालील संदेश जाहीर केलाः—

" हिंदमातेला आपल्या घरांतील सर्वसत्ताधारी धनीण बनवावी, तिचा खरा दर्जा तिला प्राप्त करून द्यावा, असाच स्त्रीला शोभण्यासारखा माझा साधा मर्यादशील घरगुती कार्यक्रम आहे. आपल्या प्रचंड सांपत्तिक साधनांची हिंदमातेला मालकीण बनवावें, कोणाचें आतिथ्य करावें, किंवा कोणाचें करूं नये, हें तिचें तिनेंच ठरवावें, असाच माझा कार्यक्रम आहे. येत्या वर्षांत भारतमातेची एकनिष्ठ कन्या या नात्यानें माझ्या आईच्या घराची व्यवस्था लावून देणें, हें रमणीय काम मला करावयाचें असलें तरी तें अत्यंत बिकट आहे. देशांत आज शोचनीय झगडे चालू आहेत. देशांतील निरनिराळ्या जमाती व धर्मपंथ यांच्यांतील ऐक्यावर आज प्राण-संकट प्राप्त झालें आहे. हिंदुस्थानांतील एकत्र कुटुंबपद्धतीवरच यामुळें घाला येऊं पाहात आहे. हे सर्व तंटे आपल्याला मिटवावयाचे आहेत. रावापासून रंकापर्यंत सर्व हिंदमातेच्या लेकरांना, सावत्र लेकरांनासुद्धां, तसेंच देशांत येऊन राहिलेल्या पाहुण्यांना व परकीयांनाहि त्यांचा योग्य व मानास्पद दर्जा प्राप्त होईल असा प्रयत्न आपल्याला करावयाचा आहे."

कानपूरच्या कॉंग्रेसचें अधिवेशन कॉंग्रेससाठीं वसविलेल्या टिळक-नगरांत भरलें होतें. ता. २३ डिसेंबरला सरोजिनी कानपुरास आल्या. त्यांना वाटेंत म. गांधी, शेट जम्नालाल बजाज ही मंडळी मिळाली. सरोजिनींबरोबर गुजराथ व मुंबई येथील कांहीं प्रतिनिधि आले होते. अध्यक्षांची गाडी स्टेशनवर येण्यापूर्वी स्टेशनवर मोठा जनसमुदाय लोटला होता. वन्देमातरम् व म. गांधी यांचा एकसारखा जयजयकार चालला होता. अध्यक्ष सरोजिनी यांच्या स्वागतार्थ डॉ. मुरारीलाल, पं. मोतीलाल नेहरू, पं. जवाहरलाल नेहरू, लाला लजपतराय, बॅ. सेनगुप्त, रंगास्वामी अय्यंगार, अलीबंधु, श्रीनिवास अय्यंगार इत्यादि पुढारी व स्वागत-मंडळाचे सभासद स्टेशनवर उपस्थित होते, कानपूरचे प्रमुख नागरिकाहि स्वागतार्थ आले होते. सरोजिनी व म. गांधी यांना पुष्पहारानें मंडित

केल्यानंतर त्यांची जंगी मिरवणूक काढण्यांत आली. मिरवणुकीबरोबर पं. जवाहरलाल नेहरू व इतर प्रमुख स्वयंसेवक हे अश्वारूढ होते. डॉ. हर्डीकरांचे आधिपत्याखालीं हिंदुस्थानी सेवादल सज्ज होतें. मिरवणुकींत एक लाख जनसमुदाय होता. मिरवणुकीचे रस्ते विद्युद्दीप, पुष्पमाला व तोरणपताकांनीं सुशोभित केले होते. अग्रभागीं हत्तीवर राष्ट्रध्वज डौलानें फडकत होता, तसेंच कित्येक रथ व सायकली होत्या. टिळकनगरांत आल्यावर मिरवणूक विसर्जन पावली. अधिवेशनास ता. २६ रोजीं दुपारीं टिळकनगरांतील भव्य मंडपांत सुरुवात झाली प्रेक्षक व प्रतिनिधि यांची संख्या सुमारें पंधरा हजार होती. अधिवेशनास आरंभ झाल्यावर प्रथम सरोजिनींनीं म. गांधींकडून अध्यक्षपदाचा चार्ज घेतला. त्यांचें अध्यक्षीय भाषण तोंपर्यंत झालेल्या काँग्रेसच्या सर्व अध्यक्षीय भाषणांत अत्यंत लहान पण अत्यंत गोड असें झालें. त्यांनीं आपलें छापलेलें भाषण वाचून दाखविलें नाहीं, तर त्या तात्काल स्फूर्तीनें बोलल्या. ज्या अढळ निष्ठेच्या जोरावर सीतेनें वनवास सहन केला, दमयंतीनें हाल सोसले आणि सावित्रीनें निर्भयपणें यमलोकाच्या वेशीपर्यंत मार्गक्रमण केलें त्या निष्ठेच्या अल्प अंशानें मीं माझ्यावर सोंपविलेलें काम पार पाडूं शकेन असा माझा विश्वास आहे, असें म्हणून त्यांनीं आपल्या या समयस्फूर्त भाषणांत देशापुढें कोणते प्रश्न आहेत त्यांचें चित्र आपल्या भावनाप्रचुर वाणीनें उभें केलें. दडपशाहीला तोंड कसें देतां येईल? आपली संपत्ति हरण करणारी साम्राज्यतृष्णा कशी थांबेल? आपत्तींतून सुटण्यासाठीं कोणतीं साधनें हातीं घ्यावींत? वसाहतींतील दुर्दैवी बांधवांवर ओढवलेली भयंकर आपत्ति कशी निवारण होईल? अंतस्थ कलह कसे टळतील? हे ते प्रश्न आहेत. म. गांधींनीं सांगितलेल्या त्यागाच्या संदेशांत या प्रश्नांचीं उत्तरें आहेत. पण गांधींनीं सांगितलेल्या त्यागाच्या उच्च व खडतर मार्गावर आपण फार वेळ टिकण्याइतके समर्थ व पात्र नव्हतों. इतिहासाचा निर्णय कांहींहि ठरो. राष्ट्रावर एखाद्या झंझावाताप्रमाणें येऊन गेलेल्या

अनत्याचारी असहकारितेच्या चळवळीनें आपल्या राष्ट्रीय जीवनाचा ठाव घेतला आणि आज जरी ती चळवळ थंडावली असली व तिचे प्रतिध्वनि देखील जवळ जवळ थांबले असले तरी तिनें आपल्या नैतिक क्षेत्रांत पार बदल करून टाकला आहे हें खरें. आतां आपली विघटित शक्ति एकत्र केली पाहिजे. त्यांत एकसूत्रीपणा व शिस्त उत्पन्न केली पाहिजे. नवी व्यापक राज्यघटनाहि बनविली पाहिजे. खेड्यांच्या पुनरुज्जीवनाची योजना ठरवून शेतकऱ्यांना उपासमार, अज्ञान व रोगराई या त्रिविध तापांतून मुक्त केलें पाहिजे. उलट दाट, वस्तीच्या शहरांकडेहि लक्ष देऊन तेथील मजूरवर्गाचें संघटन केलें पाहिजे व त्याकरितां स्वच्छ राहतीं घरें, भरपूर पगार व नैतिक वातावरण यांचा लाभ त्यांना करून दिला पाहिजे. भांडवलवाले व मजूर यांच्यांत सलोखा पाहिजे. आपली प्राचीन विद्या नि संस्कृति व आधुनिक पाश्चात्य विज्ञान यांचा चांगला मेळ घातला पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणांत संपूर्ण लष्करी शिक्षणाचाहि अवश्य समावेश व्हावा असें माझें आग्रहाचें सांगणें आहे. ज्या आर्यपुत्रांनीं जगतीतलावर ज्ञानदीपाचा प्रथम प्रकाश पाडला त्यांना हत्यारें हातांत घेण्याचा हक्क नसावा व अशा रीतीनें जबरीनें त्यांना भेकड बनवून जगाचें आव्हान स्वीकारण्यास व आपल्या गृहलक्ष्मीचें व मंदिरांचें पावित्र्य रक्षण करण्यास नालायक बनवावें हें योग्य आहे काय? परकीयांच्या शस्त्रसामर्थ्यावर अवलंबून राहणें आम्हांला संमत नाहीं. कॉंग्रेसनें राष्ट्रीय स्वयंसेवकांची सेना उभारली पाहिजे. नाविक व वैमानिक शिक्षण देण्याचाहि विचार लक्षपूर्वक केला पाहिजे. याप्रमाणें आपल्या देशाचे विविध प्रश्न सोडवीत असतांना आपण आपल्या परदेशांतील बांधवांना विसरतां कामा नये. दक्षिण-आफ्रिकेंतील हिंदी बांधवांचे प्रतिनिधि येथें आले आहेत त्यांचें आपण प्रेमपूर्वक स्वागत करूं या. त्यांच्या हक्कांच्या झगड्याला आपण पाठिंबा देऊं या. या करितां राष्ट्रीय सभेच्या कारभारांत एक परराष्ट्रीय खातें स्थापलें पाहिजे. त्यामुळें परराष्ट्रांत राहणाऱ्या आपल्या देशबांधवांविषयीं आपलें

कर्तव्य करण्याची आणि त्यांच्या बऱ्यावाईट परिस्थितींत त्यांच्यांशीं एकजीव होऊन वागण्याची आवश्यकता आपणांस आतां उत्तम पटली पाहिजे. तसेंच हद्दपार झालेल्या ज्या दुःखी कष्टी-देशबांधवांनीं मातृभूमीची सेवा केली त्यांची मला आठवण होते. सुव्यवस्थित वार्ताप्रसार हें कोणत्याहि चळवळीचें प्रमुख अंग असून त्याच्याकडे आपण इतकें कसें दुर्लक्ष केलें याचेंच मला सखेदाश्चर्य वाटतें. यास्तव बहुजनसमाजांत राजकीय तत्त्वांचा प्रसार करण्यासाठीं, त्यांचीं सामाजिक कर्तव्यें व हक्क त्यांना समजावून देण्यासाठीं, त्यांच्यावरील जुलुमाची त्यांना जाणीव करून देण्यासाठीं व आर्थिक धोरणाची माहिती करून देण्यासाठीं, कॉंग्रेसनें एक प्रसिद्धिखातें उघडलें पाहिजे. ज्यांना उघड रीतीनें प्रत्यक्ष राजकीय चळवळींत भाग घेतां येत नाहीं असे कित्येक तज्ज्ञ या कार्यांत आपल्या ज्ञानाचा लाभ आम्हांला करून देतील व घरगुती धंद्यांचा पुनरुद्धार कसा करावा, सांपत्तिक उन्नतीस आवश्यक अशा व्यापार, रेल्वे, नौकानयन, सहकारी पतपेढ्या इत्यादि शाखांची व्यवस्था कशी असावी याविषयीं अनुभवशीर सल्ला देतील. राष्ट्रीय पक्षाचीं देशी व विदेशी भाषांतलीं वृत्तपत्रें असावीं. परदेशांतील प्रसारासाठीं परराष्ट्र-वार्ताप्रसारक मंडळ नेमावें. परदेशांतील लोकांची सहानुभूति संपादन करण्याचाहि उद्योग करावा. हिंदु-मुस्लिम ऐक्याकडे वळून त्या म्हणाल्या कीं, जातवार प्रतिनिधित्व असूं नये. दोघां जमातींनीं परस्परांबद्दल सहिष्णुता दाखवावी. हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या स्वप्नांत मीं माझें आयुष्य वेंचलें आहे. आपल्यापुढें अनेक कामें आहेत. तरी स्वराज्यप्राप्ति हें कॉंग्रेसचें आद्य कर्तव्य आहे. देशांतल्या सर्व राजकीय पक्षांनीं कॉंग्रेसमध्यें सामील व्हावें. त्यांना येथें मुक्तद्वार आहे. सर्वांनीं मिळून एक कार्यक्रम ठरवावा व एका कार्याला लागावें. मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरितां आपण कितीहि स्वार्थत्याग केला तरी तो थोडाच आहे, कितीहि क्लेश भोगले तरी थोडेच आहेत. स्वातंत्र्यसंग्रामांत भीति हाच अक्षम्य देशद्रोह आणि निराशा हेंच अक्षम्य पाप

आहे. यास्तव भक्तिपूर्ण अंतःकरणानें हात जोडून मी परमेश्वराची अशी प्रार्थना करतें कीं, हे देवा, या आमच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कसोटीच्या वेळीं आम्हांला अढळ श्रद्धा दे आणि दुर्दम्य धैर्य दे. त्याचप्रमाणें कार्यसिद्धीच्या वेळींहि आमच्या मनांतला विनम्रभाव कायम राहो. अखेरीस प्राचीन कवींच्या शब्दांत आमचें एवढेंच मागणें आहे कीं ।। असतो मा सद्गमय ।। तमसो मा ज्योतिर्गमय ।। मृत्योर्मा अमृतं गमय ।। ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।

याप्रमाणें सरोजिनींचें स्फूर्तिदायक व मार्गदर्शक भाषण झालें. या अधिवेशनांत त्यांनीं आपल्या नाजुक हातांनीं वेळोवेळीं निर्देश करून शिस्त राखण्याचा प्रयत्न केला व अनेक प्रसंगीं सहनशील वृत्तीनें हें काम तडीस नेलें. कामगारांच्या कांहीं मिरवणुकी व कांहीं प्रतिनिधींमधील भांडणें, याशिवाय बाकी सर्व कामें शांतपणें पार पडलीं. वरील गडबडी शांत करण्याच्या कामीं पंडित जवाहरलाल नेहरूसारख्या कणखर पुढाऱ्यांनीं त्यांना साह्य केलें. कॉंग्रेसच्या इतिहासाला कानपूर कॉंग्रेसनें नवीन वळण दिलें. स्वराज्यपक्षाचा कौन्सिलांबाबतचा कार्यक्रम हा तिनें स्वतःचा कार्यक्रम ठरविला. यापुढील कौन्सिल-निवडणुकी स्वराज्यपक्षातर्फे व्हावयाच्या नव्हत्या, तर त्या कॉंग्रेसतर्फे व्हावयाच्या होत्या. आतां हे लोक कौन्सिलांतील कॉंग्रेसचे समासद झाले.

## नवीन वादांतील तडजोडीचे प्रयत्न फिसकटले

याप्रमाणें कौन्सिलवादी व कौन्सिलबहिष्कारवादी हा तंटा आतां राहिला नसला तरी आतां नवीनच एका वादानें वादळ उठविलें. तो वाद म्हणजे स्वराज्यपक्षीयांनीं सरकारच्या दिवाणगिऱ्या व इतर अधिकारपदें स्वीकारावीं कीं नाहीं ? अधिकारपदें स्वीकारूं नयेत असें मूळ स्वराज्यपक्षीयांचें धोरण, तर आतां त्याच पक्षांत अधिकारपदें स्वीकारावीं असा एक पक्ष तयार झाला. या नव्या पक्षानें प्रतिसहकार पक्ष असें नांव धारण

केलें. या अधिकारवादी स्वराजिस्टांनीं स्वराज्यपक्षाचे राजीनामे दिले. या नवीन पक्षाची ही प्रतियोगी सहकारिता हें विष असून त्या विषानें दूषित झालेला भाग कापून काढला पाहिजे असें स्वराज्यपक्षीय अधिकारपद-बहिष्कारवादी पंडित मोतीलाल नेहरू यांनीं एक विधान केलें. त्यामुळें या दोन पक्षांतील भांडण अधिक तीव्र झालें. कौन्सिलांत शिरून जर तेथील सर्व साधनांचा उपयोग करून घ्यावयाचा नसेल तर मग आपण कौन्सिलांत नसलेलेंच बरें, असें अणे, केळकर, जयकर इत्यादि प्रतिसहकार-पक्षीय पुढाऱ्यांचें म्हणणें होतें. व म्हणून १९२६ सालच्या निवडणुकींत आपण दिवाणगिऱ्या स्वीकारण्यास तयार झालें पाहिजे व असें केलें तरच स्वराज्यपक्षाच्या धोरणाचें पाऊल पुढें पडेल असें त्यांचें म्हणणें होतें. मोठमोठ्या जागा मोठ्या जबाबदारीच्या असून त्यांच्या मागें हुकमत असते. त्या जागा सरकार अराष्ट्रीय लोकांकडून भरते व त्यामुळें जनतेचें नुकसान होतें असा अनुभव आल्यामुळेंच प्रतिसहकारपक्षांतील पुढाऱ्यांनीं अधिकारपदें स्वीकारण्याच्या मुद्दयावर निवडणुका लढविण्याचें निश्चित केलें. असो. कानपूर कॉंग्रेसनंतर या दोन पक्षांत करार घडवून आणण्याची खटपट सुरू झाली तींत सरोजिनींनीं भाग घेतला. ता. २१ एप्रिल १९२६ रोजीं स्वराज्यपक्ष व प्रतिसहकारपक्ष यांच्या दरम्यान साबरमतीस गांधींच्या सत्याग्रहाश्रमांत तडजोड ठरली. त्यावर उभय पक्षांच्या पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या. या समेटावर पहिली सही सरोजिनींनीं केली. व पंडित मोतीलाल नेहरू, बॅ. जयकर, न. चिं. केळकर, डॉ. मुंजे, श्री. मा. श्री. अणे, लाला लजपतराय, दा. वि. गोखले आणि गो. अ. ओगले यांनींहि व्यक्तिशः सह्या केल्या. परंतु हा समेट कॉंग्रेसच्या इतर कांहीं पुढाऱ्यांना पसंत पडला नाहीं, व मग ही तडजोड फिसकटली.

## देशांतील व विदेशांतील कामगिरी

याप्रमाणें देशाच्या राजकारणाचें वातावरण मतभेदानें भरून गेलें होतें. परंतु हा कौन्सिलविषयक राजकारणावरील मतभेदाचा प्रश्न बाजूला

ठेवला तरी बहुजनसमाजाला उपयुक्त ठरणाऱ्या अशा पुष्कळ महत्त्वाच्या गोष्टी करण्यासारख्या होत्या. ग्रामसंघटना, शिक्षण, खादीप्रसार, अस्पृश्यता-निवारण इत्यादि अनेक विधायक कार्ये होतीं. देशांत मोठा दौरा काढून कॉंग्रेसच्या या विधायक कार्याचा सरोजिनींनीं प्रचार केला. यूथ लीग चळवळींत त्यांनीं भाग घेतला. १९२५ सालीं मुंबईतील तरुणांनीं आठवडाभर उत्सव केला त्या प्रसंगीं त्या म्हणाल्या– "जगताच्या प्रभातकालीं परमेश्वराच्या आनंदमय वृत्तींतील दैवी स्मृति म्हणजेच तारुण्य; म्हणून परमेश्वराच्या सौंदर्याला, त्याच्या वैभवाला आणि सामर्थ्याला शरण जा. त्यांच्या अशा काव्यमय व स्फूर्तिदायक वक्तृत्वावर तरुण तरुणी खूष असत. त्या तरुणांना सांगत कीं नुसत्या स्वप्नरंजनांत वेळ घालवूं नका. देशासाठीं कांहीं तरी करा. तुम्ही कोण आहांत किंवा कोठें आहांत याला महत्त्व नाहीं. रस्ते झाडणारा साधासुधा झाडूवाला सुद्धां मनांत आलें तर देशासाठीं कांहींना कांहीं करूं शकेल. सरोजिनी श्रीमंत कुळांत जन्माला आल्या खऱ्या, पण गरिबांबद्दल त्यांच्या मनांत फार आपुलकीची भावना असे. गरीब शेतकरी, दरिद्री मजूर, कामकरी यांची स्थिति त्यांनीं पाहिली. हरिजनांच्या वस्तीला भेटी दिल्या. त्यांच्या मुलांशीं खेळणें, रडक्या मुलांना मांडीवर घेऊन त्यांचे अश्रु आपल्या लुगड्याच्या पदरानें पुसणें, हरिजन स्त्रियांशीं गोड बोलून त्यांच्या दुःखी जीवनांत आनंद निर्माण करणें हे सरोजिनींचे नित्याचे व्यवसाय असत.

पुढें १९२८ सालीं सरोजिनी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेल्या. युनायटेड स्टेट्स व कॅनडा या ठिकाणीं त्यांनीं अनेक सभांतून भाषणें केलीं. मिस् मेयोच्या 'मदर इंडिया' या खोडसाळ पुस्तकानें अमेरिकेंत हिंदुस्थानाबद्दल गैरसमज पसरले होते ते सरोजिनींनीं आपल्या बिनतोड व प्रभावी वक्तृत्वानें नाहींसे केले, व हिंदुस्थानाबद्दल सहानुभूति व आपुलकीची भावना त्यांच्या मनांत निर्माण केलीं. या कार्यामुळें "भारताच्या परराष्ट्रांतील वकील" असें त्यांना संबोधण्यांत आलें. १९२९ च्या ऑगस्टमध्यें त्या

हिंदुस्थानास परत आल्या. त्यांनीं परराष्ट्रीय कामगिरीबद्दल दाखविलेली कळकळ पाहून पूर्व-आफ्रिकेंतील इंडियन काँग्रेसनें त्यांना नोव्हेंबरमध्यें होणाऱ्या वार्षिक अधिवेशनास अध्यक्ष म्हणून बोलावलें. या वेळीं स्वतःची बरीच गैरसोय सोसूनहि सरोजिनी पूर्व-आफ्रिकेस गेल्या. १९२९ च्या लाहोर काँग्रेसनें त्यांचें याबद्दल अभिनंदन केलें. १९३० मध्यें त्या हिंदुस्थानांत परत आल्या.

## मिठाच्या सत्याग्रहाची मोहीम

सरोजिनी हिंदुस्थानास परतल्या त्या वेळीं महात्मा गांधींनीं मिठाच्या सत्याग्रहाचें रणशिंग फुंकलें होतें, व मिठाचा सविनय कायदेभंग सुरू करावयाचें ठरविलें होतें. ते मिठाचा कायदा मोडण्यासाठीं वर्धाश्रमापासून गुजराथमधील समुद्रकांठच्या दांडी नांवाच्या गांवीं दोनशें मैल पायीं जाणार होते. या दांडीयात्रेची बातमी देशभर पसरली. हजारों लोकांनीं त्यांना कळविलें कीं या मोहिमेंत भाग घेण्याची आपणांस परवानगी द्यावी. परंतु गांधीजींनीं प्रथम फक्त आपल्या आश्रमवासीय निवडक सहकाऱ्यांसहच या मोहिमेवर निघण्याचें ठरविलें. ता. १२ मार्च १९३० रोजीं सकाळीं निवडक अशा ७५ स्वयंसेवकांसह गांधींनीं सविनय कायदेभंगाच्या मोहिमेसाठीं आपला आश्रम सोडला. श्रीरामप्रभु अरण्यांत जावयास निघाले, त्या वेळीं अयोध्येंतील प्रजाजनांच्या मनांची जी स्थिति झाली तशीच स्थिति महात्माजींना निरोप देण्यासाठीं जमलेल्या असंख्य लोकांची झाली. प्रथम प्रार्थना झाली. सरोजिनी हजर होत्या. स्त्रियांनीं महात्माजींना ओंवाळलें व कुंकुमतिलक त्यांच्या माळीं लावला. पाठीवर वळकटी, व हातांत काठी घेऊन मोठ्या गंभीर मुद्रेनें महात्माजी आश्रमाबाहेर पडले. त्यांच्या मागून सत्याग्रही स्वयंसेवक चालूं लागले. आब्बास तय्यबजी व सरोजिनी देवीहि त्यांना निरोप देण्यासाठीं होत्या. ‘ रघुपति राघव राजाराम ’ या पवित्र शब्दांनीं वातावरण भरून गेलें. लहान थोरांचा कंठ भरून

आला. डोळे ओले झाले. देशाच्या इतिहासांत क्रांति घडवून आणणारा तो प्रसंग होता. वाटेंत ठराविक गांवीं मुक्काम करीत करीत दोन आठवड्यांनीं महात्माजींच्या सैन्याची छावणी भडोच येथें दाखल झाली. प्रयाणाच्या मार्गावर प्रत्येक ठिकाणीं लोक जमत आणि हिंदुस्थानाला मुक्त करणाऱ्या त्या महात्म्याला वंदन करीत. गांधींच्या जयजयकारानें आकाश दुमदुमून गेलें होतें. मुक्ततेचा नवीन मार्ग सुरू झालेला दिसत होता. परंतु उपदेश मात्र जुन्या मंत्रांचाच होत होता. त्यांत खादी वापरणें, मद्यपानापासून परावृत्त होणें व अस्पृश्यता निवारण या तीन मुख्य गोष्टी होत्या. खेड्यांची स्वच्छता व सूत कांतणें या गोष्टींवरहि ते भाषणांतून जोर देत. मात्र राष्ट्राची आज्ञा होतांच सत्याग्रहींनीं मोहिमेस येऊन मिळावें ही नवी मागणी होती. ता. २१ मार्चला अहमदाबादला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची बैठक झाली. तिनें आदेश दिला कीं, मिठाच्या कायद्याकडेच लोकांनीं लक्ष स्थिर करावें व गांधी दांडीस पोहोंचेपर्यंत व त्यांनीं मिठाचा कायदा मोडेपर्यंत सविनय कायदेभंग देशांत कोठेंहि सुरू होऊं नये. गांधींजीहि म्हणाले कीं, "मी सुरुवात करीपर्यंत थांबा. मी त्या जागेपर्यंत पोहोंचल्यावर तुम्हांस कल्पना येईल आणि तुम्ही काय करावयाचें तें तुम्हांस कळेल." परंतु मोहीम सुरू झाल्यानंतर गांधींची योजना लोकांना कळली, व योग्य वेळीं लोकांचा त्यांच्या या नवीन चळवळीला प्रचंड पाठिंबा मिळाला. असो. वर लिहिल्याप्रमाणें भडोचला महात्माजींना सरोजिनी व आब्बास तय्यबजी, श्री. कस्तुरबाई वगैरे मंडळी भेटली. दुपारीं ३॥ वाजतां तेथें प्रचंड जनसमूहापुढें महात्माजींचें भाषण झालें. भडोचहून सर्व मंडळी अंकलेश्वरला गेली. नर्मदा उतरेपर्यंत सर्व नागरिक महात्माजीस पोहोंचविण्यास गेले होते. नर्मदेच्या तीरापर्यंत सरोजिनी व आब्बास तय्यबजी, हे होते. उभयतांनीं महात्माजींचा मोठ्या प्रेमानें निरोप घेतला. एकंदर २४ दिवस प्रयाण केल्यानंतर ता. ५ एप्रिल रोजीं सकाळीं महात्माजी आपल्या सैनिकांसह दांडीस पोहोंचले. सरोजिनी

तेथें त्यांना भेटण्यासाठीं गेल्या. या प्रयाणांत कोठेंहि दंगा झाला नाहीं कीं अत्याचार झाला नाहीं. सरकारला कांहींच निमित्त मिळेना व या सत्याग्रही मोहिमेंत हात शिरकावतां येईना. ता. ६ एप्रिल रोजीं सकाळीं महात्माजी प्रथम मिठाचा सत्याग्रह करणार होते. पहांटे त्यांनीं स्नान केलें व प्रार्थना झाली. सर्वांनीं त्यांना चरणस्पर्शपूर्वक वंदन केलें. शेवटीं महात्माजींचें अत्यंत छोटें भाषण झालें. ते म्हणाले–" मला जर मिठाचा कायदा तोडतांना सरकारनें पकडलें तर माझ्या मागून तुम्ही आब्बास तय्यबजींच्या हुकुमांप्रमाणें वागा व त्यांनाहि जर सरकारनें कैद केलें तर सरोजिनी देवी जसें सांगतील तसें वागा." गांधीजी नंतर समुद्रकिनाऱ्यावर पडलेलें मीठ उचलून मिठाचा कायदा मोडण्यासाठीं आपल्या स्वयंसेवकांसह तिकडे निघाले. समुद्राच्या पाण्यांत त्यांचा पाय पडला आणि 'महात्मा गांधी की जय' या घोषणेनें तो प्रदेश दुमदुमून गेला. गांधीजींनीं किनाऱ्यावर पडलेलें मीठ सरकारी परवानगीशिवाय हातांत उचलून घेतलें. आणि सरोजिनी ओरडल्या, "कायदेभंग करणाऱ्या महात्म्याचें अभिनंदन असो." नंतरचा देखावा अपूर्वच होता. प्रत्येक स्वयंसेवक मिठाचें पोतें भर-भरून नेऊं लागला. अनायासें लाभणाऱ्या मिठाच्या ढिगांतून गांवकऱ्यांनीं कांहीं पोतीं भरलीं आणि छावणींत आणून ठेविलीं. पोलिसांना हें कळतांच त्यांनीं धडपड करून मीठ जप्त करून मोटारींतून भरून नेलें. पण दुसरे दिवशीं सकाळीं मात्र सत्याग्रह तीव्र झाला. पोलिसांनीं दांडगाई करून हातांतून मीठ हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांशीं उलट दांडगाई करूं नका व हातचें मीठहि सोडूं नका असा महात्माजींचा आदेश होता, व तो अहिंसेचा आदेश सर्वांनीं अक्षरशः पाळला. ओका-भाई नांवाच्या एका बार्डोलीच्या वीरानें हातांत मिठाची पुरचुंडी इतकी घट्ट धरून ठेविली होती कीं पोलिसांनीं हिसके देतां देतां त्याच्या मनगटावर रक्त आलें. तेव्हां पोलिस पळून गेले व ओकाभाई आपल्या मिठाच्या गठडी-सह दांडीस बापूजींच्या–महात्माजींच्या–दर्शनास आला, व त्यांना त्यानें

साष्टांग दंडवत घातलें. आपल्या पुण्याईचें हें फळ आहे असें त्यानें बापूजींना सांगितलें. महात्माजींनीं त्याला शाबासकी दिली. दुपारीं चार वाजतां वटवृक्षाखालीं सभा जमली. महात्माजींचा तो मौनवार असल्यानें सरोजिनी व आब्बास तय्यबजी यांना बोलण्याची आज्ञा महात्माजींनीं लिहून कळविली. त्या वेळीं एक सहज गंमतीचा प्रसंग घडला. त्यावरून सरोजिनी यांची दुःखांतहि आनंद पेरण्याची प्रवृत्ति कशी होती तें दिसून येतें. वर सांगितल्याप्रमाणें ठरलेल्या सभास्थानीं दोघे पुढारी आले. प्रारंभींचें रामनाम व वंदनपर पद्य चालू होतें. गांधींची दोघांना बोलण्याची आज्ञा होती हें खरें, पण आधीं कोणीं बोलावें याविषयीं सरोजिनी व आब्बास तय्यबजी आजोबा यांचा वाद सुरू झाला. वयोवृद्धत्वाचा मान म्हणून आजोबांच्या-कडे पहिली पाळी येई, तर राष्ट्रीय चळवळींत पुढाकार घेणारी विदुषी म्हणून सरोजिनींचा नंबर प्रथम येई. असें 'हो ना हो ना,' 'मी नाहीं तूं' हें प्रकरण सरोजिनीनें मोठ्या खुबीनें मिटविलें, आणि आपलेंच म्हणणें खरें केलें. सुरुवात स्वतः करून सरोजिनींनीं आजोबा आब्बास तय्यबजी यांस प्रथम सामोपचाराची विनंति करून भाषण करण्यास सांगितलें. आणि विनंति ऐकावयाचीच नसेल तर मी 'अध्यक्ष म्हणून हुकूम देतें तो मानलाच पाहिजे' असें हसत फर्माविलें. असो. याप्रमाणें ही पहिली सत्याग्रहाची मोहीम यशस्वी झाली. गांधी म्हणाले, "कार्याची सुरुवात चांगली व मनापासून झाली आहे म्हणून सर्व देशभर त्याला पाठिंबा मिळेल अशी मला आशा आहे." इतरत्र सर्व देशभर ता. ६ एप्रिल पासून मीठसत्याग्रहाला मोठ्या प्रमाणांत सुरुवात झाली. सरकारनें अनेक ठिकाणीं गोळीबार व लाठीहल्ले केले. तरीहि सत्याग्रही डगमगले नाहींत. सरो-जिनींनीं गांधींना वचन दिलें कीं तुम्हांला अटक झाली तर आम्ही तुमचें कार्य चालूच ठेवूं. गांधींनीं सरकारला मे महिन्यांत कळविलें कीं, गुजराथमधील धारासणा मिठागरावर हल्ला करण्याचा व त्या मिठागराचा ताबा घेण्याचा आपला इरादा आहे. त्यानंतर लगेच म्हणजे ता. ५ मे रोजीं पहाटे गांधींना

अटक झाली. त्या वेळीं सरोजिनींनीं राष्ट्राला स्फूर्तिदायक संदेश दिला. महात्माजींच्या मागून सत्याग्रहींचें पुढारीपण व सर्वाधिकारित्व श्री. आब्बास तय्यबजी यांनीं पत्करिलें. त्यांनाहि ता. १२ मे रोजीं अटक झाली. त्यानंतर गांधींच्या आज्ञेनुसार सरोजिनी या सत्याग्रहाच्या मोहिमेच्या सर्वाधिकारी झाल्या. तय्यबजींना अटक होण्यापूर्वी त्या वर्किंग कामेटीच्या बैठकीसाठीं अलाहाबादेकडे निघाल्या होत्या. परंतु तय्यबजींच्या अटकेची बातमी कळतांच त्या धारासणाकडे वळल्या, व ठरल्याप्रमाणें तेथील मोहिमेचें नेतृत्व पत्करिलें. "आगे बढो! आगे बढो!" अशी रणगर्जना करून त्यांनीं स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिलें. स्वतः अन्नपाणी न घेतां सबंध दिवस सरोजिनी मिठागरावर उन्हांत बसून राहिल्या. त्या वेळच्या हकीकतीचें वर्णन सरोजिनींनीं बलसारा कोर्टांत न्यायासनासमोर केलें आहे तेंच या ठिकाणीं उद्‌धृत करतों. "चौकशीच्या कामीं मी कसलाहि भाग घेऊं इच्छित नाहीं. धारासणा येथील चढाईबद्दलची सर्व जबाबदारी मजवर आहे. आब्बास तय्यबजी यांच्यामागून मीं आधिपत्य घ्यावें असा म. गांधींचा हुकूम होता; व त्याप्रमाणें ता. १६ रोजीं मीं चढाई केली. सत्याग्रही स्वयंसेवक एका स्त्रीच्या मागें लपले असा आक्षेप घेण्यास सरकारी नोकरांना जागा सांपडूं नये म्हणून मी त्या हल्ल्यांत भाग घेऊं नये असें युद्धमंडळानें माझ्या इच्छेविरुद्ध ठरविलें. परंतु मी प्रत्यक्ष रण-क्षेत्रावर होतें व पोलिसांच्या मारामुळें बेशुद्ध झालेले स्वयंसेवक खाटेवर घालून एकामागून एक आणलेले मीं पाहिले. पोलिसांनीं स्वयंसेवकांस पशुतुल्यपणें मारलें. त्या माराच्या जागेपासून मी दूर होतें; तथापि सत्याग्रही वीरांचें धीरोदात्त वर्तन पाहून मला अत्यंत समाधान वाटलें. पोलिसांचा अत्याचार असाच चालू असता तर युद्धमंडळाचा निर्णय बाजूस ठेवूनहि प्रत्यक्ष युद्धांत मीं भाग घेतला असता. मग त्या कामीं मला मृत्यु आला असता तरी पर्वा नव्हती. मिठागराच्या उत्तर-टोंकाला स्वयंसेवकांना पोलिस मारीत असतांना मीं समक्ष पाहिलें. तेव्हां मी तेथें जाऊन खऱ्या सत्या

आग्रहास साजेसें वागा व आपली जागा सोडूं नका असा त्यांना उपदेश केला. इतक्यांत मला अटक झाली." याप्रमाणें सरोजिनींना सत्याग्रहाबद्दल अटक झाली. वरीलप्रमाणें जबाब दिल्यावर त्यांना नऊ महिने साध्या कैदेची शिक्षा सांगण्यांत आली व त्यांना 'अ' वर्गांत दाखल करावें अशी मॅजिस्ट्रेटनें शिफारस केली. अर्थात् हा 'अ' वर्ग केवळ नांवापुरताच होता. सरोजिनींप्रमाणें म. गांधी, वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू, डॉ. सय्यद महमूद, श्री. जयरामदास दौलतराम हे पुढारीहि येरवड्याच्या तुरुंगांत होते. पं. मोतीलाल नेहरू व वरील सर्व पुढारी यांनीं एकत्र होऊन सरकारशीं समेटाच्या वाटाघाटी केल्या. सप्रू व जयकर हे या वाटाघाटींत मध्यस्थी होते. ता. १४ ऑगस्टला या सर्वांची येरवड्यास परिषद झाली. या परिषदेंत पुढाऱ्यांनीं मुख्य मागण्या सरकारकडे अशा केल्या कीं, हिंदुस्थान वाटेल त्या वेळीं साम्राज्यांतून निवृत्त होण्यास स्वतंत्र असावें, लोकांना जबाबदार अशी पूर्ण राष्ट्रीय राज्यपद्धति असावी व हिंदुस्थानच्या हक्कांच्या निर्णयाबद्दल लवाद नेमावें. पण या मागण्या सरकारला मान्य झाल्या नाहींत व वाटाघाटी फिसकटल्या. मात्र गांधी, सरोजिनी, वल्लभभाई पटेल, व जयरामदास दौलतराम यांनीं सप्रू-जयकर यांच्या परिश्रमांबद्दल त्यांचें आभारपूर्वक अभिनंदन केलें. शेवटीं २६ जानेवारी १९३१ या दिवशीं गांधी व त्यांचे २६ सहकारी यांना समेटाच्या वाटाघाटी करण्यासाठीं बिनशर्त सोडण्यांत आलें. नंतर तारीख ५ मार्च १९३१ रोजीं पुढारी व सरकार यांत समेट होऊन त्यावर सह्या झाल्या. हाच प्रसिद्ध गांधी—आयर्विन करार होय. तुरुंगांत असेपर्यंत सरोजिनींनीं गांधींची एकनिष्ठपणें सेवा केली. व आपल्या विनोदी भाषणांनीं तुरुंगांतील वातावरणांतहि त्यांनीं आनंद निर्माण केला. गांधींच्या बरोबर त्यांची मुक्तता झाली. पण या कारागृहवासाचा त्यांच्या आधींच नाजूक झालेल्या प्रकृतीवर आणखी वाईट परिणाम झाला व मग त्यांची प्रकृति जी एकदां ढासळली ती पुन्हा पूर्वपदावर आली नाहीं. आतां त्यांची

पन्नाशी उलटली होती; तारुण्याचा जोम कमी झाला होता. त्यांची पूर्वीची कांति, पूर्वीचा तजेला नामशेष झाला; तोंडावर सुरकुत्या आल्या, डोळे सुजमिट झाले. तरीसुद्धां त्यांनीं अखेरपर्यंत स्वातंत्र्ययुद्धांत अंतःकरणपूर्वक भाग घेतला.

## गोलमेज परिषद

गांधी-आयर्विन करार होऊन हिंदुस्थानचा प्रश्न सोडविण्यासाठीं इंग्लंडमध्यें राउंट टेबल कॉन्फरन्स्-सर्वपक्षीय गोलमेजपरिषद भरविण्याचें ठरलें. सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांना व संस्थानिकांना निमंत्रणें गेलीं. कॉंग्रेसचे प्रतिनिधि म्हणून महात्मा गांधी, सरोजिनी नायडू व पंडित मदन मोहन मालवीय यांची निवड झाली. परंतु याप्रमाणें सरकारकडून निमंत्रण आलें असतांना, एकीकडे करवसुलीबद्दल दंडुकेशाही व अरेरावी सरकारनें चालविलेलीच होती. त्यामुळें गांधींनीं परिषदेचें आलेलें निमंत्रण नाकारलें इंग्लंडमध्ये होणाऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहण्यास नकार दिला. सरोजिनी व मालवीय यांनींहि आपल्या बोटीचे परवाने रद्द केले. सरोजिनींनीं व्हाइसरॉयना कळविलें कीं, महात्माजी परिषदेस येत नसतील तर माझें निमंत्रण रद्द समजावें. परंतु आयत्या वेळीं पुन्हा व्हाइसरॉयची मुलाखत घेण्याचें गांधींनीं ठरविलें व बरीच चर्चा होऊन सर्व गोष्टींचा निर्णय लागल्यावर गोलमेज परिषदेसाठीं इंग्लंडला जाण्याचें गांधींनीं मान्य केलें. त्यांनीं २९ तारखेची विलायतेची बोट मुंबई बंदरांत गांठली. त्यांच्याबरोबर सरोजिनीहि निघाल्या. बरोबर घेतलेलें सामान अगदींच मोजकें होतें. कारण एकतर, जाण्याचें अगदीं थोडया वेळांत ठरलें व दुसरें मुख्य कारण म्हणजे गांधींची कडक शिस्त व देखरेख! इंग्लंडच्या वाटेवर एडन येथें त्यांचें सन्मानपूर्वक स्वागत झालें. इंग्लंडला पोहोंचल्यावर प्रत्यक्ष परिषदेचें अधिवेशन सुरू झालें तेव्हां ब्रिटिशांचें 'फोडा व झोडा' हें धोरण अंमलांत येऊं लागलें. हरिजनांचे पुढारी व मुसलमानांचे पुढारी आपापल्या

सक्त्या सुभ्यासाठीं अडून बसले. इंग्रजांची आंतून फूस होती. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्यासाठीं जिवापाड झटणाऱ्या सरोजिनींनीं आपल्या बिऱ्हाडांत मुसलमान पुढारी व महात्माजी यांच्या भेटीगांठीचे योग अनेकदां घडवून आणले. उभय पक्षांची एकी घडवून आणण्यासाठीं त्या सतत झटत होत्या, पण देशाच्या दुर्दैवानें त्यांचे श्रम व्यर्थ झाले! नामदार गोखल्यांच्या शब्दांची त्यांना आठवण झाली. त्यांच्या हळुवार मनाला अत्यंत दुःख झालें. शेवटीं गोलमेज परिषद संपली व स्वातंत्र्याच्या दृष्टीनें कांहींहि निर्णय न होतां पुढारी परत हिंदुस्थानास आले. याप्रमाणें प्रत्यक्ष कांहीं लाभ झाला नसला तरी हिंदुस्थानची राष्ट्रीय मागणी ब्रिटिश लोकांपुढें परिणामकारक रीतीनें मांडण्यांत आली. मात्र देशांतले मतभेद या परिषदेंत ठळक रीतीनें जगाच्या निदर्शनास आले. सरोजिनींनीं परिषदेंत बजावलें कीं डॉ. आंबेडकरांची अस्पृश्य वर्गाकरितां स्वतंत्र मतदारसंघाची मागणी ही त्या वर्गाचे अकल्याणासच कारण होईल. या परिषदेंत एकमत असें कोणाचेंच झालें नाहीं. "वसाहतीचें स्वराज्य" यासारख्या महत्त्वाच्या शब्दप्रयोगाच्या व्याख्याहि ठरलेल्या नव्हत्या! शेवटीं गांधींना रिक्तहस्तानें हिंदुस्थानास परत यावें लागलें! विलायतेंत असतांनाच सरकारनें सरोजिनींची आफ्रिकन राउंड टेबल कॉन्फरन्सवर नेमणूक केली, व त्यामुळें त्या परस्पर आफ्रिकेंत गेल्या. त्या परिषदेंत त्यांचें काम इतकें सर्वमान्य झालें कीं आफ्रिकेंतील हिंदी राहिवाशांचा प्रश्न त्यांच्या प्रयत्नामुळें समाधानकारक रीतीनें सुटूं लागला. म. गांधींचे खालोखाल आफ्रिकेच्या या प्रश्नांत सरोजिनींनींच लक्ष घातलें.

## १९३२ ची चळवळ

गांधी इकडे येतात तों सरकारनें आधींच गांधी–आयर्विन करार धाब्यावर बसवून जोराची दडपशाही व दंडुकेशाही चालविली होती. ज्या अटींवर काँग्रेसनें गोलमेज परिषदेंत भाग घेण्याचें कबूल केलें होतें त्या सरकारनें पाळल्या नाहींत! सरहद्द प्रांत, संयुक्त प्रांत, बंगाल या ठिकाणीं

वटहुकूम लागूं केले. शेंकडों देशभक्तांना सरकारनें तुरुंगांत घातलें. ता. ४ जानेवारी १९३२ रोजीं गांधी व वल्लभभाई पटेल यांना सरकारनें अटक केली. लवकरच साऱ्या देशाला वटहुकूम लागू केले. काँग्रेसनें चालविलेल्या अनेक संस्था बेकायदा ठरविल्या. पुष्कळ काँग्रेस कमिटया, आश्रम, राष्ट्रीय शाळा व इतर राष्ट्रीय संस्था बेकायदा ठरविण्यांत आल्या, व त्यांच्या इमारती सामानसुमान, पैसे व इतर जंगम माल जप्त करण्यांत आला. वर्किंग कमिटीनें ही दडपशाही पाहून आपले सर्व अधिकार अध्यक्षांना दिले. १९३१ च्या कराची काँग्रेसचे अध्यक्ष वल्लभभाई पटेल यांनीं आपल्या मागें एकामागून एक कोणी अध्यक्षाची जागा स्वीकारावी याची यादी तयार केली होती. या यादीप्रमाणें एका अध्यक्षानें आपल्या मागून येणाऱ्या अध्यक्षास सर्वाधिकार देऊं करावयाचे असें ठरलें, व या नवीन अध्यक्षानें तसेंच करावयाचें असें ठरविण्यांत आलें. पण बहुतेक नामवंत पुढारी तुरुंगांत जातां जातां शेवटीं सरोजिनी व मालवीय एवढे दोघेच बराच काळ मोकळे राहिले. सरोजिनी या आफ्रिकन गोलमेज परिषदेहून नुकत्याच हिंदुस्थानास परत आल्या होत्या. अर्थात् या दोघां पुढाऱ्यांवर काँग्रेसच्या कार्याची मुख्य जबाबदारी आली. चळवळीचें धोरण आधींच ठरून गेलें होतें व त्या धोरणाप्रमाणें चळवळ चालली आहे कीं नाहीं हें त्यांना पाहावयाचें होतें. १९३० सालीं ज्या धोरणानें लढा चालू होता त्याच धोरणानुसार १९३२ सालीं चळवळीला सुरुवात झाली होती. मात्र ही चळवळ पूर्वीपेक्षां अधिक तीव्र होती. दडपशाहीसुद्धां अधिक तीव्र झाली होती व लोकांच्या हाल-अपेष्टा अधिक खडतर होत्या. दारू, परदेशी कापड, ब्रिटिश माल यांच्या दुकानांवर निरोधन करणें, जंगलांचे कायदे मोडणें, मिठाचा सत्याग्रह, सभा, मिरवणुकीचे मनाई हुकूम मोडणें, थोर व्यक्तींच्या गौरवार्थ किंवा स्मरणार्थ खास दिन पाळणें, सरकारच्या ताब्यांत गेलेल्या इमारती परत घेण्याचे प्रयत्न करणें, बुलेटिन्स्चा प्रसार करणें; बहिष्काराची चळवळ मोठया प्रमाणावर हातीं घेणें इत्यादि अनेक

मार्गांनीं चळवळ सुरू झाली. हजारोंनीं लोक तुरुंगांत जाऊं लागले. जादा तुरुंग उघडले तरी सरकारला सर्वांची व्यवस्था करणें अशक्य झालें. त्यामुळें अत्यंत असमाधानकारक व्यवस्था होऊं लागली. सरकारनें आरंभापासून लाठीहल्ले, गोळीबार, छळ, जप्त्या, दंड इत्यादि मार्गांनीं दंडुकेशाही चालविली होती. याप्रमाणें देशांत दडपशाहीचा कहर उसळला असतांना सरोजिनींनीं त्या भीषण परिस्थितीला धैर्यानें तोंड दिलें; आपण कॉंग्रेसचे अध्यक्ष आहोंत असें जाहीर केलें; व कॉंग्रेसची सभा बेकायदेशीर ठरविली गेली असतांहि ता. २४ एप्रिल रोजीं दिल्ली येथें ४७ वी राष्ट्रीय सभा भरविण्याचें शिंग फुंकलें. त्यांच्या जोडीला पंडित मदन मोहन मालवीय हे होते. ही सभा चांदणी-चौकांतील क्लॉक-टॉवरखालीं पोलिसांची नजर चुकवून भरली. दहा मिनिटांत पांच ठराव पास करून सभा पार पाडण्यांत आली. वास्तविकं सरकारनें या वेळीं या दोन पुढाऱ्यांशीं सामोपचार करण्याची संधि साधावयास पाहिजे होती. कारण तुरुंगाबाहेर अजून राहिलेले हे दोन पुढारी विचारी व सामप्रिय असे होते. सरकारनें त्यांच्याशीं सामोपचाराचें धोरण ठेवलें असतें तर राष्ट्रीय सभा ज्या पद्धतीनें भरली तशी भरली नसती किंवा भरली असती तर उघड उघड व पद्धतशीर रीतीनें भरली असती. आपसांतलीं भांडणें असोत किंवा परकीय सरकारशीं भांडण असो, जर विरुद्ध पक्षांतल्या तडजोडीमुळें देशाचें हित होत असेल तर अशी तडजोड करण्यास सरोजिनी नेहमीं तत्पर असत, हें आतां सर्वविश्रुत होतें. मग धूर्त सरकारी अधिकाऱ्यांना ही त्यांची वृत्ति माहीत नव्हती असें कसें म्हणतां येईल? सरोजिनींनीं या गोष्टीचें नुकतेंच प्रत्यंतराहि दिलें होतें. तें असें कीं, कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यानंतराहि अगदीं थोड्या दिवसांपूर्वी खुद्द हिंदुस्थानसरकारतर्फे शिष्टमंडळाच्या एक सभासद म्हणून त्या नुकत्याच दक्षिण-आफ्रिकेला जाऊन आल्या होत्या, व दिल्ली सरकारच्या पाहुण्या म्हणून राहिल्या होत्या. परंतु सरकारनें सरोजिनींनीं

केलेली ही सहकारिता लक्षांत घेतली नाहीं; व सरोजिनी आणि मालवीय यांच्या प्रभावी नेतृत्वाखालीं होणारें कॉंग्रेसचें अधिवेशन भरूं द्यावयाचें नाहीं असा चंग बांधला! परंतु सरकारच्या या आव्हानाला या दोघां देशभक्त नेत्यांनीं व लोकांनीं चोख उत्तर दिलें व ही सभा सकाळीं नऊ वाजतां वर उल्लेखिल्याप्रमाणें दिल्लीच्या चांदणी चौकांत क्लॉक टॉवरखालीं भरविली. पोलिसांची नजर चुकवून शें-दोनशें प्रतिनिधि सभेच्या जागीं हजर राहिले होते. या अधिवेशनांत वार्षिक रिपोर्ट सादर करण्यांत आला व पांच ठराव मंजूर करण्यांत आले. पूर्ण स्वातंत्र्याचें ध्येय, कायदेभंगाच्या चळवळीचें पुनरुज्जीवन, गांधींची आज्ञा राष्ट्रानें पाळल्याबद्दल राष्ट्राचें अभिनंदन, महात्मा गांधींच्या नेतृत्वावर विश्वास, अहिंसेवर पूर्ण श्रद्धा व सरहद्द प्रांतांतील पठाणांचें अहिंसा व्रताबद्दल अभिनंदन, याप्रमाणें ठराव झाले. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थानीं पंडित मदन मोहन मालवीय यांची योजना करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. पण दिल्लीकडे येतांना वाटेंतच त्यांना पकडण्यांत आलें. म्हणून अहमदाबादचे शेठ रणछोडदास अमृतलाल यांना अध्यक्षपद दिल्याचें सांगण्यांत आलें. कॉंग्रेसचें हें अधिवेशन फक्त दहा मिनिटें चाललें! पण यावरून तें जितकें अपूर्व तितकेंच चैतन्ययुक्त झालें. सुमारें पांच हजार प्रेक्षकांनीं चौकाभोंवतीं उभें राहून हें अधिवेशन पाहिलें. मालवीयजींची एक आठवड्यानंतर बिनशर्त मुक्तता झाली. तर उलट सरोजिनींना बंदी हुकूम मोडून दिल्लीस येत असतांना बांद्रें स्टेशनवर फ्रॉंटियर मेलमध्यें अटक झाली. सरोजिनींवर खटला होऊन त्यांना एक वर्षाची शिक्षा फर्माविण्यांत आली. कॉंग्रेस चळवळीचा भार आतां एकट्या वृद्ध मालवीयजींवर पडला. पण पितामह भीष्माचार्यांप्रमाणें त्यांची शौर्य-वृत्ति अचल होती. त्यांनीं अधिकाऱ्यांच्या दडपशाहीला उजेडांत आणलें व कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनीं दाखविलेल्या अदम्य उत्साहाबद्दल त्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें. त्यांना योग्य सल्लामसलत देण्यास मालवीयजी नेहमीं तयार असत.

पुढें ता. ३० मार्च १९३३ रोजीं कलकत्ता कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. तेंहि अधिवेशन मोडण्याचा पोलिसांनीं प्रयत्न केला, पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. पोलिसांचा लाठीमार चालू असतांहि प्रतिनिधींच्या आंतील गटानें अधिवेशनापुढील सातहि ठराव वाचीपर्यंत व ते मंजूर होईपर्यंत आपल्या जागा सोडल्या नाहींत. पंडित मालवीय, कॉंग्रेसचे तात्पुरते अध्यक्ष लोकनायक अणे यांसुद्धां सारे पुढारी तुरुंगांत असल्यानें बॅ. सेनगुप्त यांच्या युरोपियन पत्नी सौ. नलिनी सेनगुप्त यांनीं सरकारी हुकूम मोडून अधिवेशनाचें काम चालविलें. त्यांनाहि अटक व सहा महिन्यांची शिक्षा झाली.

यानंतर अनपेक्षित असा प्रसंग घडला. हरिजनांच्या कार्यांत वाढत्या संख्येनें लोकांनीं सामील व्हावें म्हणून कार्यकर्त्यांना मदत करण्याकरितां व त्यांच्या कार्यांत अधिक शुद्ध व अधिक सत्य स्वरूपाची सेवावृत्तीची भावना निर्माण करण्यासाठीं महात्मा गांधींनीं ता. ८ मे १९३३ रोजीं दोन प्रहरीं बारा वाजतां येरवड्याच्या तुरुंगांत आपल्या एकवीस दिवसांच्या आगाऊ जाहीर केलेल्या उपोषणास सुरुवात केली. सरकारनें त्याच दिवशीं एक पत्रक काढून सायंकाळीं गांधींना मुक्त केलें. त्यांच्या सुटकेचें वर्तमान सायंकाळीं ७॥ वाजतांच येरवड्याच्या तुरुंगांत सरोजिनींना कळविण्यांत आलें व त्यांचीहि गांधींबरोबर सुटका झाली. प्रत्यक्ष तुरुंगांतून बाहेर रवानगी होण्यास रात्रींचे नऊ वाजले. प्रार्थना, सामानसुमानाची बांधाबांध एवढें होण्यास इतका वेळ लागणें साहजिक होतें. गांधींजींनीं आपला मुक्काम पुण्याजवळ लेडी प्रेमलीलाबाई ठाकरसी यांच्या भव्य प्रासादांत ठेवला. उपवास चालू असल्यानें ते तिसऱ्या मजल्यावरील उघड्या जागेंत खाटेवर पडून राहात. जवळ सरोजिनी, व्रजकिशोर वगैरे मंडळींचा पहारा असे. पुढें महात्मा गांधींच्या सूचनेवरून कॉंग्रेसचे अध्यक्ष लोकनायक अणे यांनीं कायदेभंगाची चळवळ सहा आठवडे तहकूब केल्याचें जाहीर केलें. सरोजिनींचेंहि मत चळवळ पुढें

चालविण्याला प्रतिकूल होतें. गांधींचें उपोषण निर्विघ्नपणें सुटलें व कायदे-भंगाची चळवळ आणखी सहा आठवडे तहकूब ठेवण्यांत आली. शेवटीं सामुदायिक कायदेभंगाची चळवळ बंद करण्यांत आली व गांधींनीं वैयक्तिक कायदेभंगाच्या चळवळीस आरंभ केला. ऑगस्ट १९३३ ते मार्च १९३४ पर्यंत सर्व देशभर अनेक कार्यकर्त्यांनीं ही चळवळ चालू ठेवली. या वैयक्तिक कायदेभंगांताहि हजारों लोकांनीं भाग घेतला. पुढें महात्माजींनीं आपलें लक्ष मुख्यत्वें हरिजनचळवळीच्या प्रसाराकडेच पुरविलें. पुन्हां कौन्सिलप्रवेश करावा असें म्हणणारा कॉंग्रेस अंतर्गत लोकशाही स्वराज्यपक्ष मुंबईस स्थापन झाला. त्याच्या पाठोपाठ मद्रास इलाख्यांत श्री. सत्यमूर्ति यांच्या प्रेरणेनें कॉंग्रेस स्वराज्यपक्ष उदयास आला. याप्रमाणें कॉंग्रेस गोटांत फाटाफूट होऊं लागली. फेरवाले व नाफेरवाले हीं जुनीं भांडणें सुरू झालीं. सरोजिनींनीं हीं भांडणें मिटविण्याची व समन्वय करण्याची शिकस्त केली. शक्य तितकें पक्षातीत राहून विधायक कार्यावर सर्वांनीं अधिक जोर द्यावा असें त्यांनीं सांगितलें. शिवाय लवकरच पाटणा येथें ऑल इंडिया कॉंग्रेस कामिटीच्या सभेंत कौन्सिल-प्रवेशास मान्यता देण्यांत आली व कॉंग्रेसनें आगामी कौन्सिल निवडणुका लढविण्याचें ठरविलें. त्याकरितां कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्ड स्थापन करण्यांत आलें. या बोर्डाच्या एक सभासद सरोजिनी होत्या. पाटण्याला बऱ्याच चर्चेनंतर म. गांधींनीं आणलेला कौन्सिल-निवडणुकीचा ठराव पास झाल्यावर सरोजिनींनीं "राष्ट्रीय सभेचें पुढचें अधिवेशन १९३४ च्या ऑक्टोबरमध्यें पहिल्या आठवड्यांत मुंबईस भरवावें" असा ठराव मांडला व त्याला श्री. नरीमन यांनीं अनुमोदन दिलें व तो एकमतानें पसार झाला. ता. २६ ऑक्टोबर रोजीं बिहाररत्न बाबू राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस कॉंग्रेसच्या अधिवेशनास वरळीच्या विशाल मैदानावर सुरुवात झाली. सरोजिनींनीं गेल्या चळवळींत भाग घेतलेल्या सत्याग्रहींचें अभिनंदन करणारा व अनत्याचारात्मक सविनय सत्याग्रहावर

विश्वास दर्शविणारा ठराव मांडला व तो ठराव सम्मत झाला. या ठरावावर त्यांनीं दहा पंधरा मिनिटेंच भाषण केलें; पण तें इतकें वक्तृत्वसंपन्न, स्वाभिमानपूर्ण व आशाजनक असें वठलें कीं, त्या तेवढ्या अवधींत श्रोत्यांचें लक्ष पळभरहि इकडे तिकडे चळूं शकलें नाहीं. असो. या काँग्रेसच्या अधिवेशनानंतर काँग्रेसनें कौन्सिलच्या निवडणुकी लढविल्या. त्यांत प्रचंड यश मिळविलें. मंत्रिमंडळें बनविलीं. तिकडे युरोपांत लढाईला १९३९ मध्यें सुरुवात झाली. तींत इंग्रजांनीं हिंदुस्थानला गोंवलें. परंतु काँग्रेसच्या मनाजोगते युद्धहेतु इंग्रज सरकारनें जाहीर न केल्यामुळें मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिले. काँग्रेसनें पुन्हा वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरू केली. तींत सरोजिनींनीं भाग घेतला. सरकारनें त्यांना तुरुंगांत घातलें.

## १९४२ व नंतर

१९४२ सालांत 'छोडो भारत' 'चले जाव' ची प्रचंड चळवळ सुरू झाली. सरकारनें पहिल्या श्रेणीच्या पुढाऱ्यांना तुरुंगांत डांबून ठेवलें. त्यांत सरोजिनीहि होत्या. अहमदनगरचा किल्ला त्या वेळीं फार प्रसिद्धीस आला. कारण राष्ट्राचे वंदनीय पुढारी त्या किल्ल्यांत होते. सरोजिनींना महात्मा गांधींच्या समवेत राहण्यास मोकळीक देण्यांत आली होती. सरकारनें महात्माजींना पुण्याच्या आगाखान-प्रासादांत आणून ठेवलें. पुढें त्यांच्या सोबतीला कस्तुरबा, सरोजिनी, महादेवभाई देसाई यांना आणण्यांत आलें. या ठिकाणीं सरोजिनींच्या सान्निध्यांत कारागृहाचें वातावरण घरच्या वातावरणासारखें झालें. दुर्दैवानें महात्माजींवर या वेळीं दोन मोठे आघात येऊन पडले. महादेवभाई देसाई व त्यानंतर कांहीं कालावधीनें कस्तुरबा गांधीजींना इहलोकीं सोडून गेल्या. गांधीजींच्या दुःखाला तर सीमा नव्हती. या सरोजिनींनाहि पराकाष्ठेचें दुःख झालें. पण आपल्या सहज-विनोदप्रिय स्वभावानें त्यांनीं या दारुण प्रसंगांत महात्माजींना दुःख विसरण्यास हातभार लावला हेंहि कांहीं थोडें नाहीं. पुढें १९४३ सालीं तुरुंगांत त्या

फार आजारी पडल्या. म्हणून त्या निमित्तानें सरकारनें त्यांची मुक्तता केली. १९४४ मध्यें गांधींची मुक्तता झाल्यानंतर त्यांनीं गांधींची अविश्रान्त शुश्रूषा केली व त्याचा गांधीजींच्या प्रकृतीवर चांगला परिणाम होण्यास मदत झाली. कॉंग्रेसचे बहुतेक सारे पुढारी तुरुंगांत असल्यानें तिचा संदेश जनतेस पोहोंचविण्यास सरोजिनींना अविरत श्रम करावे लागले. १९४५ सालीं त्यांनीं मद्रास प्रांताला भेट दिली त्या वेळीं तेथील लोकांत पुनः उत्साह उत्पन्न झाला. मद्रासला आंध्र महिला सभेच्या इमारतीची कोनशिला बसविण्याचा समारंभ त्यांच्या हस्तें साजरा झाला. देशाच्या उन्नतीला स्त्रियांच्या उन्नतीचीहि अत्यंत आवश्यकता आहे असा त्यांचा पूर्ण विश्वास होता व म्हणून भारतीय स्त्रियांच्या उन्नतीसाठीं त्यांनीं शेवटपर्यंत परिश्रम केले. जिनीव्हास आंतरराष्ट्रीय महिला परिषद झाली. तेथेंहि " भारतीय स्त्रियांचें श्रेष्ठत्व " या विषयावर झालेलें त्यांचें व्याख्यान फारच गाजलें. मार्च १९४७ मध्यें आशियाची पहिली आंतरराष्ट्रीय परिषद दिल्लीला भरली होती. तिच्या त्या अध्यक्ष होत्या तेव्हां " आशिया खंड हें जगाला तारील " असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. " कित्येक शतकपर्यंत आशिया हा संकुचित क्षेत्रांत वावरत आहे. परंतु आतां त्याची ही घातक व घोर निद्रा नाहींशी झाली असून तो जागा झाला आहे. सध्यांचा काळ प्रभावी नि वेगशाली आहे व त्याचाच हा सुपरिणाम होय. आशियांतील अनेक राष्ट्रें एकमेकांजवळ यावयाचीं असतील व त्यांच्यांत स्नेहभाव निर्माण व्हावयाचा असेल तर शांतता हेंच सर्वांचें ध्येय असणें अवश्य आहे. मात्र ही शांतता नाममात्र किंवा शरणागतीमुळें पत्करावी लागणारी शांतता नव्हे. तर जिच्यामुळें मानवसमाज उच्च पातळीवर राहील व तो कृतिशील नि समर्थ होईल अशीच शांतता आशियांत नांदली पाहिजे " असा संदेश त्यांनीं या परिषदेंत दिला.

## वैभवाच्या शिखरावर

राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांची सुटका झाल्यानंतर ब्रिटिश कॅबिनेटबरोबर स्वराज्याच्या वाटाघाटी करण्यांत त्यांनीं प्रत्यक्ष भाग घेतला. जुलै १९४७ मध्यें ब्रिटिश पार्लमेंटनें केलेल्या हिंदी स्वातंत्र्याच्या कायद्याला राजेसाहेबांनीं अनुमति दिल्यावर हिंदुस्थानाचीच भारत व पाकिस्तान अशी विभागणी करून दोन स्वतंत्र राष्ट्रें करण्यांत आलीं. अखंड हिंदुस्थानाचीं दोन शकलें झालीं! तरीपण समाधानाची गोष्ट अशी कीं, दोन हजार वर्षांनंतर पहिल्यांदाच भारताचा एवढा मोठा भू-भाग स्वतंत्र होऊन तो एका सत्तेखालीं नांदूं लागला. हिंदी पुढाऱ्यांचा त्याग व ब्रिटिश राज्यकर्त्यांची युद्धामुळें झालेली असहाय परिस्थिति या सर्वांचा परिणाम होऊन हिंदुस्थानाला अचानक स्वातंत्र्याचा लाभ झाला! ता. १४ ऑगस्ट १९४७ या दिवशीं म्हणजे स्वातंत्र्य-स्थापनेच्या आदल्या दिवशीं दिल्ली राजधानींतून सरोजिनींनीं स्फूर्तिशाली संदेश दिला. त्या म्हणाल्या, "पृथ्वीराजाच्या या प्राचीन राजधानीवर स्वातंत्र्याची मंगल सुप्रभात आपल्या भरजरी वेषांत उगवत आहे. शहाजहान बादशहाच्या या लाल किल्ल्यावर उद्यां स्वतंत्र भारताचा ध्वज फडकणार! आम्ही आमचीं मस्तकें त्या ध्वजापुढें लववितों. कित्येक वर्षांच्या परदास्यामध्यें असतांना आम्ही जीं स्वप्नें रंगविलीं होतीं तीं प्रत्यक्षांत आणण्यासाठीं आम्ही आमचीं देहमनें अर्पू." ता. १५ ऑगस्टला पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या हातांत राज्यसूत्रें आलीं. अनेक त्यागी पुढाऱ्यांच्या अनेक प्रांतांत मोठमोठ्या अधिकारपदांवर नियुक्ति झाल्या. अडुसष्ट वर्षांच्या सरोजिनी देवी ता. १५ ऑगस्ट १९४७ या दिवशीं संयुक्त प्रांताच्या गव्हर्नरच्या सिंहासनावर आरूढ झाल्या. यापूर्वीं आजारीपणामुळें आपल्याला हें अधिकारपद स्वीकारतां येत नाहीं असें त्यांनीं सांगितलें होतें. परंतु डॉ. बिधानचंद्र रॉय हे अमेरिकेहून परत येईपर्यंत सरोजिनींनींच गव्हर्नरचे जागेवर यावें असा गांधीजी व पंडित नेहरू यांनीं त्यांना आग्रह

केला व म्हणूनच सरोजिनींनीं तें पद स्वीकारलें. पुढें डॉ. रॉय परत आले. परंतु त्यांनीं स्वतः गव्हर्नर होण्यास नकार दिल्यामुळें सरोजिनीच गव्हर्नर म्हणून राहिल्या. त्या महत्पदावर आरूढ होत असतांना हिंदु, जैन, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम व शीख या धर्मांतील पवित्र ग्रंथांचें वाचन चाललें होतें. संयुक्त प्रांताची राजधानी लखनौ येथील गव्हर्न्मेंट हाउसवर त्यांच्या हस्तें राष्ट्रध्वजारोपण व ध्वजवंदन झालें. या मंगल प्रसंगीं आकाशांत विमानें संचार करीत होतीं. त्या विमानांतून पुष्पवृष्टि करण्यांत आली. या शुभदिनीं तेथें जमलेल्या अफाट जनसमुदायास उद्देशून त्या म्हणाल्या, "स्वतंत्र-भारताच्या स्त्रीपुरुषहो! आपल्या राष्ट्रध्वजाचा मान राखा. आपल्या देशांतल्या हजारों लोकांनीं ज्या हालअपेष्टा सोसल्या त्यांचा निदर्शक म्हणजे हा आपला राष्ट्रध्वज होय. या शुभप्रसंगीं हाच माझा तुम्हांला संदेश आहे. मी या ध्वजाला प्रणाम करतें. आज आपण स्वतंत्र भारताचे नागरिक झालों. पंडित जवाहरलाल नेहरू हे आपले पहिले मुख्य प्रधान आहेत. यापुढें जें मोठें कार्य आपणांला करावयाचें आहे त्या कामीं सर्व जातींच्या स्त्रीपुरुषांच्या सहकार्याची मी याचना करतें. माझ्या हातांनीं फडकावलेला हा ध्वज तुम्हांला सुरक्षितता, शांतता, व समता यांचा लाभ करून देईल अशी मला आशा आहे." सैनिकांना उद्देशून बोलतांना त्या म्हणाल्या– "सैनिकांनो, देशांत शांतता व सुरक्षितता ठेवणें व त्यांचें दुःख निवारण करणें हें तुमचें परमकर्तव्य आहे. स्वतंत्र भारताच्या ध्वजाचा मान राखा." ऑल इंडिया रेडिओवरून त्यांचें भाषण झालें तेव्हां त्या म्हणाल्या, "आपला भारतवर्ष पुनश्च जगाच्या आघाडीवर येत आहे, व जगांतील कलहद्वेषाच्या अंधकारांत आपल्या शांतीचा, मित्रत्वाचा नि प्रेमाचा दीप पाजळीत आहे. जगतांतल्या स्वतंत्र राष्ट्रांनो! आज हा स्वतंत्र भारत तुम्हांला अभिवादन करीत आहे. जगतांतल्या परतंत्र राष्ट्रांनो! तुमच्या भावी स्वातंत्र्यासाठीं आम्ही परमेश्वराची प्रार्थना करतों. आमच्या या स्वातंत्र्याचा लढा कित्येक

वर्षें चालला होता. त्याकरितां कित्येकांनीं प्राणार्पण केलें. त्या विपत्तींतून आमचा आज पुनर्जन्म झाला आहे. पृथ्वीवरील राष्ट्रांनो! ही आमची भारतमाता— जिच्या घराचें छत हिमाच्छादित आहे, जिच्या घराच्या भिंती सागरवलयांकित आहेत, आणि जिच्या घराचीं द्वारें तुम्हांला खुलीं आहेत तिच्या वतीनें मी तुम्हांला अभिवादन करतें. तिचें हें स्वातंत्र्य आपणां सर्वांना परमोच्च शांतिपद प्राप्त करून देईल."

सरोजिनी गव्हर्नर झाल्यावर पाकिस्तान व भारत-पाक सरहद्दीवर भीषण अत्याचार चालले होते. त्यांच्या वार्ता त्यांच्या प्रांतांत येऊन थडकत. तो प्रसंग भयंकर होता. जातीय तेढ धुमसत होती. निर्वासितांचा प्रश्न कठिण होता. तरी अशाहि संकटमय परिस्थितींत त्या डगमगल्या नाहींत. त्या सर्वांशीं प्रेमानें व सौजन्यानें वागल्यामुळें वातावरण शांत राहिलें. संयुक्त प्रांतांतील स्त्रियांच्या संघटित प्रयत्नांमुळें त्यांनीं निर्वासितांना द्रव्य व वस्त्र यांचें चांगलें साह्य केलें व या रीतीनें आपल्या प्रांतांतील निर्वासितांचा प्रश्न त्यांनीं समाधानकारक प्रकारें सोडविला. हिंदु-मुस्लिम ऐक्य हें तर त्यांचें जीवितकार्यच होतें. अर्थात् या दोन्ही समाजांत पाकिस्तान-निर्मितीनंतर सलोखा टिकावा असा त्यांचा प्रयत्न असे. ता. १८ ऑक्टोबर १९४७ रोजीं लखनौला शांतता-परिषद भरली त्या वेळीं त्या म्हणाल्या "जेव्हां पाकिस्तानचा प्रश्न उद्भवला तेव्हां लोकांना वाटलें, आतां हिंदुस्थान मरणार! पण हीं दोन राष्ट्रें एक होण्यासाठीं मी आपल्या उत्साहाचा, श्रद्धेचा, अंतर्दृष्टीचा, आशेचा व भावनांचा उपयोग करीन. माझी श्रद्धा कधींहि ढळत नाहीं. ती अचल आहे. माझ्या हाडामांसाच्या लोकांना मी वेगळें कसें ठेवूं? माझी मनाची ही अशी ठेवण आहे. म्हणूनच तुम्ही एक व्हा, अशी मी तुम्हांला विनंति करतें. आपला हा प्रान्त म्हणजे हिंदु-मुस्लिम या उभय संस्कृतींतील उत्तमोत्तम गोष्टींचें आश्रयस्थान आहे, व हें या प्रान्ताचें वैशिष्ट्य आहे." आपली एक जुनी आठवण या वेळीं सांगतांना त्या म्हणाल्या, "याच ठिकाणीं मागें एकदां

मुस्लिम लीगचें अधिवेशन भरलें होतें. महमुदाबादचे राजेसाहेब अधिवेशनाला आले होते. कायदे-अजम जिना हे त्या वेळीं काँग्रेसचे एकनिष्ठ सभासद होते. या अधिवेशनासाठीं मी मुंबईहून येथें इतक्या लांब अंतरावर मुद्दाम आलें होतें, तें केवळ हिंदु-मुस्लिम ऐक्याची माझी अमर इच्छा व्यक्त करण्याकरितां."

आपल्या स्नेहशील स्वभावामुळें सरोजिनी या गव्हर्नर म्हणूनाहि अतिशय लोकप्रिय झाल्या. त्या एवढ्या पदावर चढल्या तरी त्यांच्या वृत्तींत काडीचाहि फरक झाला नव्हता. "मी 'गव्हर्नर' नसून 'गव्हर्नेस' म्हणजे जनतेची सेविका आहें," असें त्या म्हणत व त्यांनीं हें आपलें बोलणें अक्षरशः खरें करून दाखविलें. त्यांनीं गव्हर्नमेंट हाउसच्या दिवाणखान्यांना साधी भारतीय सजावट केली. बाहेरील रम्य उद्यानांतल्या रंगीबेरंगी विविध फळांफुलांच्या संगतींत हिंडण्याफिरण्यांत त्यांना आनंद वाटे. इतकें असूनाहि आपल्या प्रासादांतील ऐश्वर्याची त्यांना आसक्ति नव्हती. त्या सतत आपल्या प्रासादांत कधींच बसून राहिल्या नाहींत. त्या लोकांत मिळून मिसळून वागत. ज्या ज्या ठिकाणीं त्या जात त्या त्या ठिकाणीं दुःखाचा अंधकार नाहींसा होऊन सुखाची शीतल चंद्रप्रभा पसरत असे. गव्हर्नरबाई झोपडींत आल्या म्हणजे तेथल्या लोकांना जो आनंद होई तो शब्दातीत आहे. गव्हर्नर झाल्यानंतर त्या एकदां विनोदानें म्हणाल्या होत्या कीं, "रानांतल्या पक्ष्याला पिंजऱ्यांत घातलें आहे." परंतु गव्हर्नरचें हें अधिकारबंधन त्यांच्या लोकसमूहांतील संचाराला आडवें आलें नाहीं. तसेंच सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांना त्या निस्सीम आदरातिथ्यानें वागवीत. सर्वांशीं मनमोकळ्या बोलत. गप्पागोष्टी व आतिथ्य-सत्कार यांची त्यांना अतिशय आवड असे. पूर्वीं मुंबईस असतांना त्या 'ताजमहाल' हॉटेलमध्यें राहात असत. तेथेंहि त्यांच्या दिवाणखान्यांत राजे महाराजांबरोबर कट्टा समाजवादीहि आढळत असे. त्यांच्यांशीं तासन् तास गप्पागोष्टी चालावयाच्या. त्यांचे मित्र म्हणत, या

अन्नापेक्षां गप्पांवरच अधिक जगतात. या गप्पागोष्टींत त्यांची विनोदप्रियता विशेष दिसे. असो.

गव्हर्नराच्या जागेबरोबर इतराहि अनेक जबाबदारीचीं कामें त्यांनीं केलीं. लखनौ युनिव्हर्सिटीच्या त्या चॅन्सेलर होत्या. विद्यार्थ्यांनीं त्यांना केव्हांहि आणि कुठेंहि बोलवावें, त्या मोठ्या आनंदानें हजर राहात व व आपल्या विनोदी व्याख्यानानें तरुणांचे चेहरे प्रफुल्लित करीत. बालकांच्या समूहांत बालांप्रमाणें तर तरुणांत तरुणांप्रमाणें वागून त्या नवचैतन्य निर्माण करीत. देशांतील तरुणांवर त्यांचा फार मोठा विश्वास असे, व तरुणांनाहि त्या अतिशय प्रिय होत्या. “ माझ्या मृत्यूनंतर माझ्या स्मारकाच्या चिऱ्यावर ‘ भारतीय युवकांवर हिचें प्रेम होतें ’ ही ओळ असूं द्या ” असें एकदां सरोजिनी म्हणाल्या होत्या. या त्यांच्या उद्गारां-वरून त्यांचें भारतांतील तरुणांवर निस्सीम प्रेम व्यक्त होतें, हें सहज समजतें. १९४७ सालीं विद्यापीठाच्या परीक्षेंत बरेच विद्यार्थी नापास झाले. त्यांनीं एक प्रसंग साधून सरोजिनींना घेरलें व त्यांना विनंति केली कीं, स्वातंत्र्यप्राप्तीनिमित्त या वर्षी परीक्षांतील गुण वाढवून विद्यार्थ्यांना पास करावें. अल्लड विद्यार्थ्यांची ही अल्लड मागणी होती ! सरोजिनींना खरेंच वाटलें कीं या बाबतींत आपण कांहींतरी करावें. त्या विद्यापीठाच्या एका अधिकाऱ्याला म्हणाल्या, “ उप-कुलगुरूंना सांगून या बाबतींत कांहीं तरी केलें पाहिजे. ” त्या वेळची आठवण सांगतांना त्या विद्यापीठाचे डीन प्रा. भट्टाचार्य यांना हंसत हंसत म्हणाल्या, “ या वर्षापुरतें तरी विद्यार्थ्यांना गुण वाढवून द्यावे असें मला व्हाइस चॅन्सेलर डॉ. ताराचंद यांना सांगावें लागलें. कारण मी जिकडे जाई तिकडे विद्यार्थी माझ्या मागें येत. त्यामुळें असें सांगण्यावांचून मला गत्यंतर नव्हतें. ”

. अनेक मोठ्या समारंभ प्रसंगीं त्यांनीं महत्त्वाचीं भाषणें केलीं. त्यांनीं आपल्या उपस्थितीनें भूषविलेला आपल्या आयुष्यांतला शेवटला

मोठा सार्वजनिक समारंभ म्हणजे लखनौ विद्यापीठाच्या पदवीदान-समारंभाचा हीरकमहोत्सव हा होय. हा महोत्सव ता. २८ जानेवारी १९४८ रोजीं साजरा झाला. त्या वेळीं त्यांनीं पंडित नेहरूंना सन्माननीय पदवी अर्पण केली. त्यांच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण झालीं तेव्हां भारतांतून व जगांतल्या सर्व भागांतून त्यांना अभिनंदनपर संदेश आले. या प्रसंगाला उद्देशून श्री. कमलादेवी चटोपाध्याय लिहितात– " सरोजिनी देवींचें जीवन हें अनेक दृष्टींनीं अनेक कार्यक्षेत्रांत अपूर्व असेंच झालें आहे. आतां लखनौच्या गव्हर्न्मेंट हाउसवरहि त्यांनीं आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप पाडली आहे. तेथल्या पूर्वीच्या नीरसपणांत त्यांनीं सौंदर्याची, हास्याची नि आनंदाची पेरणी केली आहे. सारीकडे खेळीमेळीचें, मित्रत्वाचें नि आतिथ्यसत्काराचें वातावरण त्यांनीं निर्माण केलें आहे. "

## अंतकाल

या सत्तराव्या वाढदिवसानंतर मात्र सरोजिनींची प्रकृति विशेषच बिघडूं लागली. १९४८ च्या जून महिन्यांत नैनिताल येथील एका जाहीर सभेंत त्यांनीं बोलून दाखविलें कीं पुढील वर्षीं कांहीं आपण येथें येण्यास जगणार नाहीं. १९४८ च्या डिसेंबरमध्यें अलाहाबाद येथें सायन्स कॉंग्रेस भरली. प्रसिद्ध हिंदी शास्त्रज्ञ सर रमण यांना साठावें वर्ष लागलें, त्यानिमित्त या परिषदेंत सरोजिनींनीं सर रमणांबद्दल अत्यंत हृदयस्पर्शी व काव्यमय भाषण केलें. त्या भाषणांतहि त्यांनीं आपण फार दिवसांचे सोबती नाहीं असा उल्लेख केला होता. १९४९ साल उजाडलें व सरोजिनींची प्रकृति खालावत चालली. फेब्रुवारी अखेरीस त्यांनीं अंथरूणच धरलें. ता. १० फेब्रुवारीपर्यंत त्यांची प्रकृति एकंदरीनें बरी होती. परंतु ता. ११ ला दिल्लीला जात असतांना त्यांना अतिशय थकल्यासारखें वाटूं लागलें व आगगाडींतच त्यांना उलटी झाली. पुढें दिल्लीला मोटारींतून उतरत असतांना त्यांच्या डोक्याला लागलें. तरी त्यांनीं आपलीं सर्व कामें

पार पाडलीं. ता. १५ ला त्या लखनौला परत आल्या. तेव्हां त्यांना डोकें-दुखीचा भयंकर त्रास होऊं लागला. श्वासोच्छ्वासाचे वेळींहि त्रास होऊं लागला. ता. २० फेब्रुवारीला डॉ. बी. सी. रॉय यांनीं त्यांची प्रकृति तपासली. त्यांनीं त्यांना पूर्ण विश्रांति घेण्याची सल्ला दिली. ता. २८ ला श्वासोच्छ्वास नीट होण्यासाठीं ऑक्सिजन देण्यांत आला. त्यामुळें त्यांना बरें वाटलें. पण ता. १ मार्चला त्या अत्यंत अस्वस्थ झाल्या. डोक्याला लागलें होतें तेथलें दुःख वाढून तेथें सूज आली. सर्वांना काळजी वाटूं लागली. दिवस कसाबसा गेला. त्यांना झोंप नव्हती. म्हणून रात्रीं १० ला त्यांना झोंपेचें इंजेक्शन देण्यांत आलें. इंजेक्शन देण्यापूर्वी भोंवतीं जमलेल्या डॉक्टरमंडळींना त्या म्हणाल्या— "हे इतके डॉक्टर कां बरें माझ्या भोंवतीं जमले आहेत? ते मला झोंप आणूं शकतील का?" त्यांनीं पुन्हा एका डॉक्टरला विचारलें, "मला झोंप कधीं येईल?" "लवकरच आपणांला झोंप येईल" असें डॉक्टरांनीं उत्तर दिलें. तेव्हां त्या म्हणाल्या, "मला किती वेळ झोंप लागेल?" त्यावर डॉक्टर म्हणाले, "बारा तासपर्यंत लागेल." "बारा तास! म्हणजे मी कायमचीच झोंपणार तर!" असें सरोजिनी उद्गारल्या. तेव्हां डॉक्टर म्हणाले, "तसें नव्हे, आपण पुन्हा उठाल, कारण हिंदुस्थानाला आपल्या सुज्ञ सल्लामसलतीची फार गरज आहे. आपणांला आरोग्य व दीर्घायुष्य प्राप्त व्हावें अशी आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे." हें डॉक्टरांचें म्हणणें ऐकल्यावर "कोण ऐकेल तुमची प्रार्थना! मला आतां सुखाचें मरण पाहिजे आहे," असें अगदीं खोल गेलेल्या आवाजांत सरोजिनी म्हणाल्या. तीव्र वेदना होत असतांहि त्यांची विनोदबुद्धि नाहींशी झाली नव्हती! असो. इंजेक्शन दिल्यानंतर त्यांच्या बिछान्यापाशीं श्री. पी. शर्मा नांवाची नर्स होती तिला त्यांनीं कांहीं गाणीं म्हणावयास सांगितलें. जवळ कोणीहि नातेवाईक नव्हतें. तेव्हां त्या एकट्या नर्सनें कांहीं गाणीं म्हटलीं व मग त्यांना झोंप लागली. रात्रीं २-३० वाजतां

त्या जाग्या झाल्या, तेव्हां त्यांना खोकल्याचा ठसका लागला, व त्या फारच बेचैन झाल्या. सारखी तळमळ चालू होती. मध्येंच केव्हां तरी हृदयाचे ठोके थांबले व पहांटे ३-३० वाजतां त्या इहलोक सोडून गेल्या. देदीप्यमान तारा अस्ताला गेला!

दुर्दैवाची गोष्ट ही कीं, डॉक्टर व नर्स यांशिवाय त्यांच्या आप्तांपैकीं किंवा मित्रांपैकीं कोणीहि जवळ नव्हतें! लगेच टेलिफोन व तारा यांच्या साह्यानें ही दुःखद वार्ता हिंदुस्थानभर पसरली. नातेवाईक, इष्टमित्र, पुढारी, अधिकारी जमा झाले. सत्तर हजार स्त्री-पुरुषांचा प्रचंड जमाव दुःखद अंतःकरणानें जमला होता. सरोजिनींचें शव राष्ट्रध्वजांनीं आच्छादून एका लष्करी गाडीवर ठेवलें होतें. ही गाडी गव्हर्नमेंट हाउससमोर थांबली. तेव्हां मेजर जनरल धिल्लन यांनीं शवाला सलामी दिली, व पुष्पहार घातला व मग तीन प्रहरीं चार वाजल्यावर शवयात्रा निघाली. ती एक मैल लांब होती. गाडीच्या दर्शनी भागाला उत्तर-प्रदेशाचे पंतप्रधान पं. गोविंद वल्लभ पंत व मेजर जनरल धिल्लन हे बसले होते. समोर घोडेस्वार व पाठीमागें लष्करी अधिकारी पायीं चालत होते. त्यांच्या मागून सरोजिनींचे नातेवाईक, भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू, गव्हर्नर जनरल राजाजी, सर न्यायाधीश, लखनौ विद्यापीठाचे व्हाइस-चॅन्सेलर, लेडी माउंटबॅटन, पमिला माउंटबॅटन वगैरे मंडळी पायीं चालत होती. रस्त्यांतील सर्व रहदारी बंद होती. सैनिकांनीं सर्व मिरवणुकीभोंवतीं दोरखंडाचें कडें घातलें होतें. झाडांच्या फांद्यांवर, घरांच्या छपरांवर, गॅलऱ्यांत, व इतर ठिकाणीं प्रचंड गर्दी झाली होती. ५-४८ वाजतां ही शवयात्रा गोमतीच्या तीरावर आल्यावर थांबली. शव गाडीवरून उचलून रचलेल्या चितेवर ठेवण्यांत आलें. द्वादश पंडितांनीं या गोमती तटाकीं शवाला हवनपूर्वक मंत्राग्नि दिला. व याप्रमाणें हा अंत्यसंस्कार पार पडला. सरोजिनींचा पार्थिव देह भस्मीभूत झाला, परंतु कीर्तीनें त्या अमर झाल्या. त्यांच्या मागें त्यांचे थोरले सुपुत्र प्रथितयश डॉक्टर जयसूर्य, व दोन सुकन्या पद्मजा व लीलामणी या आहेत.

## सरोजिनींचें मुख्य जीवितकार्य

येथपर्यंत सरोजिनींच्या चरित्राची रूपरेषा आम्हीं मांडली. त्यावरून त्यांच्या जीवनाचें सार काय आहे तें पाहूं. सरोजिनी जशा उत्कृष्ट कवयित्री होत्या तशा त्या राजकारणधुरंधर होत्या काय असा प्रश्न कांहींजण उपस्थित करतात. त्याला उत्तर असें कीं, त्यांचा आत्मा काव्य-मय होता ही तर गोष्ट खरीच. तसेंच पूर्ववयांत त्यांनीं कांहीं उत्तम काव्याहि लिहिलें. परंतु असें असलें तरी त्यांनीं पुढें आपल्या काव्यक्षेत्राला स्वतः होऊन मर्यादा घातली होती. देशसेवेला जेव्हां त्यांनीं स्वतःला सर्वस्वीं वाहून घेतलें तेव्हां त्यांनीं आपला काव्यविषयक व्यासंग थांबविला. यासंबंधीं चरित्रांत उल्लेख आलेला आहेच. दुसरें असें कीं, त्यांनीं जें राजकारण केलें तें पक्षाच्या अभिनिवेशानें केलें नाहीं. राजकारण हें कांहीं त्यांचें साध्य नव्हतें. राजकारण ही कांहीं त्यांची जीवननिष्ठा नव्हती. एवढें मात्र खरें कीं, त्यांनीं आपल्या उच्च व्यक्तिमत्त्वानें राजकारणाला थोर दर्जा प्राप्त करून दिला. त्याला पवित्रता आणली. त्याच्या प्रसंगवशात् कटुत्वाची व कलहद्वेषाची धार त्यांनीं बोथट करून टाकली. राजकारण करीत असतांना त्याच्या धुमश्चक्रींत त्यांनीं काव्याचा आनंद आणला हें निःसंशय! राजकारणाच्या क्षेत्रांतील एक मोठ्या दुःखशमनकर्त्या व तडजोड करणाऱ्या या नात्यानें राजाजी, पं. नेहरू व इतर कित्येक थोर पुढाऱ्यांना त्यांच्याबद्दल धन्यता वाटे. तरीपण एकंदरीनें विचार करतां केवळ राजकारण किंवा काव्यलेखन हें कांहीं त्यांच्या जीवनाचें सार ठरत नाहीं. त्यांनीं आपलें ध्येय काय ठरविलें होतें तें त्यांच्या कार्यावरून पाहिलें पाहिजे, व तें पाहात असतांना त्यांचीं निष्ठास्थानें शोधलीं पाहिजेत. त्यांच्या चरित्राचें अवलोकन केल्यास त्यांचीं हीं निष्ठास्थानें किंवा श्रद्धास्थानें मुख्यतः तीन होतीं असें आढळून येईल. ( १ ) स्वातंत्र्य-प्रीति व त्याकरितां त्यागाची तयारी, ( २ ) हिंदु-मुस्लिम ऐक्यावर अढळ विश्वास, ( ३ ) गांधीजींबद्दल देवतुल्य आदर. सरोजिनींची प्रत्येक कृति,

प्रत्येक हालचाल, व त्यांचीं भाषणें हीं ह्या तिन्ही गोष्टींनीं प्रेरित झालीं होतीं. या तिन्ही गोष्टींसाठीं त्यांनीं राजकारणाचा केवळ साधन म्हणून उपयोग केला. यावरून सरोजिनींच्या मुख्य जीवितकार्याची आपणांस कल्पना करतां येईल.

## कांहीं आठवणी

सन १९१९ सालांतला एक प्रसंग. सरोजिनी दक्षिण-आफ्रिकेच्या दौऱ्यावर होत्या. कित्येक सभांतून त्यांनीं भाषणें केलीं. एकदां एका व्याख्यानाचे वेळीं सभेला जे गृहस्थ अध्यक्ष म्हणून आले होते त्यांना नीट बोलतां येत नव्हतें. तेव्हां श्रोते गडबड करूं लागले. सरोजिनींनीं हें पाहतांच त्या उठून उभ्या राहिल्या व गॅलरींतल्या दंगा करूं पाहणाऱ्या लोकांना उद्देशून त्यांनीं अशी हांक मारली, " हे गॅलरींतल्या माझ्या देवांनो व देवतांनो ! " सरोजिनींची ही हांक ऐकतांच सभा शांत झाली.

१९२२ साल. सरकारची दडपशाही व जनतेचे हाल पाहून सरोजिनींना अनावर शोक झाला. थंडीचे दिवस होते ते. साबरमतीच्या आश्रमांत पूज्य बापूजी—गांधीजी—बसले होते व त्यांचे समोर सरोजिनी आपला शोक व्यक्त करीत असतांना ढळढळा रडत होत्या. हिंदुस्थानला तारणाऱ्या त्या आपल्या परमपूज्य गुरुजींच्या समोर त्यांनीं आपलीं दुःखें मनमोकळेपणानें निवेदन करून आपला दुःखभार हलका केला.

१९२४ सालीं दक्षिण-आफ्रिकेंत असतांना सरोजिनींना जनरल हर्ट झॉग यांनीं एकदां विचारलें कीं, " दक्षिण-आफ्रिकेंत वसाहत करणारे हिंदी लोक आपल्या मातृभूमीला—हिंदुस्थानाला—परत कां नाहीं जात ? " त्यावर समयसूचकतेनें सरोजिनींनीं उत्तर दिलें—" मग आतां मीहि तुम्हांला असं विचारतें कीं, कां हो, तुम्ही हॉलंडचे रहिवासी. येथें दक्षिण-आफ्रिकेंत आलांत. तुम्ही कां नाहीं जात परत आपल्या हॉलंड ला ? "

१९४०–४१ चा सुमार. पुण्याच्या कॉंग्रेसभवनांत स्त्रियांची एक

खास सभा बोलावली होती. सरोजिनी अध्यक्ष होत्या. पुष्कळशा कॉलेज तरुणी सभेला आल्या होत्या. वातावरण खेळीमेळीचें होतें. एका मोठ्या व्यासपीठावर सरोजिनी खालींच बसल्या होत्या. त्यांच्या अंगावर साधें खादीचें पोपटी पातळ होतें. अंगांत साधा शुभ्र ब्लाउझ होता. गळ्यांत भरपूर लांबलचक मंगळसूत्र होतें, आणि कानांत लोंबते डूलहि होते. त्यांच्या शेजारीं विजयालक्ष्मी पंडित बसल्या होत्या. मुलींसारखाच त्यांचा हास्यविनोद चालला होता, त्यामुळें त्यांचा कोणाला बाऊ वाटत नव्हता. त्यांनीं प्रत्येकीचें हंसतमुखानें नमस्कार करून स्वागत केलें. सभेचें औपचारिक काम आटोपल्यावर स्वाक्षरीसाठीं कांहीं मुलींनीं जेव्हां त्यांच्या समोर आपली वही उघडली तेव्हां त्या खूपशा हंसून म्हणाल्या, " मला पाहिल्यावर आणखी सहींत काय आहे ? मी वागतें तशा वागा. देशासाठीं हंसतमुखानें तुम्ही लढायला शिका—" सरोजिनी देवींचा हाच खरा संदेश होय.

सरोजिनी गव्हर्नर असतांना गव्हर्न्मेंट हाउसमध्यें हमीदखान या नांवाचा ४८ वर्षें वयाचा एक नोकर होता. तो सरोजिनींच्या आठवणी सांगतांना म्हणाला, " मीं आतांपर्यंत तीन गव्हर्नरांच्या हाताखालीं काम केलें. पण त्या सर्वांत सरोजिनी ह्याच उत्तम गव्हर्नर होत्या. हॅलेट हा गव्हर्नर असतांना आपल्या हाताखालच्या लोकांशीं व इतर खालच्या नोकरांशीं कधींहि बोलत नसे. त्यानंतर वायली हा गव्हर्नर जरा त्याहून बरा होता. पण सरोजिनी नायडू या गव्हर्नर झाल्यापासून त्यांनीं आम्हांला इतकें चांगलें वागविलें कीं, या गव्हर्न्मेंट हाऊसमध्यें नोकरी करणें म्हणजे एक आनंददायक गोष्ट असें आम्हांला वाटे. आम्ही एकंदर ५० पेक्षां अधिक नोकरलोक होतों. पण गव्हर्नर सरोजिनी त्या सर्वांना नांवानें—आडनांवानें नव्हे—हांक मारीत. त्यांनीं एकंदर तीनदां चहापार्टी केली. एकदां त्यांनीं सर्वांच्या मुलांना पार्टी दिली. नंतर त्यांनीं सर्वांच्या गृहिणींना व घरच्या इतर स्त्रियांना पार्टी दिली. त्या वेळीं त्यांनीं स्वतः सर्वांना चहा दिला.

नंतर त्यांनीं साऱ्या अधिकाऱ्यांपासून तों अगदीं धोबी, झाडूवाले या सर्व नोकरांना पार्टी दिली. त्या वेळीं सर्वजण एकत्र आले होते. ईदच्या सणांत त्या नोकरांच्या घरीं त्यांच्या भेटीला जात व तेथें त्या मिठाई व बक्षिसें त्यांना देत. आम्हांला त्यांची नेहमीं आठवण राहील." आपल्या नोकरांचीं मनें त्यांनीं कशीं काबीज केलीं होतीं, व त्यांना त्या स्नेहानें कसें वागवीत याचें हें एक चांगलें उदाहरण आहे.

# सरोजिनी देवींना विश्ववंदन

“ सध्यांच्या दगदगीच्या व गोंधळाच्या दिवसांत सरोजिनी देवींचा आपल्याला केवढा मोठा आधार होता व त्यांच्या थोर साहाय्यास आपण कायमचे अंतरल्यानें आपणांला केवढा जबरदस्त धक्का बसला आहे याची मला जाणीव आहे. पण झालेली ही हानि भरून काढण्यासाठीं आपली पराकाष्ठा करणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे. ”

—(गव्हर्नर जनरल) राजाजी.

“स्वातंत्र्याच्या समरभूमीवर त्या वीरस्त्रीप्रमाणें लढल्या. या हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत आपल्याला अंतिम यश मिळणार असा त्यांचा दृढ विश्वास होता. बापूंच्या—गांधींजींच्या—जीवनाशीं निगडित असलेला एक बहुमोल दुवा निखळून पडला. ”

सरदार पटेल.

“ सौ. नायडू या माझ्या आईच्या, माझ्या पतींच्या व माझ्या स्वतःच्या निकट स्नेही होत्या. त्यांचा मृत्यु ही केवळ राष्ट्रापुरती नव्हे तर आंतरराष्ट्रीय हानि आहे. ”

—लेडी माउंटबॅटन

“ सरोजिनींचें प्रेमळ, प्रभावी व्यक्तिमत्त्व, जनतेबद्दलची सहानुभूति व त्यांच्या हिताबद्दलची दक्षता, आणि तीव्र बुद्धिमत्ता यांचा स्वातंत्र्याच्या लढ्यांत चांगला उपयोग झाला. देशासंबंधीं आपलें कर्तव्य काय याची जाणीव त्यांनीं हिंदी स्त्रियांना करून दिली व म्हणून त्यांना सरोजिनींचें नेतृत्व मान्य झालें. ”

अमेरिकन पार्लमेंटच्या सभासद

—फ्रान्सिस पी. बोल्टन.

" माझ्या आयुष्यांत माझ्या अवलोकनांत आलेल्या स्त्रियांमध्यें सरोजिनी ही असामान्य होती. त्यांचा मृत्यु ही एक भयंकर दुःखद घटना आहे असें मला वाटतें. मरेपर्यंत त्यांच्या बुद्धिमत्तेचें तेज कायम होतें. "

सर सी. व्ही. रमण.

" आधुनिक हिंदी स्त्रियांचा उदात्त आदर्श या नात्यानें सरोजिनी देवींनीं भारतदेशाला जगांत मोठें मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. "

—श्री. के. एम्. मुन्शी.

" सरोजिनीदेवींच्या मृत्यूची बातमी भयंकर आहे. भारतांतला आणखी एक अत्यंत तेजस्वी तारा लोपला. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत महात्मा गांधींबरोबर त्या सर्वत्र आघाडीवर असत. त्यांच्या मृत्यूनें झालेली हानि आपल्याला भरून काढतां येणार नाहीं. "

—श्री. बाळ गंगाधर खेर.

ulह

देवी सरोजिनी नायडू यांच्या साठाव्या वाढदिवसाचे प्रसंगीं हैद्राबाद येथें त्यांना कवि वसंत अंबादास तुळजापूरकर यांनीं अर्पिलेलें गीत.

सत्य धर्मकी देवी तुम हो, और हिंदकी शान।
रोमरोममें भरी तुम्हारे राष्ट्रप्रेमकी जान।
जिस समय सुनी भारतकी दुःखदर्द भरी ललकार।
नीर बहाकर त्यागा तुमने अपना सुख-संसार।
देशकार्यमें तनमन खोया वहुत सहे अपमान।
वीर जगतकी माताओंमें अमर तुम्हारा स्थान ॥

० ० ०

## याच लेखकाचीं प्रसिद्ध
## झालेलीं इतर पुस्तकें

(१) विठ्ठलभाई पटेल (चरित्र व आठवणी) पृष्ठें २९० किंमत साडेचार रुपये.

(प्रस्तावनाकार—नामदार दादासाहेब मावळंकर अध्यक्ष मध्यवर्ती लोकसभा).

(२) भारतीय राष्ट्रगीतें (संग्रह व विवेचन. पृष्ठें १०८ किंमत एक रुपया.

(श्री. साने गुरुजी, सेनापति बापट, श्री. बा. गं. खेर, म. म. पोतदार यांचे उत्कृष्ट अभिप्राय.)

REFBK-0007936

प्रथमावृत्ति १९५३

मुद्रक व प्रकाशक : दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २.